साप्ताहिक
# माणूस
२४ डिसेंबर ८३ | दोन रुपये

क्रिकेट विशेषांक





## विश्वसंघाची निवड

# महाराष्ट्राचे खेळाडू मागे का?

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : तेविसावे

अंक : तिसावा

¤

२४ डिसेंबर १९८३

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

¤

पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

संजय पवार

## पराभवाच्या छायेत

**मा**णूसच्या क्रिकेट विशेषांकाची तयारी चालली होती तेव्हा कलकत्त्यात एकएक मोहरे गळून पडत होते. पराभवाची छाया अगदी अटळ होती आणि स्टेडियमवरच्या भयाण शांततेचा स्फोट कसा होणार याची काळजी सुरक्षा विभागाला घेरून होती. खचाखच भरलेल्या स्टेडियममधल्या धुमसत्या धुराची वाफ बाहेर आली खेळ संपल्यावर.

कपिल - सुनीलसारख्या दैवतावर त्यांच्या चाहत्यांनी संत्र्या-केळांच्या साली फेकल्या आणि नंतर खेळाडूंना घेऊन जाणाऱ्या गाडीवर चिडलेल्या जमावाने दगडफेक केली.

विश्वचषक जिंकल्यावर उभारलेल्या विजयोत्सवाच्या गुढ्या जेवढ्या अस्सल होत्या तेवढीच पराभवानंतरची ही होळीही खरीच आहे.

हाच क्रिकेटच्या खेळामधला जिवतपणा आणि उत्स्फूर्त प्रतिसाद की काय ?

प्रश्न येतो आधी गुढी उभारून नंतर तोंडावर हात घेणाऱ्यांचा खरं तर चांगलं क्रिकेट खेळलं जाण्यासाठी या दोन्ही गोष्टी टाळायला हव्यात.

विजयाचा कैफ चढणं वेगळं आणि नशेत बेहोश होणं वेगळं.

याचं भान आधी खेळाडूंना हवं. त्यांना नसेल ( नाहीच ! ) तर या क्षेत्रातल्या संस्थानिकांना तरी हवं. नाही तर विजय काय किंवा पराभव काय दोन्ही अपघातच वाटणार. चुकून झालेले.

¤

कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूपाठीमागे असलेलं चकाकतं वलय आणि त्यांना मिळणारा प्रचंड पैसा आणि सोयीसवलतीमुळे कसोटी दरवाजा उघडणं फक्त वैयक्तिक गुणांवर आता अवलंबून राहिलेलं नाही. त्याच्या आजूबाजूला घाणेरडं राजकारणही पसरलेलं आहे. अशा राजकारणाशी टक्कर देत आत गेलेल्या खेळाडूमध्ये सांघिक भावना कमी; पण प्रादेशिकवाद मात्र बोकाळला आहे. मुंबई विरुद्ध दिल्ली अशी जाहीर लढत कधी दिसते तर कधी मुंबई विरुद्ध महाराष्ट्र. आणि या लढाईत बळी जाताहेत काही चांगले खेळाडू. महाराष्ट्राचा विचार केला तर चेतन चौहाननंतर दखल घ्यावी असा एकही खेळाडू आज कसोटीपर्यंत पोचू शकलेला नाही.

याची कारणं शोधण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे. पण या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना आणि अनुभवी खेळाडूंना भेटूनही उत्तर स्पष्ट मिळालेली नाहीत. कारण आपल्या चुकांबद्दल चर्चा करून सुधारणा करण्यासारखं मोकळं वातावरण इथं नाही.

प्रत्येकावर कसलं ना कसलं दडपण आहेच. मात्र सगळ्यांचं म्हणणं एकच— खेळातून राजकारण बाहेर काढलं पाहिजे.

¤

दणदणीत पराभवाच्या छायेत हा अंक प्रसिद्ध होतो आहे. या पराभवाची चिकित्सा केली आहे बाळ पंडितांनी शिवाय गावस्कर–ब्रॅडमन या खूप चर्चा झालेल्या विषयाबद्दलचा एक वेगळा दृष्टिकोन या अंकात आहे. एकनाथ सोलकराचे क्षेत्ररक्षणाचे अनुभव आहेत. याच अंकात आठ देशांच्या ८८ खेळाडूमधून चंद्रशेखर संतांनी विश्वसंघासाठी निवडलेले अकरा खेळाडू कदाचित क्रिकेटरसिकांमध्ये वाद निर्माण करतील. तसेच आजचे अनुभवी पंच—माधव गोठोस्कर यांची मुलाखत पंचांच्या निर्णयाबद्दल बरेच गैरसमज दूर करणारी आहे. □

# महाराष्ट्राचे खेळाडू मागे का ?

महाराष्ट्राचे खेळाडू मागे का ?
कारणं माहीत नाहीत; पण ही गोष्ट खरी आहे
गेल्या ५–६ वर्षांत महाराष्ट्राचा एकही खेळाडू कसोटी सामन्यांच्या चकाकत्या खेळपट्ट्यांवर जाऊ शकलेला नाही, हा त्याचा प्रत्यक्ष पुरावा आहे.
या प्रश्नाची कारणं शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा जाणवलं की, काही प्राथमिक प्रश्नांची सबब सांगून हा विषय दडपण्याकडेच या क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या लोकांचा कल आहे. पुण्यातले क्रिकेट-क्षेत्रातील काही पदाधिकारी आणि रणजीपर्यंत धडकून आलेले काही खेळाडू यांच्याशी बोलल्यावर लक्षात आलं की, प्रश्नाच्या मुळापर्यंत पोचण्याची पदाधिकाऱ्यांची इच्छाच नाही.
कारण ?
पुढचं वर्ष हे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचं पन्नासावं वर्ष आहे आणि सुवर्णमहोत्सवी वर्ष असं डोळ्यांसमोर असताना संस्थेबद्दल काही वाईट बोलणं हे औचित्यपूर्ण नक्कीच नाही.
या विषयावर बोलण्याची खेळाडूंची इच्छा आहे; पण ते बोलू शकत नाहीत. कारण असोसिएशन कशीही असो, आज सगळ्या नाड्या संस्थेच्याच हातात आहेत.
अशा प्रतिकूल वातावरणात या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा हा प्रयत्न...

□

आर्. सुभद्रा

महाराष्ट्राचे क्रिकेट–खेळाडू माग आहेत, ही गोष्ट मान्य आहे; पण म्हणून याचा अर्थ महाराष्ट्राकडे गुणी खेळाडूच नाहीत असा काढणं अगदी चुकीचं होईल. भारतीय संघात ज्याचा समावेश होऊ शकेल, असे अनेक खेळाडू महाराष्ट्रात आहेत. नाव घेऊनच बोलायचं झालं तर राजू भालेकर, मिलिंद गुजाळ, प्रसाद प्रधान, रँडॉल्फ डॅनियल, श्रीकांत कल्याणी वगैरे खेळाडूंचा मुद्दाम उल्लेख करावा लागेल. एवढच काय पण भारतीय संघाला जलदगती गोलदाजाची आवश्यकता आहे. विंडीजकडे जलदगती गोलंदाजांची संख्या जास्त असल्यामुळ त्यांच्याकडे बळीची नेहमी विभागणी होते आणि एकाच खेळाडूवर ताण पडत नाही. आपल्याकडे नेमकी उलट परिस्थिती आहे. आपल्या संघात कपिलदेव एकटाच जलदगती गोलंदाज आहे साहजिकच त्या बाबतीत सारी मदार एकट्या कपिलवर असते. हे एवढं खुलासेवार सांगण्यात्र कारण म्हणजे महाराष्ट्राकडे रँडॉल्फ डॅनियल, डिमॉन्टी-सारखे उत्तम जलदगती गोलंदाज आहेत. पांडुरंग साळगावकरसारखा द्रुतगती गोलंदाजही महाराष्ट्रातच होता याची मुद्दाम आठवण करून द्यावी लागते; पण भारताला जलदगती गोलदाजाची आवश्यकता असूनही त्याच्याकडे दुर्लक्ष झालेल आहे. यातून एक गोष्ट निश्चित होते की, महाराष्ट्राकडे चागल्या खेळाडूंची वाण नाही. मग मुद्दा उरतो तो हा की, एकीकडे भारतीय सघात मोठमोठ्या प्रमाणावर नवीन नवीन चेहरे येत असताना महाराष्ट्राच्या खेळाडूंचे चेहरे भारतीय संघातून गायब का ?

कुठलाही खेळ घेतला तरी भारतीय खेळाडू तुलनेत कमी पडत असल्याचं कारण प्रामुख्यान दिलं जातं ते या खेळाडूंची कमी पडणारी मेहनत, तसच अपेक्षित प्रमाणात उपलब्ध नसलेल्या सोयी/सवलती. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे खेळाडू आणि इतर खेळाडू यांच्या मेहनतीत किंवा सोयी–सवलतीत फार मोठी तफावत आहे का आणि त्याचा कळत–न कळत परिणाम या खेळाडूवर आणि त्याच्या खेळावर होतो का ? असा एक प्रश्न होता. या प्रश्नाचं जे उत्तर मिळत, त्यात एकदरीतच महाराष्ट्रा-तल क्रिकेट आणि क्रिकेटखेळाडू याच्या 'दुर्दैवी' अवस्थेवर चागलाच प्रकाश पडतो.

### नियमित सरावाची सोय नाही

क्रिकेटचा पाया हा खरं म्हणजे शालेय जीवनातच रुजतो आणि एके काळी शालेय पातळीवरचं क्रिकेट खूप फॉर्मात होतं; पण अलीकडे हे प्रमाण खूप घटलं आहे. कारण मुळात क्रिकेट हा खूप महागडा खेळ, त्यात साहित्याच्या किंमती वाढलेल्या आणि त्या मानानं शाळांना मिळणाऱ्या ग्रँटस् कमी या व्यस्त प्रमाणामुळं ग्रँटस्‌ची फार मोठी रक्कम क्रिकेटवरच खर्ची पडायला लागली तर बाकीच्या खेळाचं काय करायचं ? त्यामुळं जवळजवळ ७५% शाळातून क्रिकेटलाच फाटा मिळाला. त्याऐवजी बोर्डानं १५ वर्षांखालील, १९ वर्षांखालील, २२ वर्षांखालील खेळाडूंचे सामने घेऊन नवीन खेळाडू तयार करण्याची योजना राबवली आहे आणि या योजनेचा फायदाही होतो आहे. याशिवाय महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशननंही खेळाडूंच्या प्रशिक्षणाची सोय केलेली आहे; पण कुठल्याही खेळात सर्वांत महत्त्वाची गोष्ट असते नियमित सराव. शारीरिक तंदुरुस्ती आणि त्याचबरोबर खेळा-

तली सफाई या दोन्ही गोष्टी नियमित सरावातूनच सहजी प्राप्त करता येतात; पण महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडे स्वतःच ग्राउंड नाही आणि परिणामी या खेळाडूंना नियमित सरावासाठी ग्राउंडच उपलब्ध नाही. एवढंच काय पण पुणे महानगरपालिका आणि क्लब ऑफ महाराष्ट्र यांच्या परस्पर करारातून बांधलं गेलेल नेहरू स्टेडियम जे खास क्रिकेट साठी म्हणून बांधलं आणि चंदू बोर्डेसारख्या एका क्रिकेटियरच्याच हस्ते मुद्दाम उद्घाटन केलं गेलं, त्या नेहरू स्टेडियममध्ये आज क्रिकेट कमी आणि इतरच कुठले कुठले कार्यक्रम जास्ती-अशी परिस्थिती आहे. स्टेडियमच्या या भोंगळ कारभाराचं अगदी ताजं उदाहरण म्हणजे फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या देवधर ट्रॉफी सामन्यासाठी हे स्टेडियम मिळू शकलेलं नाहीय-कारण ? कारण त्या काळात हे स्टेडियम कल्याणजी-आनंदजी नाइटसाठी दिलेलं आहे. आता बोला ! याखेरीज उरलेली ग्राउंडस् म्हणजे पूना क्लब, डेक्कन जिमखाना आणि पी. वाय. सी. पण ही ग्राउंडस् भाड्यानं घेऊन खेळाडूंना उपलब्ध करून देणं ही गोष्ट महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आवाक्याबाहेरची आहे.

### मार्गदर्शनाचा अभाव

मुंबईतलं क्रिकेट हे लाइव्ह (Live) क्रिकेट आहे. तिथं सतत कुठल्या ना कुठल्या प्रकारच्या ॲक्टिव्हिटीज, सामने होत असतात त्यामुळे मुंबईतलं क्रिकेट आणि क्रिकेट-खेळाडू कधीही ठप्प नसतात. याउलट महाराष्ट्र संघाला वर्षातून एकदा रणजीच्या निमित्तानं चार-पाच सामने खेळायला मिळतात आणि यशापयशाची बेरीज-वजाबाकी करतच पुढच्या वर्षीच्या सामन्याकडे डोळे लावून बसायचं. म्हणजे नियमित सरावाबरोबरच सामन्यांची ही रडकथाच. यात पुन्हा मुंबई आणि महाराष्ट्र संघात एक तुलना अटळ ठरते आणि ती म्हणजे महाराष्ट्राच्या खेळाडूंना प्रकर्षानं जाणवणारा मार्गदर्शनाचा अभाव.मुंबईत कुठलाही सामना असो. मग तो शालेय पातळीवरचा सामना असो, रणजी पातळीवरचा असो किंवा कसोटी पातळीवरचा असो दिलीप सरदेसाई, पतौडी, बापू नाडकर्णी, रमाकांत देसाई यांच्यासारखे जुने-जाणते कसोटीवीर तिथं आवर्जून हजर असतात. या अननुभवी खेळाडूमधले गुण ओळखून त्यांना आपल्या अनुभवाच्या पोतडीतून आवश्यक त्या 'टीप्स' देत असतात. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करत असतात. तसच या सामन्यांच्या निमित्तानं नव्या जुन्या खेळाडूंना एकत्र खेळायची संधी मिळते आणि त्यामुळे गावस्कर, वेंगसरकर, कपिलदेव यांच्यासारख्या रथी-महारथीबरोबर खेळायचं आहे, या कल्पनेनं येणारं दडपण आपोआपच कमी होत जातं. क्रिकेटच्या प्रॅक्टिसबरोबरच किंवा प्रॅक्टिसपेक्षाही अधिक महत्वाची असते ती मॅचप्रॅक्टिस. मॅच प्रॅक्टीसच्या निमित्तानं जाणत्या आणि अनुभवी खेळाडूबरोबर खेळायची संधी मिळते, त्याच्या खेळाचं जवळून आणि बारकाईनं निरीक्षण करता येतं. कशीही परिस्थिती आली तरी तिला तोड कसं द्यायच. याचं स्वतःच स्वतःला जजमेंट घेण्याची सवय होते, त्याचबरोबर या सामन्याना हजारोंच्या संख्येनं हजर असणाऱ्या प्रेक्षकवर्गाची सवय होते. यासारख्या अनेक गोष्टी मॅचप्रॅक्टिसमधून शिकता येतात. महाराष्ट्राच्या खेळाडूंना हे काहीच मिळत नाही. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी काही चांगल्या संधी वाया घालवल्या, यामागचं मुख्य कारण हेच आहे. आत्मविश्वास डगमगायला लागला की काय होतं, हे सध्या आपल्या डोळ्यासमोर आहेच. त्यामुळे केवळ आत्मविश्वासाच्या अभावाने महाराष्ट्राचे खेळाडू निष्प्रभ ठरले. याविरुद्ध बरीच हाकाटी होते. पण याचा अर्थ महाराष्ट्राकडे टॅलेन्टस् नाहीत असा मात्र काढू नये एक तर इथं मुंबईसारखा सामन्यांचा हौदोस नसतो.अधूनमधून तुरळक सामने होत असले तरी जुने-जाणते कसोटीवीर तिकडे ढुंकूनही बघत नाहीत. मग मार्गदर्शनाची वगैरे तर बातच नको. साधं उदाहरणच द्यायचं झालं तर महाराष्ट्राच्या चंदू बोर्डेंच्या मार्गदर्शनाचा लाभ जम्मू-काश्मिरमध्ये भरलेल्या एका कॅम्पच्या खेळाडूंना होतो; पण खुद्द महाराष्ट्राचे खेळाडू मात्र त्यापासून वंचित राहतात या परिस्थितीला काय म्हणायचं ? तरी सध्या दूरदर्शनवरून क्रिकेटचे सामने मोठ्या प्रमाणावर दाखवत असल्यानं अनुभवी खेळाडूंच्या खेळाचं निरीक्षण करता येत आणि त्याप्रमाणे आपला खेळ सुधारता येतो असा महाराष्ट्राच्या खेळाडूंनी प्राप्त परिस्थितीवर मात करण्यासाठी मार्ग शोधून काढला आहे. (जय हो दूरदर्शनकी !) संधी मिळण महत्त्वाचं.

एखाद्याजवळ टॅलेन्टस् असणं जितकं महत्त्वाचं, तितकंच या अंगभूत गुणांना वाव मिळण, त्यासाठी योग्य आणि विशिष्ट संधी मिळणं हेही महत्त्वाचं आहे. याबाबतीत सगळ्याचच एकमत. सर्वसामान्यपणे रणजीत प्रवेश मिळाला की, कसोटीसामन्यांच घोडमैदान जवळ आल्याची वॉर्निंग मिळते; पण महाराष्ट्राच्या खेळाडूंची घोडी रणजीच्याच लक्ष्मणरेषेत घुटमळत आहेत. याला प्रमुख कारण म्हणजे रणजी ते कसोटी सामने ही मजल मारण्यासाठी जो पाठिंबा ( backing ) आवश्यक आहे, ते इथं पूर्णपणे अनुपस्थित आहे. आज महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशननं खेळाडूंना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली आहे. कमल भांडारकर, राजाभाऊ ओक यांच्यासारख्या समर्थ मार्गदर्शकांची नेमणूक केली आहे. या गोष्टी मान्य केल्या तरीही महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचं काम इथच संपत नाही, हेही तितकच खरंय. इथपर्यंत महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशननं नियोजित कामापैकी काही टक्के काम पूर्ण केलं असं म्हणता येईल; पण खेळाडू घडवण्याची किंवा त्याचे उपजत गुण जोपासण्याची, फुलवण्याची प्रक्रिया इथ होतच नाही. एकदा एक संघ निवडला गेल्यानंतर त्यातील खेळाडूवर विशेष कष्ट घेतले जाणं, त्यांच्यासाठी खास प्रशिक्षणाची सोय केली जाणं, या खेळाडूचा कसोटीत प्रवेश व्हावा म्हणून विशिष्ट योजना राबवल्या जाणं, या गोष्टीची उणीव सतत भासत होती आणि भासत आहे. प्रत्यक्ष परिस्थिती अशी की, रणजी सामन्यासाठी खेळाडूंची निवड दरवर्षी नव्यानं केली जाते. मग आदल्या वर्षी उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या खेळाडूची या वर्षीची कामगिरी वाईट झाली की, मिळालाच त्याला डच्चू ! वास्तविक महाराष्ट्राच्या खेळाडूंच्या अपेक्षा आहेत त्याप्रमाणे एखाद्या खेळाडूला कमीत कमी ४-५ संधी तरी दिल्या गेल्या पाहिजेत. कारण एकदरीत त्रुटी लक्षात घेता मॅचसाठी आवश्यक टॅंपरामेंट तयार होणं, मॅचच्या

# ' राजकारण संपायला हवं ! '

—नाना जोशी

महाराष्ट्राला क्रिकेटची मोठी परंपरा आहे. प्रो. देवधर, चंदू बोर्डे यांच्यासारखे गुणी खेळाडू महाराष्ट्रानेच भारताला दिले. भारतीय संघात महाराष्ट्राच्या एक–दोन खेळाडूंचे स्थान तरी पक्के असायचेच; पण गेल्या ५–१० वर्षांपासून परिस्थिती बदलत गेली. ज्या महाराष्ट्राने भारतीय संघाची धुरा वाहणारे खेळाडू निर्माण केले, त्याच महाराष्ट्रातून गेल्या ५–१० वर्षात एकही खेळाडू कसोटीपर्यंतही पोचू शकला नाही दिल्ली, कर्नाटक यांसारख्या संघांची झपाट्याने प्रगती होत असताना आणि त्यांचे खेळाडू मुंबईच्या खेळाडूंच्या बरोबरीने भारतीय संघात स्थान मिळवत असताना महाराष्ट्रीय खेळाडूंची मात्र पीछेहाट होत गेली. यामागे नेमकी कोणती कारणे असावीत त्याचा शोध घेण्यासाठी एखाद्या अनुभवी व जाणत्या व्यक्तीशी बातचीत करणे आवश्यक होते. त्या दृष्टिकोनातून मी श्री. नाना जोशींची भेट घेतली.

श्री. नाना जोशींनी महाराष्ट्रातर्फे यष्टिरक्षक म्हणून कामगिरी बजावलेली आहे. महाराष्ट्राच्या संघातून ते अनेक रणजी व इतर विभागीय सामने खेळले. १९५३ साली वेस्टइंडीजच्या व त्यानंतर १९५९ साली इंग्लंडच्या दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघातही त्यांचा समावेश होता. खेळाडू म्हणून तर त्यांनी महत्त्वाची कामगिरी केलीच; पण निवृत्तीनंतरही प्रशिक्षणाद्वारे वा व्यवस्थापक म्हणून काम करून त्यांनी क्रिकेटशी या ना त्या प्रकारे संबंध ठेवला आहे त्यामुळे महाराष्ट्राच्या क्रिकेटवर अधिकारवाणीने बोलायला त्यांच्याशिवाय योग्य व्यक्ती सापडणे कठीणच होते.

महाराष्ट्र क्रिकेटच्या सध्याच्या स्थानाबद्दल श्री. जोशी अतिशय असमाधानी आहेत. ते स्वतः किंवा चंदू बोर्डे यांच्या काळापर्यंत



यष्टिरक्षक नाना जोशी

¤

चालत आलेली परंपरा नंतरचे महाराष्ट्रीय खेळाडू टिकवू शकले नाहीत याबद्दलचा खेद त्यांच्या बोलण्यातून सतत व्यक्त होत होता. महाराष्ट्राचे क्रिकेट व क्रिकेटपटू मागे पडायला अनेक कारणे असली तरी त्यातही २–३ कारणे प्रमुख आहेत, असे मत त्यांनी मांडले. पहिली आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्र क्रिकेटचे नियंत्रण करणारी जी संघटना आहे तिच्यातील गलिच्छ राजकारण. या राजकारणामुळे खेळाडू पुढे येऊ शकत नाहीत. या संदर्भात चेतन चौहानचे उदाहरण त्यांनी दिले. या गुणी खेळाडूला अनेक वर्षे धडपड करूनही इथे योग्य संधी मिळाली नाही; पण तो दिल्लीला गेल्यावर मात्र पुढे त्याला कसोटीतही संधी मिळाली आणि त्याने चांगली कामगिरीही केली. म्हणून जोपर्यंत येथील खराब राजकारण संपत नाही आणि पदाधिकारी आपला खुर्चीचा मोह सोडत नाहीत तोपर्यंत महाराष्ट्राचे खेळाडू पुढे येणे अशक्य असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. तरुण खेळाडू पुरेशी मेहनत करत नाहीत हेही त्यांना येथील क्रिकेटच्या पीछेहाटीचे एक कारण वाटते. कोणत्याही क्षेत्रात उच्च स्थानी पोचायला मोठी तपश्चर्या लागते. कोणताही गवई कितीही मोठा झाला तरी रोज काही ठराविक काळ तो रियाज करतोच. खेळाडूलाही असा नियमित सराव आवश्यक आहे; पण तिथेच ' आपले खेळाडू कमी पडतात असे मतही त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रातील क्रिकेटचा दर्जा सुधारण्यासाठी शाळा–कॉलेजच्या संघांना तसेच महाराष्ट्राच्या संघालाही योजनापूर्वक प्रशिक्षण द्यायची गरज त्यांना वाटते. त्यासाठी जुन्या अनुभवी खेळाडूंचा उपयोग करून घ्यायला हवा म्हणजे पुढील ४–५ वर्षांत परिस्थितीत नक्की सुधारणा होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला; पण यासाठी प्रथम राजकारण संपायला हवे. राजकारणामुळे जर प्रो. देवधरांसारख्या ज्येष्ठ खेळाडूला कटू अनुभव येतो तर मग इतरांची काय कथा ? म्हणून खेळाच्या प्रगतीसाठी निकोप वातावरण हवे, असेही त्यांनी प्रतिपादन केले.

महाराष्ट्राच्या क्रिकेटसंघटनेतील राजकारण कोणत्या थराला गेले आहे हे सांगताना श्री. नाना जोशी यांनी एक किस्सा सांगितला. ते महाराष्ट्राच्या संघाबरोबर व्यवस्थापक म्हणून बंगलोरला एका सामन्यासाठी गेले होते. या सामन्यात एका खेळाडूने सामना चालू असताना ' ड्रिंक्स ' घेतली. याच्याविरुद्ध अर्थातच श्री. नाना जोशींनी तक्रार केली; पण त्या खेळाडूविरुद्ध कारवाई तर दूरच राहिली, उलट जोशींनाच त्यांची तक्रार मागे घ्यायला भाग पाडले गेले ! त्यानंतर त्यांनी संघटनेशी असलेले आपले संबंध तोडून टाकले.

क्रिकेटमध्ये यश मिळण्यासाठी शिस्त अतिशय महत्त्वाची मानली जाते; पण महाराष्ट्र क्रिकेट संघटना मात्र शिस्तीला कितपत महत्त्व देते हे स्पष्ट करायला हे एकच उदाहरण पुरेसं आहे.

—सीमा कुलकर्णी

वातावरणाशी खेळाडूंच मानसिकदृष्ट्या जमून जाणं, त्या दृष्टीनं त्याचा खेळ अधिक मॅच्युअर होणं यासाठी एकापेक्षा जास्त संधीची आवश्यकता आहे; पण दुर्दैवानं महाराष्ट्राच्या खेळाडूंना सदोष निवड-पद्धतीमुळं याचा लाभ झालेला नाही आणि त्यामुळं आत्मविश्वास वाटणं तर दूरच, असेल नसेल त्या आत्मविश्वासाचंही खच्चीकरण होतं. साहजिकच आज महाराष्ट्र संघाच्या किंवा खेळाडूंच्या जडण-घडणीत महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचा सक्रिय सहभाग किती याची शंका यावी इतपत परिस्थिती आहे. आपल्या जास्तीत जास्त खेळाडूंचा कसोटी–क्रिकेटमध्ये समावेश व्हावा म्हणून धडपडणाऱ्या इतर संघटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशननं स्वीकारलेलं हे उदासीन धोरण चांगलच खटकतं. एके काळी चेतन चौहान आणि विजय हजारेंच्या बाबतीत महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशननं असंच वेडं धोरण स्वीकारलं होतं. तेव्हा चेतन चौहान आणि विजय हजारे महाराष्ट्राबाहेर पडले आणि सुरुवातीलाच घेतलेल्या या निर्णयानं त्यांच्या आयुष्याचं सोनं झालं. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशननं ज्या चेतन चौहानचं लोणचं घालून ठेवलं होतं, त्याच चौहानला बेदीनं झटक्यासरशी उचललं; पण एखादा चेतन चौहान किंवा एखादे विजय हजारे अशी चौकट तोडून बाहेर जाऊ शकतात. इतरांचं काय? ज्यांना हे शक्य नव्हतं त्या पांडुरंग साळगावकर, विठ्ठल जोशी, अन्वर शेख यासारख्या खेळाडूंचं काय झालं? त्यांची नावं काळाच्या उदरात केव्हा आणि कशी गडप झाली कळलंच नाही. चेतन चौहान किंवा विजय हजारेंच्या रूपानं एक खदखदणारा इतिहास ढळढळीतपणे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आणि क्रिकेटशौकीन यांच्यासमोर उभा असताना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचा ढिलेपणा थोडाफारही कमी होऊ नये किंवा आपल्या धोरणात बदल घडवून आणण्याचा प्रयत्नही होऊ नये, हे सारंच कोड्यात टाकणारं आहे.

## प्रसिद्धी नाही !

महाराष्ट्राचे खेळाडू वर्तमानपत्राकडूनही उपेक्षित राहतात, हीही त्यांची एक खंत आहेच. त्यांच्या मते, या क्षेत्रात योग्य ती प्रसिद्धी झाल्याशिवाय काही तरणोपाय नाही. आम्ही खूप धावा काढल्या, बळी घेतले, पण आमची कामगिरी लोकांच्या डोळ्यासमोरच आली नाही तर काय उपयोग? त्यामुळं तुम्ही सतत प्रसिद्धीच्या झोतात राहणं, तुमच्या नावाची सतत चर्चा होत राहणं अतिशय आवश्यक आहे. खेळाडूंची कामगिरी, प्रतिमा जर सतत डोळ्यासमोर राहली तर त्यातूनच एखादी बहुमूल्य संधी फटकन मिळूनही जाते; पण इथंच तर फार मोठी शोकांतिका आहे. महाराष्ट्राखेरीजच्या वर्तमानपत्रात आम्हाला स्थान नाही आणि महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांना आमच्याविषयी आस्था नाही. पूर्वी निदान नवीन लोकांचा परिचय यायचा, वर्तमानपत्रातून फोटो यायचे, तेव्हा थोडे-फार खेळाडू तरी माहिती होते. आता ती पद्धत तर पूर्ण बंद झालीय. कसोटी सामन्यांखेरीजच्या सामन्यांचं वर्णन बहुतेक येत नाहीच आणि आलं तरी अगदी छोटसं– कळेल न कळेल असं. त्यातही महाराष्ट्राखेरीजच्या खेळाडूनं आणि महाराष्ट्राच्या खेळाडूनं दोघांचीही कामगिरी सारखी असली तरी खेळाडूंची कामगिरी ही हेडलाइन कधीच नसते. एवढंच काय पण सामन्यांच्या वेळेस प्रेसफोटोग्राफर्सही इतर खेळाडूंचे फोटो घेण्यात गुंतलेले असतात; पण आमच्याकडे कुणाचं लक्षही नसतं. इथं प्रश्न फक्त फोटो येण्याचा नाही, तर अशा प्रसंगामधून आमची जी उपेक्षा होते त्याची खंत वाटते.

## सापत्न वागणूक

महाराष्ट्राच्या खेळाडूंची दुर्दशा इथवरच संपत नाही, तर एकच सामना खेळावयास आलेल्या दोन संघामध्येही जेव्हा दुजाभाव केला जातो– तेव्हा ही उपेक्षेची भावना अधिकच बळावते. या गैरसोयी कुठल्या टोकाला जाऊन पोचतात याबाबतचा एक किस्सा मुद्दाम लिहिण्याजोगा. मुंबईविरुद्ध होणाऱ्या रणजी सामन्यासाठी मिलिंद गुंजाळ व रमेश बोर्डे यांना नांदेडला जायचं होतं त्या वेळेस या प्रवासाची व्यवस्था मुंबई क्रिकेट असोसिएशनतर्फे केली जाईल असं महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून सांगण्यात आलं. प्रत्यक्षात तिथं मुंबई संघाची प्रथम वर्गाच्या रिझर्व्हेशनसकट सर्व अपटूडेट व्यवस्था होती. पण या दोघांचं रिझर्व्हेशन तर राहिलं, पण साध्या तिकिटाचीही व्यवस्था नव्हती. तीही सारी व्यवस्था त्यांनी आपणहूनच केली आणि बसायलाच काय पण उभं राहायलाही धड जागा नाही अशा भयंकर गर्दीत आणि भयंकर थंडीतून प्रवास करत ते मुक्कामस्थळी पोचले. कोल्हापूरला झालेल्या सामन्याच्या वेळेस दुसऱ्या संघाला कोल्हापूरला जाण्यासाठी खास आरामगाडीची सोय होती, हे खेळाडू एस्. टी. नं गेले. त्यांना ग्राउंड ते निवासाचं स्थान इथपर्यंतच्या प्रवासासाठी खास बस देण्यात आली होती, तर या खेळाडूंना 'चालक शिकत आहे' ची खटारा-गाडी! अशा गैरसोयींना तर नेहमीच तोंड द्यावं लागतं आणि या सगळ्याचं समर्थन केलं जातं ते महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनची आर्थिक बाजू कमजोर असल्याचा दावा करून! पण इतर क्रिकेटसंघटनांची आर्थिक बाजू चांगली असताना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचीच अशी अवस्था का असावी? आणि ही कमजोरी दूर करण्यासाठी 'काही प्रयत्न केले का? आणि केले असल्यास कोणते? हे सारेच प्रश्न अनुत्तरित राहतात. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचा सुवर्णमहोत्सव दृष्टिक्षेपात असतानाही (१९८४ मध्ये) त्याची ही अवस्था असावी याचे आश्चर्य वाटल्याखेरीज राहत नाही.

## व्यावसायिक दृष्टिकोन नाही !

मुंबईत चांगले चांगले खेळाडू निरनिराळ्या कंपन्याकडून किंवा उद्योगसमूहाकडून ताबडतोब उचलले जातात. साहजिकच या खेळाडूंची आर्थिक बाजूची सोय लागल्यानंतर ते पूर्णपणे खेळावरच आपलं लक्ष केंद्रित करू शकतात कारण क्रिकेट हा खेळ full time job सारखा आहे नोकरी, मग नोकरीच्या पाठोपाठ येणारी टेन्शन्स, कष्ट हे सारं सांभाळून फावल्या वेळात क्रिकेट हे शक्य नाही. त्यामुळे याबाबतीत महाराष्ट्राचे खेळाडू कमनशिबीच! वास्तविक पुण्यातही नामवंत कंपन्या किंवा उद्योगसमूह काही कमी नाहीत; पण अमुक एक जण क्रिकेटियर आहे म्हणून मुद्दाम त्याला नोकरी द्यायची हा दृष्टिकोनच इथे नाही आणि खेळाडूंना फायदा व्हावा म्हणून येन केन प्रकारेण किर्लोस्कर, टेल्को, गरवारे यासारख्या उद्योगसमूहांना आपल्यात सामावून घेण्याच्या कामी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशननेही कधी पुढाकार घेतला नाही. अर्थात इतके दिवसांची ही बिकट परिस्थिती थोडीफार निवळते आहे. बँका या कामी पुढाकार घेऊ लागल्या आहेत, त्यामुळे या परिस्थितीत थोडाफार बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## मराठी बाणा ?

या सगळ्या परिस्थितीत मराठी बाणा (मुसंडी मारणं स्वभावातच नाही!) कितपत कारणीभूत होतो? असा एक प्रश्न होता आणि त्याला उत्तर मिळालं, 'इथं महाराष्ट्रियन बाणा किंवा स्वभाव याचा काही प्रश्नच येत नाही. कारण एखादा खेळाडू वर यायचा असेल तर निवडसमिती, खेळाडू आणि पत्रकार या सगळ्यांचं कोऑर्डिनेशन योग्य प्रकारे जमलं पाहिजे!' □

# विश्वसंघाची निवड

जून १९८३ मध्ये इंग्लंडमध्ये तिसऱ्या प्रुडेन्शिअल चषकासाठी क्रिकेट खेळणाऱ्या आठ प्रमुख राष्ट्रांमध्ये लढती झाल्या. मर्यादित षटकांचे हे सामने प्रत्यक्ष पहाण्याची संधी प्रसिद्ध क्रीडापत्रकार चंद्रशेखर संत यांना मिळाली. जगातील प्रमुख क्रिकेटपटूंच्या या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारावर ११ सर्वोत्तम खेळाडूंचा विश्वसंघ निवडण्याची विनंती आम्ही त्यांना केली. संत यांनी केलेली ही विश्वसंघाची निवड ...

□

चंद्रशेखर संत

जगातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्व नामवंत व प्रमुख क्रिकेटपटूंचा खेळ बघण्याची संधी मिळते ती दर चार वर्षांनी होणाऱ्या विश्वचषक क्रिकेटस्पर्धेच्या वेळी. या स्पर्धेचा सोहळा म्हणजे प्रत्येक क्रिकेट-शौकिनाच्या दृष्टीने अतिशय उत्सुकतेचा. इंग्लडमध्ये होणाऱ्या या स्पर्धेपैकी जगातील आजी–माजी क्रिकेटपटूंना बघण्याची–भेटण्याची संधी ही माझ्यासारख्याला तर अगदी सुवर्णसंधी; पर्वणीच म्हणायला पाहिजे ...आणि ही संधी मला यंदाच्या विश्वचषक स्पर्धेवेळी मिळाली.

याआधी दोन्ही वेळी (१९७५ व ७९) विश्वचषक क्लाइव्ह लॉइडच्याच वेस्ट-इंडीज संघाने जिंकला होता. यंदाही पुन्हा एकदा ही स्पर्धा जिंकून अजिंक्यपदाची सुंदर हॅट ट्रिक साधण्याच्या आकांक्षेने हा संघ स्पर्धेत उतरला होता विंडीजसह भारत ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, न्यूझीलंड, श्रीलंका, झिम्बाब्वे व यजमान इंग्लंड या ८ संघांत विजेतेपदासाठी चुरस होती.

भारत आणि झिम्बाब्वे यांच्याशिवाय इतर सर्व संघांना ही स्पर्धा जिंकण्याची कमी अधिक शक्यता असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती; पण म्हणतात ना 'क्रिकेट इज ए गेम ऑफ चान्स', 'अनसर्टन्टी दाऊ नेम इज क्रिकेट'... क्रिकेटमध्ये कधी काय होईल हे सांगता येत नाही आणि तेच यंदा दिसून आले. भारताने विश्वचषकस्पर्धा जिंकून साऱ्यांनाच आश्चर्याचा जबरदस्त धक्का दिला.

या स्पर्धेतील सामने प्रत्यक्ष बघितल्यावर सर्वोत्तम जागतिक संघ आणि तोही अर्थातच मर्यादित षटकांच्या सामन्यासाठी निवडायचे ठरवले. पण एखाद्याने तशा प्रयत्नास सुरुवात केली तर हे काम किती कठीण आहे हे कळून येईल. कारण ८ संघातील ८८ नामांकित क्रिकेटपटूंतून सर्वोत्तम असा ११ जणांचा संघ निवडायचा आहे.

## कर्णधार

सुरुवात अर्थातच कर्णधार कोण असावा यापासून करावी लागेल. कारण आपल्या निवडसमितीचा नियमच आहे की, आधी कर्णधाराची निवड करायची व मग संघातील इतर खेळाडूंची नावे जाहीर करायची. आता कर्णधारपदाच्या नावासाठी क्लाइव्ह लॉइड, कपिलदेव निखंज, इम्रानखान नियाझी, इयान बोथम, सुनील गावस्कर हे उमेदवार दिसतात यापैकी बोथम आणि गावस्कर हे तर यंदा आपापल्या म्हणजे इंग्लंड व भारत संघांच्याही नेतेपदी नव्हते. त्यामुळे त्यांची नावे स्वाभाविकपणेच मागे ठेवावी लागतील. मग राहिली लॉइड-कपिल-इम्रान यांची नावे आणि या त्रयीत मी जर कर्णधार म्हणून क्लाइव्ह लॉइडची निवड केली तर मला वाटत माझ्याशी बरेचजण सहमत होतील. कारण खेळाडू म्हणून काय किंवा कर्णधार म्हणून काय क्लाइव्ह लॉइडचे अनुभवविश्व कपिल व इम्रान यांच्यापेक्षा खूपच दांडगे आहे, समृद्ध आहे. या अनुभवाच्या जोडीला लॉइडविषयी जेवढा आदर इतर खेळाडूत आहे, तेवढा कपिल–इम्रान मिळवू शकतील असे मला वाटत नाही. तेव्हा पहिल्या तिन्ही विश्वचषक क्रिकेटस्पर्धांत वेस्ट इंडीजचे नेतृत्व करणारा क्लाइव्ह लॉइड हाच मी निवडलेल्या सर्वोत्तम जागतिक संघाचा कर्णधार असेल.

## यष्टिरक्षक


कर्णधारपदाची निवड झाल्यावर आता अर्थातच प्रश्न आहे तो यष्टिरक्षकाचा. यष्टिरक्षकाच्या जागेबाबत भारताचा सईद किरमाणी, ऑस्ट्रेलियाचा रॉडनी मार्श व पाकिस्तानचा वसिम बारी यांच्यात चुरस आहे. या तिघांच्याही यष्टिरक्षणाचा दर्जा जवळजवळ सारखाच आहे. किरमाणी काय, मार्श काय किंवा बारी काय निव्वळ यष्टिरक्षणाबाबत तरी या तिघात डाव–उजवं करणं कठीण आहे; पण फलंदाजीत किरमाणीची कामगिरी मार्श व बारी या दोघांपेक्षाही सरस ठरली आहे. त्यामुळे या तिघांतून मी तरी किरमाणीलाच यष्टिरक्षक म्हणून निवडणे पसंत करीन. अर्थात वेस्टइंडीजचा जेफ दूजाँ याचाही विचार करावा लागेल; पण विश्वचषक क्रिकेटस्पर्धेत काय किंवा एरवीही दूजाँचे यष्टिरक्षण आजच्या घडीला तरी किरमाणी–बारी–मार्श यांच्या तोडीचे आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे यष्टिरक्षकाची जबाबदारी अनुभवी किरमाणीवरच सोपवणे श्रेयस्कर आणि इथे एका गोष्टीचाही उल्लेख जरूर करायला हवा व तो म्हणजे ऑस्ट्रेलियाचा रॉडनी मार्श-पूर्वी-दोन वर्षांपूर्वीच्या काळात तडाखेबंद फटकेबाजी करीत असे; पण आता मात्र तो थोडासा थकल्यासारखा वाटतो आणि म्हणून आज तरी त्याची संघात निवड होऊ शकत नाही.

कर्णधार आणि यष्टिरक्षक या दोन महत्त्वाच्या, अतिशय जबाबदारीच्या स्थानां-

साठी खेळाडूंची निवड जाहीर झाल्यानंतर आता इतर जागांसाठी विचार करता येईल.

## आघाडीचे फलंदाज

सलामीच्या जोडीसाठी अर्थातच जगातील बहुतेक क्रिकेटरसिकांची निवड एकच असेल ती म्हणजे सुनील गावस्कर व गॉर्डन ग्रीनिज. मर्यादित षटकांच्या सामन्यासाठीसुद्धा सुनील गावस्कर कशाला असा प्रश्न काही जणांच्या मनात येईल. या प्रश्नाला उत्तर असे की, समजा डाव डगमगायला लागला, तीन-चार गडी भराभर बाद झाले, तर दुसरीकडून सुनील गावस्कर एक बाजू लावून धरण्याचे काम निश्चित बजावू शकेल आणि तो षटकारांची आतषबाजी करू शकला नाही तरी षटकार म्हणजेच सारे काही नाही. एक-एक, दोन दोन धावा घेऊनही धावफलक सतत हलता ठेवता येतो आणि षटकामागे ४–५ धावांची गती राखता येते. या दृष्टीने सुनील गावस्करचा संघातील समावेश निश्चितच लाभदायक ठरेल. शिवाय काही वेळा परिस्थिती हाताबाहेर जात असताना कर्णधाराला कोणा तरी अनुभवी सल्लागाराची मैदानावर गरज भासते आणि ही गरज सुनील गावस्कर नक्कीच पूर्ण करू शकतो. तेव्हा सुनीलची निवड क्रमांक एकचा फलंदाज म्हणून केल्यानंतर त्याचा सलामीचा भागीदार-जोडीदार म्हणून गॉर्डन ग्रीनिजला पर्याय नाही. ग्रीनिजची चौफेर फटकेबाजी, चेंडू क्षेत्ररक्षकांच्या डोक्यांवरून टोलवायची त्याची हातोटी, सणसणीत–खणखणीत फटके आणि या साऱ्यांच्या जोडीला सलामीच्या फलंदाजाला अतिशय आवश्यक असणारा आत्मविश्वास, शांत–स्थिर वृत्ती यामुळे ग्रीनिजची निवड अपरिहार्य आहे. गावस्कर–ग्रीनिज यांची सलामीच्या जोडीत निवड झाल्यामुळं ग्लेन टर्नर–श्रीकांत–डेस्मंड हेन्स–मोहसिन-खान यांची नावे मागे ठेवावी लागतील. एरवी सलामीच्या जोडीत जेफ बॉयकॉटचा उल्लेख करावा लागेल; पण मर्यादित षटकांच्या सामन्यात मात्र बॉयकॉटच्या बॅटनं अजून तरी खास अशी कामगिरी करून दाखवलेली नाही. शिवाय वर्णद्वेषी गोऱ्या दक्षिण आफ्रिकेत खेळल्यामुळं बॉयकॉटला इंग्लंडनंही डच्चू दिला आहे. त्यामुळं तो या शर्यतीतून बाहेर फेकला गेला आहे.



**व्हिव्हियन रिचर्डस् : तिसऱ्या क्रमांकासाठी वादातीत निवड**

तिसऱ्या क्रमांकासाठी खेळाडूची निवड आज अगदी कोणताही क्रिकेटशौकीन एकमुखी करील ती व्हिव्हियन रिचर्डस्‌चीच. फलंदाजीचा राजा असणाऱ्या रिचर्डसची निवड वादातीतच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## मधली फळी

तिसऱ्या क्रमांकानंतर आता चौथ्या क्रमांकावर कोण याची उत्सुकता वाटणे स्वाभाविक आहे. या क्रमांकासाठी मी मोहिंदर अमरनाथचेच नाव सुचवेन. कारण यंदाच्या विश्वचषक क्रिकेटस्पर्धेतील मोहिंदर अमरनाथच्या फलंदाजीचे अतिशय सार्थ शब्दात वर्णन कोणी केले असेल तर ते वेस्ट इंडीजचा जलदगती गोलंदाज जोएल गार्नर याने. अंतिम सामन्याआधीच्या दिवशी लॉर्डसवर माझ्यासारख्या भारतीय क्रीडा–पत्रकारांसह वेस्ट इंडीज–न्यूझीलंड–श्रीलंका–ऑस्ट्रेलिया–इंग्लंड–पाकिस्तान या साऱ्या देशातील क्रीडापत्रकारांशी मनमोकळच्या गप्पा मारताना गार्नर म्हणाला होता, 'आजच्या घडीला सर्व गोलंदाजांना सर्वांत चांगल्या प्रकाराने, आत्मविश्वासाने तोंड देणारा फलंदाज म्हणजे भारताचा 'जिमी' मोहिंदर अमरनाथ !' फलंदाजीबरोबरच मोहिंदरचा उपयुक्त गोलंदाज असाही उल्लेख करता येईल. त्यामुळं मोहिंदरचा संघातील समावेश अगदी अटळच आहे. मोहिंदरनंतर पाचव्या क्रमांकावर क्लाइव्ह लॉइडच स्वत:

# भारतीय कप्तानांची कामगिरी

**प्रतिस्पर्धी संघ**

( वि=विजयी, ब=बरोबरी, प=पराभूत )

| नाव | पहिली कसोटी | शेवटची कसोटी | इंग्लंड | | | ऑस्ट्रेलिया | | | विंडीज | | | पाक | | | न्यूझीलंड | | | श्रीलंका | | | एकूण | | | एकूण सामने |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वि | ब. | प. | वि | ब | प | वि. | ब | प. | वि | ब. | प. | वि. | ब | प. | वि. | ब. | प. | वि. | ब. | प | |
| सी. के. नायडू | जून ३२ | फेब्रु. ३४ | – | १ | ३ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | १ | ३ | ०४ |
| महाराज विझी | जून ३६ | ऑग. ३६ | – | १ | २ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | १ | २ | ०३ |
| पतौडी ( सि. ) | जून ४६ | ऑग. ४६ | – | २ | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | २ | १ | ०३ |
| लाला अमरनाथ | डिसे. ४७ | डिसे. ५२ | – | – | – | – | १ | ४ | – | ४ | १ | २ | २ | १ | – | – | – | – | – | न | २ | ७ | ६ | १५ |
| विजय हजारे | नोव्हें. ५१ | मार्च ५५ | १ | ४ | ४ | – | – | – | – | ४ | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | १ | ८ | ५ | १४ |
| विनू मकड | जाने ५४ | फेब्रु ५४ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ५ | – | – | – | – | – | – | – | – | ५ | – | ०५ |
| गुलाम महमद | नोव्हें. ५५ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | १ | – | – | – | – | – | १ | – | ०१ |
| पॉली उम्रीगर | डिसें ५५ | फेब्रु ५९ | – | – | – | – | १ | २ | – | १ | ३ | – | – | – | २ | २ | – | – | – | – | २ | ४ | ५ | ११ |
| हेमू अधिकारी | नोव्हें ५८ | – | – | – | – | – | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | १ | – | ०१ |
| डी. के. गायकवाड | जून ५९ | ऑग. ५९ | – | – | ४ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ४ | ०४ |
| पकज रॉय | जून ५९ | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | १ | ०१ |
| जी. एस रामचद | डिसें. ५९ | जाने. ६० | – | – | – | १ | २ | २ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | १ | २ | २ | ०५ |
| नरी कॉट्रॅक्टर | डिसें ६० | मार्च ६२ | २ | ३ | – | – | – | – | – | – | २ | – | ५ | – | – | – | – | – | – | – | २ | ८ | २ | १२ |
| पतौडी ( ज्यू ) | मार्च ६२ | जाने. ७५ | – | ५ | ३ | २ | २ | ७ | २ | १ | ७ | – | – | – | ५ | ४ | २ | – | – | – | ९ | १२ | १९ | ४० |
| चदू बोर्डे | डिसें. ६७ | – | – | – | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | १ | ०१ |
| अजित वाडेकर | फेब्रु. ७१ | जुलै ७४ | ३ | ४ | ४ | – | – | – | १ | ४ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ४ | ८ | ४ | १६ |
| वेंकटराघवन् | डिसे ७४ | ऑग. ७९ | – | ३ | १ | – | – | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ३ | २ | ०५ |
| सुनील गावस्कर | जाने. ७६ | फेब्रु ८३ | १ | ७ | १ | ३ | ५ | १ | १ | ५ | – | २ | ६ | ३ | १ | २ | १ | – | १ | – | ८ | २६ | ६ | ४० |
| बिशन बेदी | फेब्रु. ७६ | नोव्हे. ७८ | १ | १ | ३ | २ | – | ३ | १ | १ | २ | – | १ | २ | २ | २ | १ | – | – | – | ६ | ५ | ११ | २२ |
| गुडप्पा विश्वनाथ | नोव्हें ७९ | फेब्रु. ८० | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ | – | – | – | – | – | – | – | – | १ | १ | ०२ |
| कपिल देव | फेब्रु. ८३ | ? | – | – | – | – | – | – | – | ५ | ४ | – | ३ | – | – | – | – | – | – | – | – | ८ | ४ | १२ |
| | जून ३२ | नोव्हे ८३ | ८ | ३१ | २८ | ८ | ११ | २० | ५ | २६ | २१ | ४ | २३ | ६ | १० | ११ | ४ | – | १ | – | ३५ | १०३ | ७९ | २१७ |


संकलक : अशोक पानवलकर

फलंदाजीला येईल. लॉइडचे वैशिष्टय असे की, परिस्थितीनुरूप तो आपल्या फलंदाजीच्या तंत्रात–शैलीत बदल करू शकतो. लॉइड धीमा खेळही करू शकतो आणि उत्तुंग टोलेबाजीही करू शकतो.

लॉइडनंतर सहाव्या क्रमांकासाठी ज्याची निवड मी केली आहे ते नाव ऐकून कदाचित काही जणांच्या भुवया वर जातील. या खेळाडूला यंदाच्या विश्वचषक क्रिकेट-स्पर्धेत काही सूर सापडला नव्हता; पण हा थोर अष्टपैलू खेळाडू एक दिवसाच्या काय किंवा पाच दिवसांच्या सामन्यात काय आपल्या संघात असावा असे प्रत्येक कर्णधाराला वाटत असेल. आणि हा तडाखेबंद अष्टपैलू खेळाडू म्हणजे इयान बोथम ! खेळाचे चित्र पार पालटून टाकण्याची ताकद ज्या मोजक्या क्रिकेटपटूंत आहे त्यात बोथमचं नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. गोलंदाजी–फलंदाजी–क्षेत्ररक्षण या तिन्ही प्रकारांत बोथम नेहमी या ना त्या प्रकारे प्रकर्षाने चमकत असतोच. तेव्हा माझ्या सर्वोत्तम जागतिक संघात बोथम असणारच !

## अचूक गोलंदाज

सातव्या क्रमांकासाठी आहे कपिलदेव निखंज. अष्टपैलू कपिलदेवच्या निवडीसाठी फारशी कारणं द्यायची गरज नाही. कारण आकर्षक फटकेबाजी–भेदक गोलंदाजी याबाबत कपिल बोथमच्या जवळजवळ तोडीस तोड आहे असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती म्हणता येणार नाही. कपिलनंतर आठव्या क्रमांकावर येईल इम्रानखान. बोथम–कपिलसह इम्रानखानही आपल्या संघात असल्यावर काय बहार येईल याची प्रत्येकाने केवळ कल्पना करून बघावी. या तिघांचा एकाच संघात समावेश असावा याशिवाय दुसरी



क्लाइव्ह लॉइड
कुशल नेतृत्व व विश्वसनीय फलंदाजी

¤

आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट ती कोणती ?

इम्रानखान आठव्या क्रमांकावर आल्यावर नवव्या क्रमांकासाठी माझी निवड असेल रिचर्ड हॅडली. बोथम–इम्रान–कपिल यांच्याच पठडीतला हा एक अतिशय गुणी खेळाडू. न्यूझीलंडच्या अनेक विजयांत त्याने मोठा वाटा उचलला आहे. गोलंदाजीबरोबरच त्याची दमदार फलंदाजीही बघण्यासारखी असते.

दहाव्या क्रमांकावर अर्थातच यष्टिरक्षक किरमाणी येईल आणि अकराव्या क्रमांकावर मायकेल होल्डिंग. आता विलीस–गार्नर–मार्शल–रॉबर्टस आणि ऑस्ट्रेलियाचे डेनिस लिली व जेफ थॉमसन यांच्याऐवजी मी होल्डिंगची निवड कशी केली याबाबत अनेकांना आश्चर्य वाटेल; पण याचे उत्तर असे की, इतर गोलंदाज चेंडू वेगात टाकू शकतील; पण अचूक वेगवान गोलंदाजी करण्यात होल्डिंगचा हातखंडा आहे आणि फलंदाजाचा कच्चा दुवा नेमका शोधून काढून त्याला जाळ्यात पकडण्यात होल्डिंग अगदी वाकबगार आहे आणि त्यामुळेच या हुशार, अचूक वेगवान गोलंदाजाची निवड मी केली आहे.

तर हा माझ्या दृष्टीने मर्यादित षटकांच्या सामन्यातील सर्वोत्तम असा संघ. अर्थात या संघात ग्रेग चॅपेलचा समावेश करणे मला केव्हाही आवडेल. कारण या शैलीदार, दर्जेदार खेळाडूला कोणी डावलू शकत नाही; पण यंदाच्या विश्वचषकस्पर्धेत त्याने भाग घेतला नव्हता व केवळ त्यामुळेच त्याचा संघात समावेश नाही. या संघात एकही निव्वळ फिरकी गोलंदाज नाही; पण त्याची आवश्यकता वाटलीच तर रिचर्डस् ऑफ स्पिन मारा बऱ्यापैकी करू शकतो. जाता जाता इथे एक गोष्टही मला स्पष्ट करावीशी वाटते की,- हा जागतिक संघ निवडताना हा विंडीजचा, हा पाकचा, हा भारताचा असा विचार केलेला नाही. केवळ गुणवत्तेचाच विचार माझ्या परीने मी केला आहे. त्यामुळे या विश्वसंघात जगातील सर्व संघातील किमान एक तरी खेळाडू असावा असे म्हणणे मला तरी पटत नाही आणि केवळ गुणवत्ताच लक्षात घेतली असल्यामुळे मी निवडलेल्या या सर्वोत्तम संघात ऑस्ट्रेलिया–झिम्बाब्वे व श्रीलंकेचा एकही खेळाडू दिसत नाही.

... तर माझ्या दृष्टीने मर्यादित षटकांच्या सामन्यांसाठी जगातील सर्वोत्तम संघ असा–फलंदाजीच्या क्रमानुसार पुढीलप्रमाणे-सुनील गावस्कर, गॉर्डन ग्रीनिज, व्हिव्हियन रिचर्डस्, मोहिंदर अमरनाथ, क्लाइव्ह लॉइड (कर्णधार), इयान बोथम, कपिलदेव निखंज, इम्रानखान नियाझी, रिचर्ड हॅडली, सईद किरमाणी व मायकेल होल्डिंग. □

# फॉरवर्ड शॉर्ट लेगवरून

एकनाथ सोलकर हा फॉरवर्ड शॉर्ट लेगवरील जगातला एक सर्वोत्तम क्षेत्ररक्षक. भारताच्या प्रसिद्ध फिरकी गोलंदाजांच्या यशात सोलकरच्या क्षेत्ररक्षणाचा फार मोठा वाटा होता. खडतर परिस्थितीशी झगडून सोलकरने एक अष्टपैलू कसोटी क्रिकेटपटू म्हणून नाव कमावले. मुंबईच्या हिंदू जिमखान्यावरील आपल्या लहानपणच्या व १९७१ च्या विजयाच्या स्मृती सोलकरने येथे चित्रित केल्या आहेत. त्या शब्दबद्ध केल्या आहेत क्रीडापत्रकार चंद्रशेखर संत यांनी.

☐

एकनाथ सोलकर

'एकनाथ पुढे नक्की मोठा क्रिकेटपटू होणार', 'माझं नाव काढणार'— असे उद्‌गार माझे बाबा नेहमी काढत असत आणि त्याचे ते बोल नतर अक्षरशः खरे ठरले. क्रिकेटसाठी लागणारी इतर साधन-सामग्री तर बाजूलाच राहू द्या, धड सरावही करण्याची सधी न मिळू शकणारा माझ्या-सारखा मुलगा पुढे निश्चितपणे चांगला क्रिकेटपटू होईल हा वडिलाचा विश्वास सार्थ ठरला आणि खरंच सागतो, मी कसोटी-क्षेत्रात पदार्पण केलं ते बघायला माझे वडील नव्हते याची रुखरुख मला नेहमीच वाटून जाते.

### हिंदू जिमखान्यावरचे दिवस

अजूनही मला लहानपणचे, त्या वेळचे दिवस चागलेच आठवतात. हिंदू जिमखान्या-च्याच मागे आम्ही रहात असू माझे बाबाही तिथेच काम करीत असत. शिवाय क्रिकेट व क्रिकेटची खेळपट्टी याची त्याना चागली जाण असल्यामुळे आपोआपच मीही क्रिकेट-कडे आकर्षित झालो यात नवल नव्हते; पण त्या वेळी मी जो सराव करायचो तो विशेष सागण्यासारखा आहे. हिंदू जिमखान्याच्या एका कोपऱ्यात एक खाब होता. मग काय, हाच तो खाब आमच्या यष्टी समजून आम्ही मुलं-मुलं क्रिकेट खेळत असू.


शेजारीच हिंदू जिमखान्यावर नेट लाग-लेलं असे त्यात सराव करणारे खेळाडू बघून मला त्यांचा हेवा वाटायचा. आपल्यालाही असा सराव करण्याची संधी मिळायला हवी असं त्या वेळी माझ्यासारख्या अनेकांना वाटून जात असे; पण आम्हाला त्या वेळी एवढी मोठी संधी मिळणार कशी ? अशी सधी देणार तरी कोण ? त्या नेटमध्ये फलदाजीसाठी वाव मिळणे केवळ अशक्य होते. मग मी हळूहळू गोलदाजी करायला लागलो. माझी गोलदाजी नेटमध्ये सराव करणाऱ्या फलदाजानासुद्धा आवडू लागली. मला अधिकाधिक गोलंदाजी टाकण्यास वाव मिळू लागला. मीसुद्धा माझ्यापरीने जास्तीत जास्त चांगली गोलदाजी करायचा प्रयत्न करून बघत असे.

सुरुवातीला केवळ एका खांबावर गोलं-दाजी करण्याची सवय मला असल्याने, स्वाभाविकपणेच गोलंदाजीत आपोआपच अचूकता आली होती आणि गोलदाजीत एकदा अचूकता आल्यावर मग आपल्याला चेंडू टाकताना विविध प्रयोगही करून बघता येतात. माझ्या बाबतीत नेमका तोच प्रकार घडला.

फलदाजीची संधी मला त्या वेळी मिळत नसल्याने मी गोलंदाजी व गोलदाजी करून झाल्यानतर क्षेत्ररक्षण करण्यावरच विशेष लक्ष देत असे. चेंडू कोणीही किती जोरात फटकावला तरी तो अडवायचाच या निश्च-याने, जिद्दीने मी क्षेत्ररक्षण करीत असे. नेटमध्ये सराव करणारे फलंदाजही मग जास्त खूष होत कारण फलदाजाने जोरात टोलवलेला चेंडू मी झटकन अडवून परत गोलदाजाकडे देत असे ना !

माझ्या क्षेत्ररक्षणाची आणखी एक आठ-वण सागण्यासारखी आहे. हिंदू जिमखान्या-वर रोलर असे. त्या रोलरवर चेंडू फेकून मी झेल घ्यायचा सराव करीत असे. काही वर्षांनंतर जगातील एक उत्तम क्षेत्ररक्षक अशी वाहवा गॅरी सोबर्ससारख्या दैवताकडून मिळवलेल्या माझ्या क्षेत्ररक्षणाची सुरुवात ही अशी होती; पण खरंच सांगतो, कठोर परिश्रमामुळे रोलरवर चेंडू फेकून झेल घेण्याचा पुढे मला फार मोठा फायदा झाला. कारण रोलरवर चेंडू फेकला की, चेंडू नेमका कोणत्या दिशेला, कसा व किती जोरात आणि किती उच किंवा जमिनीलगत येईल हे सागता येत नाही. केवळ सरावाने आणि अनुभवानेच तुम्ही या गोष्टीचा अंदाज बांधू शकता. कसोटी सामन्यात मी नंतर ॲलन नॉट, टोनी लुइस, कीथ फ्लेचर याचे फॉरवर्ड शॉर्ट लेगला जे अतिशय कठीण वाटणारे झेल टिपले त्याच्या पाठीमागे होता रोलरवर चेंडू फेकून झेल घेण्याचा सराव ! या अशा सरावामुळे तुमची नजर तयार होते, शारीरिक हालचाली चपळ होतात आणि चेंडू कोणत्या दिशेला जाईल याचा अदाज मनाशी क्षणार्धात बाधून तुम्ही त्या दिशेने झेप घेऊ शकता.

त्या वेळी आमच्या हिंदू जिमखान्यावर जयदेवसिंग नावाचा एक अतिशय शौकीन क्रिकेट-रसिक येत असे. तो अधूनमधून इग्लडला जात असे आणि त्याच्या बॅटीही अगदी कोऱ्याकरकरीत असत. जयदेवसिंग त्याच्या बॅटना स्ट्रोक्स आणण्यासाठी चेंडू फटकावत असे. त्याने चेंडू जोरजोरात फटकवायचा व मी झेल घ्यायचा किंवा चेंडू अडवायचा असा आमचा उद्योग सुरू असे. माझी क्रिकेटची विलक्षण आवड बघून त्याने मला एकदा त्याची नवी कोरीकरकरीत बॅटही खास बक्षीस म्हणून दिली होती. जयदेवबरोबर केलेल्या या मेहनतीचाही फायदा मला पुढे मोठ्या प्रमाणावर झाला. मी जेव्हा नंतर रणजी व कसोटी सामने खेळू लागलो तेव्हा जयदेव आवर्जून माझ्या



इंग्लंडचा कर्णधार टोनी लुईस याचा झेल एकनाथ सोलकरने पकडला व चेंडू उंच उडवला.

¤

सामन्यांना येत असे व माझे कौतुक करीत असे. मनापासून शाबासकीही देत असे.

आज हिंदू जिमखान्यावर तैरसी क्रिकेट प्रशिक्षण शिबिरात उगवत्या खेळाडूंना मी मार्गदर्शन करीत आहे; पण २० वर्षांपूर्वी मी स्वतः या शिबिराचा एक विद्यार्थी होतो आणि विनू मांकड यांच्यासारखे श्रेष्ठ व ज्येष्ठ अष्टपैलू क्रिकेटपटू आमचे मार्गदर्शक होते. मला विनू मांकड, वसंत अलमाडी व लुमा केणी यांचे जे सुरुवातीच्या काळात मार्गदर्शन लाभले ते अतिशय मोलाचे होते. विनू मांकड यांचा भर तांत्रिक बाबीपेक्षा एखाद्या खेळाडूतील नैसर्गिक गुणवत्ता हेरून त्या गुणवत्तेला खतपाणी घालण्याकडे होता. माझ्या गोलंदाजीवर आणि खास करून क्षेत्ररक्षणावर तर ते विशेष खूष असत.

त्या वेळच्या शालेय जीवनातील क्रिकेटस्पर्धांची आठवण तर मी कधीच विसरू शकत नाही. शरद हजारेच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या आमच्या 'मराठा हायस्कूल'ने त्या वर्षी प्रथमच हॅरिस ढाल क्रिकेटस्पर्धा जिंकली. त्या वेळी आमच्या संघात असणारे हजारे, मी व रामनाथ पारकर नंतर मुंबईतर्फे रणजी सामनेही खेळलो. शरद हजारेची कसोटी–संधी थोडक्यात हुकली; पण मी व रामनाथ पुढे कसोटीही खेळलो. शालेय क्रिकेटस्पर्धेतील माझी चमकदार कामगिरी बघून माझा समावेश मुंबई शालेय संघात करण्यात आला आणि मुंबई शालेय संघातर्फे खेळलेला माझा पहिला सामना मी चांगलाच गाजवला. पुण्याच्या क्लब ऑफ महाराष्ट्रच्या मैदानावर सौराष्ट्राविरुद्ध झालेल्या त्या सामन्यात मी फक्त ११ धावांत ८ गडी गारद केले!

शालेय क्रिकेटस्पर्धातील माझ्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे भारतीय शालेय संघातर्फे श्रीलंका दौऱ्यावर गेलेल्या संघातही माझी निवड झाली. त्या दौऱ्यातही मी इतर सर्वांपेक्षा जास्त म्हणजे २९ बळी मिळवले. तोपर्यंत तरी माझे सारे लक्ष गोलंदाजीवर आणि क्षेत्ररक्षणाकडेच असे. त्या वेळी मी दहाव्या किंवा अकराव्या क्रमांकावर फलंदाजी करीत असे हे आज सांगूनही कोणाला खरं वाटणार नाही. फलंदाजीबाबत मला वसंत अमलाजींनी अनेक बारकावे समजावून सांगितले आणि ते आत्मसात करायचा प्रयत्न केला व मग या फलंदाजी–क्षेत्ररक्षण यांच्या जोरावर कसोटीपर्यंत मजल मारली.

माझ्या कसोटी – जीवनातील पहिल्या सामन्यातील पहिल्या डावाची आठवण काही सुखद नाही. हैदराबादला न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या या कसोटीत पहिल्याच डावात माझ्या नावावर भोपळा लागला. त्या वेळी मी, अशोक मांकड व त्या कसोटीत न खेळणारा पण खास बोलावून घेण्यात आलेला विश्वनाथ असे आम्ही तिघे जण एकाच खोलीत रहात असू. पहिल्याच कसोटीत शून्यावर बाद झाल्यावर मी थोडासा निराश झालो होतो; पण त्या दिवशी कर्णधार

पतौडी व अब्बास अली बेग यानी मला खूप धीर दिला. ' अरे, मोठधा क्रिकेटपटूच्या कसोटी–जीवनाची सुरुवात शून्यावरूनच होते. ' असे त्यांनी मला सागितले. त्या वेळी गोलंदाजीबाबतही मी दुर्दैवी ठरलो. कारण कसोटी-जीवनातील माझ्या पहिल्याच चेंडूवर मला बळी मिळू शकला असता... पण ! न्यूझीलंडच्या ग्रॅहॅम डार्उलिगचा झेल वेंकट-राघवनने सोडला माझा चेंडू स्विप करण्याच्या नादात डार्उलिगचा झेल वेंकटने घेतला आहे असे वाटत असतानाच चेंडू खाली पडला आणि कसोटी–कारकीर्दीतील पहिल्याच चेंडूवर बळी मिळवण्याचा माझा विक्रमही हुकला. पावसाची आम्हाला साथ लाभलेला तो सामना बिशनसिंग बेदीसह नाबाद राहून मी वाचवला, ही गोष्ट मात्र दिलासा देणारी होती.

## पहिला झेल

मी माझ्या आयुष्यात कसोटीत अनेक झेल घेतले; पण मुंबईतील कसोटी सामन्यातील तो पहिलावहिला झेल माझ्याप्रमाणेच ब्रेबॉर्न स्टेडियमवरील ४०–४५ हजार प्रेक्षकांच्यासुद्धा दीर्घकाळ लक्षात राहील असाच होता. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या त्या कसोटीसामन्यात मी राखीव खेळाडूत होतो. मला वाटतं त्या वेळी बहुधा रुसी सुर्ती काही दुखापतीमुळे तवूत परतला होता आणि मला माझ्या मुबईच्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर, दर्दी क्रिकेट रसिकासमोर प्रत्यक्ष मैदानात उतरण्याची संधी मिळाली. कॉनोलीने प्रसन्नाचा चेंडू मिडविकेटच्या दिशेने उंच टोलवला होता. मी जोरात धावत गेलो आणि चेंडू झेलला. मी चेंडू झेलल्याबरोबर टाळ्याचा झालेला प्रचंड कडकडाट, माझे ते प्रचंड कौतुक, मला मिळालेली ती शाबासकी केवळ अवर्णनीय होती.

मी तो झेल घेतला होता तो थेट अगदी ईस्ट स्टॅंडसमोर. काही क्षणात माझ्या मनात विचार तरळून गेला की, हा झेल घेतल्यावर या रसिक जाणकार व उत्तम क्षेत्ररक्षणावर प्रेम करणाऱ्या प्रेक्षकानी माझ कौतुक केल; पण समजा जर झेल सुटला असता तर ईस्ट स्टॅंडमधून माझ्यावर नक्कीच केळयांच्या सालीचा जोरदार वर्षाव झाला असता ! आजही केवळ त्या कल्पनेनेही अंगावर शहारे येतात. मुबईतील जाणकार क्रिकेट प्रेक्षकाच्या साक्षीने घेतलेला तो झेल माझ्या मनाच्या एका कोपऱ्यात खास जागा पटकावून बसला आहे.

क्रिकेटजीवनाच्या सुरुवातीला शालेय स्पर्धात गोलंदाज म्हणून सुरुवात करणारा मी भारतीय सघात अष्टपैलू खेळाडू म्हणून निवडला गेलो खरा; पण त्या वेळी चंद्रशेखर बेदी–प्रसन्ना–वेंकट याच्यासारखे सरस गोलंदाज असल्यामुळे माझ्या फिरकी माऱ्याला वाव मिळणे कठीणच होते. मग मी नवीन चेंडूवर गोलंदाजी करण्याची कलाही अवगत केली. डावखुऱ्या गोलंदाजाची जी नैसर्गिक खुबी–म्हणजे चेंडू उजव्या यष्टीवरून बाहेर काढण्याची कला, मला नीट जमू लागली. मी जेफ बॉयकॉटला अशाच चेंडूवर नेहमी बाद करत असे. बॉयकॉट तर या प्रकाराने वैतागूनच गेला होता. कारण त्याचा जम बसण्याआधीच मी त्याला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवत असे.

१९७०–७१ च्या वेस्ट इंडीज दौऱ्यावर मी ज्या ज्या वेळी फलंदाजीला येई त्या त्या वेळी भारताची अवस्था अतिशय नाजूक असे. ५ बाद ७५, ६ बाद ८० अशा डगमगत्या–कोसळत्या परिस्थितीत मी फलंदाजीला येई; पण मग अगदी शात चित्ताने एक बाजू पकडून खेळत असे. या प्रयत्नात अनेकदा भारताची धावसख्या ३००–३९५ च्या पलीकडेही जात असे. त्या वेळी माझा उल्लेख ' मिस्टर रिलाएबल ' ' मिस्टर डिपेंडेबल ' असा केला जात असे. त्या दौऱ्यात दिलीप सरदेसाई व सुनील गावस्कर यांनीही उत्कृष्ट फलदाजी केली. वेस्टइंडीजविरुद्ध दुसऱ्या कसोटीत व त्यामुळे मालिकेत भारताला विजयश्री मिळाली. वेस्टइंडीजविरुद्धचा पहिला–वहिला विजय मिळवून देण्यात आपलाही हातभार लागला आहे, याचा मला नेहमीच अभिमान वाटत राहिला आहे.

१९७१ हे वर्ष भारतीय क्रिकेटक्षेत्रातील सुवर्णवर्ष म्हणूनच ओळखल जात. अजित वाडेकरच्या नेतृत्वाखाली भारतान आधी वेस्टइडीजविरुद्ध वेस्ट इडीजमध्ये किमया करून दाखविली आणि मग इग्लंडमध्ये इग्लंडला प्रथमच नमवण्याचा चमत्कारही अजित वाडेकरच्याच कर्णधारपदाखाली भारताने त्याच वर्षी करून दाखवला.

## नॉट आउट, कॉट सोलकर

ओव्हलवरील तो सामना कोण कसा विसरू शकेल ? माझ्या दृष्टीन तो सामना आणखीही एका घटनेमुळे कायम लक्षात राहील आणि तो घटना म्हणजे भारत व विजय याच्यामध्ये नेहमीच अडथळा आणणाऱ्या ॲलन नॉटला बाद करण्यात दोन्ही डावात माझा वाटा होता. ह्या सामन्यातील दुसऱ्या डावात इंग्लडची घसरगुडी उडत असताना ॲलन नॉटचा जो झेल मी घेतला, तो माझ्या अनेक चागल्या झेलापैकी एक असे मी मानतो. प्रसगावधान, चपळाई, बेडरपणा स्वत.ला पूर्ण झोकून द्यायची वृत्ती या साऱ्या-साऱ्याचा सगम म्हणजे तो झेल ' असं वर्णन एका क्रीडापत्रकाराने केल. नॉट म्हणजे फिरकी गोलंदाजी आत्मविश्वासाने खेळणारा, फटकेबाजी करणारा खेळाडू.

इंग्लंडच्या दुसऱ्या डावात नॉट फलंदाजीला आला, तेव्हा आम्हा सर्वांच्या मनात एकच विचार होता की, तो लवकर बाद व्हावा. ॲलन नॉट नंतर छान फटकेबाजी करतो; पण त्याची सुरुवात किंचित अडखळती असते, ही गोष्ट मी नीट हेरली होती. फॉरवर्ड शॉर्ट लेग म्हणजे फलदाजाजवळची अगदी धोक्याची जागा. कारण लेगला फलदाज चेंडू केव्हा व कसा खेळेल हे कोणालाच सांगता येत नाही त्यात नॉटसारखा आक्रमक फलंदाज; पण मी ठरवलं की जरा प्रयोग तर करून बघू आणि नेहमीपेक्षा मी अधिकच जवळ जाऊन उभा राहिलो. मग जे काही घडल तो इतिहास आहे साऱ्या इंग्लिश प्रक्षकाना सर्द, गार करणारा आणि भारतीय प्रेक्षकात उत्साहाचे उधाण आणणारा. कारण नॉटचा झेल जमिनीवर पडणार असे वाटत असतानाच मी पुढे जमिनीलगत झेपावलो आणि तो झेल घेतलाही ! अजूनही मला वाटत की मी त्या वेळी फॉरवर्ड शॉर्ट लेगला क्षेत्ररक्षण करताना दोन पावल पुढं जाऊन उभा राहिलो म्हणून आणि केवळ म्हणूनच तो अतिकठीण झेल घेता आला. तो झेल जर सुटला असता, तर कदाचित तो सामनाही भारताच्या हातून सुटला असता. कारण नॉटसारख्या फटकेबाजाने नंतर पुन्हा तशी चूक केली नसती.

इंग्लंडमध्ये इग्लडविरुद्ध मिळवलेल्या त्या ऐतिहासिक विजयामुळे आम्ही अगदी आनदोत्सवात न्हाऊन निघालो होतो, तर विचारा रे इंग्लिवर्थ मात्र अगदी सुन्न होऊन गेला होता कारण इग्लडमध्ये भारताविरुद्ध पराभव पत्करावा लागलाय ही कल्पनाच इंग्लिश लोकांना धक्का देणारी होती. आम्हा सर्वांनाच धुद करणारा तो काळ होता व भारताच्या पाठिराख्यांना दिलासा देणारा .. □

# माधव गोठोस्करांशी बातचीत

कुणीही यावं आणि टपली मारावी अशी हल्ली क्रिकेटपंचांची अवस्था झालीय. कुणीही सोम्या–गोम्या टी. व्ही. बघून पंचांच्या निर्णयावर भाष्य करीत असतो. वृत्तपत्रे, रेडिओ व टी. व्ही. समालोचकही क्रिकेट–पंचांविरुद्ध टीकेचे मोहोळ उठवण्याइतपत खाद्य पुरवत असतात आणि त्यामुळे पांढरा कोट घातलेला क्रिकेटच्या मैदानावरील हा सद्गृहस्थ चक्क खलनायक वाटायला लागतो. कसोटी–सामन्यांतील अनुभवी पंच माधव गोठोस्करांची मुलाखत हे गैरसमज दूर करणारी आहे.

□

दत्ता माडखोलकर

खरं तर क्रिकेटपंच हा क्रिकेटच्या मैदानावरील न्यायाधीशच; पण एकदा त्याला न्यायदानाचा अधिकार दिल्यानंतर या न्यायाधिशाचे निर्णय किती क्रिकेटपटू मुकाटचाने मान्य करतात? सुप्रीम कोर्टा-तल्या न्यायाधिशाप्रमाणे क्रिकेटपंचांचा निर्णय हा अंतिम असतो; पण तरीही बाद झालेला खेळाडू काही वेळा वैयक्तिक स्वार्थापोटी खेळपट्टी सोडताना आपण बाद नसल्याचा देखावा करीत असतो. या देखाव्याचं रेडिओ व टी. व्ही. समालोचक तोंड फाटेपर्यंत वर्णन करीत असतो आणि काही वृत्तपत्रेही या देखाव्याचं रकानेच्या रकाने भरून अवास्तव वर्णन करीत असतात.

त्यामुळं मग सर्वसामान्य माणसांचीही समजूत होते की, फलंदाज खरोखरच बाद नव्हता.

पंचाच्या चुका होत नाहीत असं मला म्हणायचं नाही. सामन्याचा प्रत्येक सेकंद त्याला डोळ्यात तेल घालून अवलोकन करावा लागत असतो. दररोज साडेपाच तास व असे पाच दिवस या काळात पंचाची एकाग्रता ढळण्याची शक्यता असते. त्यामुळं काही वेळा चुकीचे निर्णयही दिले जातात; पण ते हेतुपुरस्सर दिलेले नसतात.

क्रिकेटपंचांविरुद्ध टीकेचं हे मोहोळ अलीकडे म्हणजे या दशकात उठलेलं आहे. याचा अर्थ पूर्वीचे पंच चुका करीत नसत असा नाही; पण पूर्वीचे क्रिकेटपटू पंचाचा निर्णय शिरसावंद्य मानत. याउलट अलीकडचे क्रिकेटपटू बाद असतानाही आपण बाद नव्हतो असा देखावा करण्यात तरबेज झाले आहेत.

अलीकडे क्रिकेटचे झालेलं व्यावसायीकरण हे त्याचं प्रमुख कारण असावं. क्रिकेटच्या या व्यावसायीकरणामुळं प्रत्येक क्रिकेटपटू धावांचं आणि कसोटीतलं आपलं स्थान कसं सुरक्षित राहील याचाच सदैव विचार करीत असतो. त्यामुळं बाद असतानाही बाद नसल्याचा देखावा करून तो आपल्याविषयी निवडसमितीचे सदस्य व आदी संबंधितांच्या मनात सहानुभूती निर्माण करीत असतो. काही व्यावसायिक क्रिकेटपटूंना नाइलाजानं हे करावंही लागत. काही वेळा पंचाच्या चुकीच्या निर्णयामुळं व्यावसायिक क्रिकेटपटूंचं मोठं नुकसान होऊ शकतं. लोगीसारखा व्यावसायिक क्रिकेटपटू पंचाच्या ३–४ चुकीच्या निर्णयांनंतर संघाबाहेर फेकला गेल्यास आयुष्यातून उठू शकतो. कारण त्याचं पोट क्रिकेटवरच अवलंबून आहे. नाण्याची दुसरी बाजू ही अशी आहे.



माधव गोठोस्कर

असं कुणाचं नुकसान होऊ नये यासाठी काय करता येईल? विज्ञानाचा उपयोग करून पंचाच्या निर्णयाचा दर्जा सुधारता येईल काय? क्रिकेटपटू आदर्श पंच बनू शकतो काय? आदी प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी सुप्रसिद्ध कसोटीपंच माधव गोठोस्कर यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

प्रगत विज्ञानाची अचूक निर्णय देण्यासाठी कितपत मदत घ्यावी? याबाबत माधव गोठोस्कर म्हणतात, निर्णय देताना या गोष्टींची मदत होत असेल तर ती अवश्य घ्यावी. टी. व्ही. कॅमेऱ्यापासून सुरुवात

करू या. वेगवेगळ्या कोनात बसविलेल्या टी. व्ही. कॅमेऱ्यामुळे काही वेळा निश्चित फायदा होतो फलदाज यष्टिरक्षकाकडे झेल देऊन बाद झाला असता किंवा त्रिफळाचीत झाला असता समोरचा कॅमेरा झेल टिपल्याचे किंवा त्रिफळा उडाल्याचे अचूक दाखवू शकत नाही; पण यष्टिपाठचा कॅमेरा ते व्यवस्थित दाखवू शकतो, पण हे झाल प्रेक्षकांच्या सोईसाठी. प्रत्यक्ष पचाना कोणत्याही अँगलमध्ये लावलेल्या कॅमेऱ्याचा उपयोग होऊ शकत नाही. कारण प्रत्येक वेळेला अपील झाल्यानंतर निर्णय देताना पंच, कॅमेराऑपरेटरला विचारून येतो व मग काय ते सागतो, अस सागू शकत नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे कॅमेराही काही वेळा गोंधळ उडवू शकतो. चेंडू बॅटच्या कडेला स्पर्श करून गेल्यानतर कृष्णधवल टी. व्ही. पडद्यावर ते दृश्य स्पष्टपणे दिसू शकत नाही त्यासाठी रंगीत दूरदर्शनवर ते दृश्य बघावे लागते.

पायचीतसारख्या वादग्रस्त निर्णयाच्या बाबतीत टी. व्ही. कॅमेऱ्याची कितपत मदत होऊ शकते ?

फलंदाज पायचीत असल्याचा निर्णय बराच वेळा वादग्रस्त होऊ शकतो. गोठोस्करानी सागितले की, फलदाजाच्या पॅडला जेव्हा चेडू लागतो त्या वेळी तो यष्टीसमोर होता किंवा नाही ते फक्त पंच उभा असतो त्या जागेवरूनच अचूक दिसू शकतं. याउलट टी. व्ही. कॅमेरा १०० यार्डांपलीकडे असतो आणि २०–२५ फूट उंचीवर असतो. त्यामुळ टी. व्ही. कॅमेरा पाहून पायचीतच्या निर्णयाबाबतचा अचूक अदाज बाधता येत नाही.

ही झाली दूरदर्शन कॅमेऱ्याची मर्यादा, पण खेळपट्टीच्या' बाजूला सवेदनाक्षम मायक्रोफोन ठेवल्याने फलंदाज चेंडू खेळला होता किंवा नाही ते कळू शकत काय ? माझा प्रश्न.

यावर गोठोस्कर म्हणाले, या मायक्रोफोनने ग्रहण केलेल्या आवाजाने काही ठोकताळे आपण बांधू शकतो; पण बॅटला चेडूने स्पर्श केल्यानंतर येणारा आवाज बॅट जमिनीवर आपटल्यामुळे येणाऱ्या आवाजासारखाही येऊ शकतो चेंडू पॅडच्या बक्कलसला घासून गेल्यानतरही त्याच प्रकारचा आवाज येऊ शकतो. कधी चेंडू शिवणीवर पडला तरी तसा आवाज होऊ शकतो. मग तो विशिष्ट आवाज नेमका कसला ते तुम्ही कसं ठरवणार ?

काही वेळा फलंदाजाच्या खिशातील वस्तूला चेडू घासून गेल्यानतरही ' कट् ' सारखा आवाज येऊ शकतो.

पण कसोटी क्रिकेटमध्ये खेळपट्टीच्या बाजूला मायक्रोफोन जगात कुठेच ठेवण्यात येत नाही. फक्त केरी पॅकरने सवेदनाक्षम मायक्रोफोन खेळपट्टीच्या आजूबाजूला ठेवले होते, पण ते चेडूच्या आवाजासाठी नव्हते. ते मायक्रोफोन प्रेक्षकाच्या करमणुकीसाठी होते. मैदानावर खेळाडूमधील बोलाचाली, वाचाबाची लोकाच्या कानावर जावी यासाठी ते मायक्रोफोन ठेवण्यात आले होते. टोनी ग्रेग व चॅपेल याच्यातील भाडण प्रेक्षकाना ऐकू जाव हा त्यामागचा हेतू होता.

बिनचूक निर्णयासाठी संपूर्ण इलेक्ट्रॉनिक्स यत्रणाच का उभारली जाऊ नये ?

या प्रश्नावर गोठोस्कर म्हणतात, ' मग माणसाची या खेळात ' इनव्हॉल्मेंट ' कशी रहाणार ?' मग पंचच मैदानावर उभा करू नका. इलेक्ट्रॉनिक्स सिग्नलद्वारा इशारा मिळेल त्याप्रमाणे निर्णय स्वीकारायचे. पण त्यातही धोका आहेच की ! समजा, ऐन वेळी खेळाडू बाद होण्याच्या क्षणीच ही यत्रणा अकार्यक्षम झाली किंवा अचानक विद्युतपुरवठा खडित झाला तर काय करणार ? म्हणजेच माणसाला पंच म्हणून या खेळात महत्त्वाची आहे त्याची ' इनव्हॉलमेंट ' शिवाय इलेक्ट्रॉनिक्स यत्रणेने दिलेला निर्णय तरी खेळाडू शिरोधार्य मानतील कशावरून ?

गोठोस्कर म्हणाले की, हे सर्व चाललय का आणि कशासाठी ? पचाच्या चुकीच्या निर्णयामुळेच अलीकडे ही चर्चा सुरू आहे ना? पचानी दिलेला निर्णय चुकीचा आहे हे कोण ठरवतं ? पचाचा निर्णय चुकला हे बाद झालेल्या खेळाडूने नाराजी व्यक्त केल्यानंतरच सर्वांना समजतं काही खेळाडू बाद झाल्याचे ठाऊक असतानाही मुद्दामच हा देखावा करीत असतात. केवळ त्याच्या नाटकी आविर्भावावरूनच तुम्ही पंचाचा निर्णय चुकला हे ठरवणार !

गोठोस्करांच्या विचारात खरोखरच तथ्य आहे खेळाडूने नाराजी व्यक्त केल्यानतर आपण निर्णय चुकला अस म्हणतो, पण हे खेळाडू खरोखरच सत्यप्रिय असतात का ? काही वेळा हेच खेळाडू बाद असताना पच त्याना सशयाचा फायदा देऊन नाबाद ठरवितो, त्या वेळी त्याच्यातील सत्यप्रियता कोठे लपलेली असते ? त्या वेळी ते स्वत.हून खेळपट्टी का सोडत नाहीत ? त्या वेळी पचाच्या चुकीचा ते फायदा घेतात. मग एखाद्या चुकीच्या निर्णयाचाही त्यानी निमूटपणे स्वीकार केला पाहिजे.

म्हणजे हाडामासाच्या पचावर विश्वास ठेवणे हाच एकमेव उपाय आपल्या हातात उरतो. पच हाही माणूसच आहे. त्यामुळे त्याच्याकडून चुका या होणारच तरी देखील त्याच्यावर आपल्याला विश्वास टाकावा लागणारच; पण असं असलं तरी पचांची गुणवत्ता वाढली पाहिजे.

पचाची गुणवत्ता वाढविण्यासाठी काय करता येईल ? माजी क्रिकेटपटू आदर्श पंच बनू शकतो काय ? क्रिकेट-पंचामध्ये क्रिकेटपटूच्या टक्केवारीच प्रमाण अगदीच कमी आहे; याच कारण काय असू शकत ?

माधव गोठोस्करे म्हणतात की, क्रिकेटपटू आदर्श पच बनू शकेलच असं नाही. कारण आदर्श क्रिकेटपटूसाठी जशी गुणवत्ता असावी लागते, त्याप्रमाणेच आदर्श पचासाठीही

मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

चौथी आवृत्ती
मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

गुणवत्तेचं भांडार असावं लागतं. एक वेळ क्रिकेट खेळणं क्रिकेटपटूला सोपं वाटेल; पण क्रिकेटची पंचगिरी म्हणजे त्यापेक्षाही जिकिरीचं काम आहे. कारण क्रिकेट-पंचाला सामन्याचा प्रत्येक क्षण डोळ्यात तेल घालून अवलोकन करायचा असतो. त्यासाठी कमालीची एकाग्रता असणे महत्त्वाचं आहे. ही एकाग्रता जराही विचलित होता कामा नये. सामन्याच्या वेळी फलंदाज, गोलंदाज व क्षेत्ररक्षक यांना 'रिलॅक्स' होता येतं; पण पंचाला मात्र पाचही दिवस उन्हात दक्ष उभं रहायचं असतं. खेळाडूंच्या अपिलाचा दबाव त्याच्यावर असतोच. शिवायस्टेडियममधील हजारो प्रेक्षकांचं दडपण त्याच्यावर असतं. टी. व्ही. कॅमेराही या दडपणात भर टाकत असतो.

तर अशा या दडपणाच्या वातावरणातही तो पाच दिवस आपली एकाग्रता टिकवत असतो. साईड स्क्रीनसमोर कुणी आला तरीही फलंदाजाची एकाग्रता भंग पावते. तो वेळप्रसंगी वादही होऊ शकतो. मग पंचांना कोणत्या महान दिव्यातून जावं लागत असेल याची कल्पना केलेली बरी.

या गोष्टीची क्रिकेटपटूंना कल्पना असते, म्हणूनच प्रथम दर्जाच्या क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर ते पंच बनण्याच्या भानगडीत पडत नाहीत.

गोठोस्कर म्हणतात, दुसरी गोष्ट मानधनाची ! कसोटीपटूंना मिळणाऱ्या मानधनाच्या तुलनेत पंचांचे मानधन अगदीच अल्प असतं. म्हणून या अल्प मानधनासाठी कुणी खेळाडू पंच बनण्यासाठी पुढेच येत नाही. पंच म्हणून काम करणाऱ्याला मानापेक्षा शिव्याच अधिक मिळतात, टीका होते. हे विष पचवायची माजी क्रिकेटपटूंची तयारी आहे का ?

मग पंच बनण्यासाठी पुढे येतात तरी कोण ? मी विचारले.

साधारणतः पंचविशी पार केलेले युवक तरीही पंच–परीक्षेकडे आकर्षित होतात. पंचपरीक्षेला बसण्यासाठी ते बराच उत्साह दाखवितात.

कसोटी पंचाच्या पदापर्यंत थेट मजल मारता येते का ? की त्यासाठी वेगवेगळ्या परीक्षा आहेत ?

प्रथम राज्यस्तरावरील किंवा स्थानिक स्तरावरील पंचपरीक्षा होते. आपल्या इथं मुंबई क्रिकेट असोसिएशन ही परीक्षा घेते. ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुंबईतल्या स्थानिक स्पर्धांमध्ये पंच म्हणून काम करता येतं.

परीक्षा कशा प्रकारची असते ?

लेखी, प्रात्यक्षिक आणि तोंडी अशा तीन प्रकारच्या परीक्षा घेण्यात येतात. लेखी परीक्षेत उमेदवाराला क्रिकेटच्या नियमांचं किती ज्ञान आहे हे पाहिलं जातं. प्रात्यक्षिकामध्ये ११ खेळाडूंसह मैदानावर सामना खेळविला जातो. त्या सामन्यावर पंच म्हणून प्रत्येक उमेदवाराला उभं करण्यात येतं. तोंडी परीक्षेत उमेदवाराचा अनुभव पाहिला जातो.

स्थानिक पातळीवरील पंचपरीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार नंतर राष्ट्रीय स्तरावरील (रणजी) पंचपरीक्षा देऊ शकतो. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ या परीक्षेच आयोजन करतं. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला रणजी सामन्यावर पंच म्हणून उभं रहाता येतं. त्या त्या सामन्यातील व कर्णधारांच्या अहवालावरून त्या पंचाला कसोटी सामन्यावर उभं करायचं किंवा नाही हे ठरविण्यात येतं.

क्रिकेटपंच होण्यासाठी आदर्श वय कोणतं ?

निश्चित असं सांगता येत नाही; पण त्याने किती सामने पंचगिरी केलं, हे पहाण्यात येतं. कर्णधाराच्या अहवालाचाही विचार करण्यात येतो आणि मगच कसोटी सामन्यासाठी त्या पंचाची नियुक्ती करण्यात येते.

कसोटी सामन्यापूर्वी तुम्हाला तयारी वगैरे करावी लागते काय ?

गोठोस्करांनी सांगितले की, इतरांच मला ठाऊक नाही पण कसोटी सामन्यापूर्वी क्रिकेटचे सर्व नियम मी एकदा वाचतो. खेळासंबंधीचे नियम व अटी आणि उभय राष्ट्रांतर्फे करण्यात आलेल्या कराराचाही मी अभ्यास करतो. कारण काही वेळा त्यातूनही वाद निर्माण होऊ शकतो. बंगलोरला पाकिस्तानविरुद्ध कसोटीत अनिवार्य षटकांच्या बाबत झालेला वाद तुम्हाला ठाऊक असेलच ! □



# आमचा संघ, निरलॉन संघ—असा घडला

टाइम्स ढालस्पर्धेचे विजेतेपद मुंबईच्या क्रिकेटविश्वात सन्मानाचे मानले जाते. अनेक कसोटी—क्रिकेटपटूंचा भरणा असलेल्या 'निरलॉन' संघाला मात्र गेली काही वर्षे हे विजेतेपद हुलकवण्या देत होते. यंदा संदीप पाटीलच्या नेतृत्वाखाली 'निरलॉन'ने मफतलाल संघाचा अंतिम सामन्यात पराभव करून प्रथमच टाइम्स—ढाल मिळविली. असा हा निरलॉनचा विजयी संघ कसा घडला याबद्दल त्या संघाचे व्यवस्थापक हेमंत वायंगणकर यांची मुलाखत घेतली आहे **अनिल वाकणकर** यानी.

सुनील गावस्करने ज्या वेळी सर गॅरी सोबर्सच्या २६ शतकांची बरोबरी केली त्या वेळी एका साप्ताहिकाला दिलेल्या मुलाखतीत सागितले की, 'डॉन ब्रॅडमनच्या २९ शतकाची बरोबरी हे माझे उद्दिष्ट नाही. कारण त्याच्याशी माझी तुलनाच होत नाही; पण माझी एक इच्छा अजून पूर्ण व्हायची आहे ती म्हणजे माझ्या निरलॉन सघाला टाइम्स—ढाल मिळवून देणे ती एकदा मिळवून दिली की, मला समाधान मिळेल. आज अनेक वर्षे हे विजेतेपद आम्हाला हुलकावणी देत आहे' पण या वर्षी सुनीलची इच्छा त्याच्या अनुपस्थितीत नेतृत्व करणाऱ्या संदीप पाटीलने पूर्ण केली. यदाची टाइम्स-ढाल निरलॉनच्या सघाला जिंकून दिली.

वर्षाचे १२ ही महिने मुबईत क्रिकेटचे सामने चालू असतात ऐनपावसाळ्यात-देखील मुबईत कांगा लीगचे सामने खेळले जातात. मुबई हे भारतीय क्रिकेटचे माहेर-घर आहे. अनेक नामवत क्रिकेटपटू मुबईने आज भारताला दिले. मुंबईच्या निर-निराळ्या कंपन्यातून बरेच क्रिकेटपटू नोकरी करतात. या सर्व कपन्याचे आपसात सामने नेहमीच होतात; पण टाइम्स ऑफ इडि-याच्या ढालीसाठी खेळणे हे मानाचे समजले जाते. त्यात अ गटातले सामने हे दर्जेदार असतात. अ गटात निरलॉन, मफतलाल, टाटा, ए. सी. सी, स्टेट बँक याच्यात चुरशीचे सामने होतात या सामन्याना लोक गर्दी पण खूप करतात. या सामन्यात बहुतेक सर्व रणजी व कसोटीदर्जाच्या खेळाडूचा खेळ जवळून बघता येतो व तोदेखील फुकट. अशा या टाइम्सच्या ढालीसाठी निरलॉनचा संघ १९७७ पासून खेळतो आहे. निरलॉनने आपला सघ कसा तयार केला, ते क्रिकेट-पटूची भरती कशी काय करतात, यासबधी निरलॉनच्या क्रिकेटसंघाचे व्यवस्थापक श्री. हेमत वायंगणकर याच्याशी बातचीत करण्याची संधी मुबई कसोटीच्या वेळी मिळाली.

हेमंत वायंगणकर हे निरलॉन कपनीत १९७६ पासून कामाला आहेत व निरलॉनचा क्रिकेटसघ तयार करण्यात त्याचा पहिल्या-पासून पुढाकार होता हे मी ऐकून होतो.

**मी त्यांना पहिलाच प्रश्न विचारला की, *तुमच्या संघाची बाधणी तुम्ही कशी केली?***

**वायंगणकर :** पहिल्या वर्षी श्री. पद्माकर कर्णिक यानी निरलॉन स्पोर्टस क्लब स्थापन करण्यासाठी मेहनत घेतली व त्याच्या प्रयत्नानेच निरलॉनची क्रिकेटटीम उभी राहिली त्याना आमचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर श्री. विरंजी सागर व श्री. मनहर भगत यानी प्रोत्साहन दिले. सर्व प्रकारची मदत केली. सुरुवातीला करसन घावरी हा एकच कसोटीपटू आमच्याकडे होता त्या वेळी राहुल मकड, सुरू नायक, किरण आशर हे रणजीपटू आम्ही घेतले व त्याच्या-बरोबर काही तरुण होतकरू क्रिकेटपटूही घेतले.

टाइम्स ढाल सामन्याच्या पदार्पणातच आम्ही अतिम सामन्यापर्यंत मजल मारली. अंतिम सामन्यात आम्ही ४५० धावा केल्या; पण मफतलाल संघाने आम्हाला हरविले. आज अनेक वर्षे मफतलालचा संघ विजेता आहे. त्यांच्याकडे पण अनेक आजी—माजी कसोटी व रणजी क्रिकेटर आहेत.त्यामुळेच तो बलवान संघ मानला जातो. अशोक मकडच्या नेतृत्वाखाली मफतलालचा सघ चागला तयार झालेला आहे. त्याला हरविणे जरा कठीणच पडते; पण आमची प्रथम सामन्या-तली कामगिरी नक्कीच समाधानकारक होती. १९७८ मध्ये सुनील गावस्कर आमच्या कपनीत आला. मग मात्र टीमला सर्वत्र मान मिळू लागला. त्याच्या अनुभवाचा व मार्ग-दर्शनाचा लाभ आमच्या संघास मिळाला. त्यानतर रवी शास्त्री, सदीप पाटील, बल-विंदरसिग सधू, सुभाष क्षीरसागर हे नवीन खेळाडू आले. वर्षभरातच आमच्या निरलॉन स्पोर्टस क्लबचे काम खूप वाढले १९७७ पासून कर्णिक याच्या सूचनेवरुन मी क्रिके-टच्या टीमचे व्यवस्थापन पाहू लागलो. १९७० साली आम्ही प्रथमच मोईनुदुल्ला करडकच्या सामन्यात भाग घेतला व तो करंडक जिकला या वर्षी (१९८३ मध्ये) आम्ही प्रथमच बुचीबाबू करंडकच्या स्पर्धेत भाग घेतला. तेथे आम्ही व स्टेट बँकेचा सघ दोघेही संयुक्त विजेते झालो यामुळे त्यात आम्ही नियमित भाग घेणार आहोत. तसेच क्रिकेट नियामक मडळाने ज्या स्पर्धांना अ श्रेणीची मान्यता दिली आहे त्या साम-न्यात पण भाग घेणार आहोत.

**तुमच्याकडे एवढे चांगले दर्जेदार खेळाडू असताना तुमचा टाइम्स ढालीच्या अंतिम सामन्यात यापूर्वी ४ वेळा पराभव का झाला ? मी विचारले.**

**वायंगणकर :** चार वेळा पराभव झाला हे खरे; पण काही तरी कुठे तरी चुकायचे. आमचे प्रयत्न कमी पडायचे असे नाही. सुनीलचे कुशल नेतृत्व होते. सदीप जोशात खेळायचा पण सर्व काही चागले होऊनही विजयश्री गळचात पडत नव्हती. कधी गुण-सख्या कमी भरायची, कधी क्षेत्ररक्षण चागले

व्हावयाचे नाही असे काही तरी व्हायचे.

**सुनीलचा नवीन खेळाडूंवर किती प्रभाव आहे?**

**वायंगणकर** : त्याचा जबदस्त प्रभाव आमच्या टीमवर आहे. सुनील क्रिकेटजगातला एक मोठा खेळाडू असला, त्याचा बराच दबदबा असला तरी कोणी काही सूचना केली की,सुनील लगेच त्या सूचनेवर इतरांशी चर्चा करतो. त्यामुळे हा मोठा तो छोटा असा आमच्याकडे भेदभाव नाही. त्यानंतर संदीप पाटील, रवी शास्त्री आमच्याकडे आल्याने आमच्या खेळाडूंत जोश आला या,वर्षी आमचे प्रमुख खेळाडू वेस्ट इंडीजमध्ये असतानाही त्यांच्या अनुपस्थितीत आम्ही टाइम्स ढाल जिंकली.

**सध्या तुमच्याकडे कसोटी व रणजीवीर किती आहेत? तुम्ही खेळाडूंची भरती कशी काय करता?**

**वायंगणकर** : सध्या आमच्याकडे सुनील गावस्कर, संदीप पाटील, रवी शास्त्री, सुरू नायक हे कसोटीपटू व राहुल मंकड, राकेश टंडन, सुभाष क्षीरसागर, सुरेश शास्त्री,



**निरलॉनचे क्रिकेटप्रेमी जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर विरंची सागर**

¤

किरण आशर, अवधूत झारापकर, अवि कर्णिक व अगदी अलीकडचा नवोदित सुरेश शेट्टी हे सर्व रणजी सामन्यांतून खेळलेले आहेत. आमच्याकडे खेळाडू घेताना तो प्रथम पदवीधर असला पाहिजे अशी आमची अट असते. त्यानंतर शाळाकॉलेजमधून, तसंच एखाद्या क्लबतर्फे क्रिकेट खेळलेला असला पाहिजे. या सर्व सामन्यांतून त्याच्या खेळाचा आम्हाला अभ्यास करावा लागतो. त्याचा खेळ आम्ही मॅचच्या ठिकाणी जाऊन बघतो. तो आमच्या टीमला उपयोगी आहे की नाही. ते बघतो. नंतर सुनील, संदीप व मी त्याच्यावर विचार करून त्याची मुलाखत घेतो. मग कंपनीच्या डायरेक्टरना कळवतो व त्यांनी मान्यता दिली की मग कामावर घेतो त्याच्या शिक्षणाप्रमाणे व क्रिकेटच्या अनुभवाप्रमाणे आमची कंपनी पगार देते. ज्या वेळी क्रिकेट सामने नसतील तेव्हा प्रत्येकाने सकाळी ९ ते ५-४५ ऑफिसचे काम केलेच पाहिजे असा आमचा दंडक आहे. सामन्यांच्या मोसमात मात्र त्यांना सरावासाठी तीनला मोकळे करतो. याशिवाय आम्ही प्रत्येक खेळाडूला क्रिकेटच्या किटची जोडी देतो. त्यात पँट-शर्ट पण आले. ज्या वेळी सामने अससात त्या वेळी स्पेशल लीव्ह देतो. सामने मुंबईबाहेर असल्यास त्यांना



**१९८३ चा टाइम्स ढाल विजेता निरलॉन संघ.**
**डावीकडून बसलेले – सुरू नायक, करसन घावरी, व्यवस्थापक वायंगणकर व कर्णधार संदीप पाटील**

रेल्वेने प्रथम दर्जाने घेऊन जातो. सुनील, संदीप, रवीसारख्या कसोटी खेळाडूंचे टाइम-टेबल बिझी असल्याने त्यांना विमानाने घेऊन जातो. आमचे पर्सनल मॅनेजर श्री. सी. एस्. शेट्टी व असि. मॅनेजर श्री. अशोक म्हैसकरी पण सर्व क्रिकेटपटूंना वेळोवेळी मदत करतात. आमचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर विरंची सागर व मनहर भगत हे पण वेळोवेळी खेळाडूंची चौकशी करतात,त्यांच्या अडचणी असल्यास त्या दूर करण्याचा प्रयत्न करतात. एखादी स्पर्धा संपल्यावर टीमच्या कामगिरीची चौकशी करतात कंपनीकडून खेळाडूंना काही कमी पडत नाही ना याची ते काळजी घेतात. जे खेळाडू इंग्लिश कौंटीतून खेळू इच्छितात त्यांना विशेष रजा देण्यात येते. सर्वसाधारणपणे खेळाडू एकदा निरलॉन-मध्ये आला की आमची कंपनी सोडून दुसरीकडे जाण्याचा मोह त्याला होऊ नये इतका पगार व सुविधा आम्ही त्याला देतो. त्यांना निरनिराळ्या खात्यात काम देतो. कोणाला अकाउंटस, कोणी प्रसिद्धखात्यात, कोणी जनसंपर्क खात्यात काम करतो.

**भारतीय क्रिकेटच्या प्रगतीला हातभार लागतो का?**

**वायंगणकर :** जरूर लागतो. आज सुनील गावस्कर, संदीप पाटील, रवी शास्त्री हे भारतीय संघाचे प्रमुख खेळाडू आहेत विश्वचषक जिंकताना सुनील, संदीप, रवी, संधु याचापण हातभार लागला सुरू नायक, करसन घावरी यानी देखील भारतीय क्रिकेटची सेवा केली आहे.

या आमच्या खेळाडूंच्या क्रिकेट-विकासासाठी आम्ही प्रयत्न करतो तेव्हा भारतीय क्रिकेटला नवीन खेळाडू देण्यात देखील आमचा हातभार लागतोच.

**नवीन फलंदाजासाठी बोलिंग मशिन आणण्याचा आपला विचार आहे का?**

**वायंगणकर :** सध्या तरी नाही. बोलिंग मशिनचा फायदा हा नवोदितांना नक्की होतो; पण तो शाळकरी मुलांना. आमच्याकडे अनुभवी फलंदाज आहेत. त्यांना काय फायदा होणार? माल्कम मार्शल ज्या वेगाने गोलंदाजी करतो त्या वेगाने मशिन गोलंदाजी करत नाही. त्यामुळे शेवटी अनुभवावरच अवलंबून राहावे लागते

**निरलॉनच्या टीमला स्पेशल कोच म्हणून कोणी आहे का?**

**वायंगणकर :** आमच्याकडे कोच असे कोणी नाही; पण एखाद्या फलंदाजाची काही अडचण असेल, त्याचा खेळ नीट होत नसेल तर त्याला आमचे ज्येष्ठ खेळाडू वासू परांजपे सुनील गावस्कर हे मार्गदर्शन करतात.

**नवोदितांना शिकवण्यासाठी कोणी वेगवान गोलंदाज आणण्याचा विचार आहे का?**

**वायंगणकर :** सध्या तरी विचार नाही. कोणी सूचना केली तर विचार करू, पण भारतीय क्रिकेट नियामक मंडळच हे खरे तर करू शकते; पण तेच काही करत नाही.

आमचा संघ आता चांगला तयार झालेला आहे आमचा संघ चांगला समतोल संघ आहे. तो अनेक स्पर्धा गाजवणार आहे. आतापर्यंत काही कंपन्यानी टीम तयार करण्याचे प्रयत्न केले त्या एक-दोन वर्षात संपल्या तसे आमचे नाही आम्ही आज टीम टिकवून आहोत याच्यापुढे येणारी अनेक वर्षे भारतीय क्रिकेटची सेवा करणार आहोत. नवीन चांगले खेळाडू भारतीय क्रिकेटला देणार आहोत

पूर्वी राजे-महाराजे, संस्थानिकानी क्रिकेटला राजाश्रय दिला. अनेक खेळाडूंना आपल्या सेवेत ठेवून घेतले; पण त्यानंतर या निरनिराळ्या औद्योगिक कंपन्यानी त्यांना आपल्या सेवेत ठेवून घेतले या कंपन्या म्हणजे आधुनिक जगातले राजे-महाराजे आहेत. त्यांच्यामुळे आजच्या क्रिकेटपटूंना नोकरी करत असतानाही क्रिकेटच्या साधनेकडे भरपूर लक्ष पुरविता येते. तसेच क्रिकेटमधून निवृत्त झाल्यावरही निर्वाहाची चिंता उरत नाही.

□

## गावस्कर आणि ब्रॅडमन : पृष्ठ २४ वरून

सामना इंग्लंडविरुद्ध होता. या सामन्यात इंग्लंडच्या ३३४ धावांना उत्तर देताना गावस्करने ' न भूतो ' असा कूर्मगती खेळ केला व सर्व ६० षटके खेळून काढून केवळ ३६ धावा जमविल्या. प्रेक्षकांनीही गावस्करचा खेळ बघून त्याची प्रचंड हुर्यो सुरू केली; पण गावस्कर विचलित न होता चेंडू तटवतच राहिला. त्या दिवशी मला धावा काढणे जमतच नव्हते असे गावस्करने पुढे लिहिले! पण भारतीय संघ प्रुन्डेंशिअल चषकासाठी इंग्लंडला जाण्यापूर्वी मुंबईत क्रिकेट नियामक मंडळाच्या अध्यक्षाशी गावस्करची बोलाचाली झाली असल्यामुळे गावस्करने हा मंद खेळ दाखविला असावा असाच बहुतेकांचा अंदाज आहे.

वेंदी भारतीय संघाचा कर्णधार असताना भारतात प्रथमच क्रिकेटपटूंच्या संघटनेची स्थापना झाली. पुढे या संघटनेने मंडळाशी वेळोवेळी वाटाघाटी करून आपल्या सोयी-सवलतीत, भत्त्यात वगैरे भरपूर वाढ करून घेतली. या सर्व प्रकारात गावस्करने बराच मोठा वाटा उचलला.

गावस्करने व ब्रॅडमननेही आपली जनमानसातली प्रतिमा नेहमीच स्वच्छ राहील याची काळजी घेतली. दारू, लफडी, मैदानावरील आकाडतांडव, प्रतिस्पर्धी खेळाडूशी अखिलाडू वर्तन या सर्व बाबीपासून दोघेही कटाक्षाने दूर राहिले व उत्तम चारित्र्याचे प्रशस्तिपत्रक त्यांनी सामान्य क्रिकेटरसिकापासून मिळविले

### विभूतीशी स्पर्धा

गावस्करला दुसरा ब्रॅडमन म्हणता येईल का? खचितच नाही. आपल्या केवळ अभूतपूर्व अशा फलंदाजीमुळे ब्रॅडमन क्रिकेटच्या जगातील विभूतिपदाला पोहोचला. क्रीडा क्षेत्रात विभूतिपदाला पोहोचण्याचे भाग्य काही मूठभर खेळाडूंनाच लाभले आहे. हॉकीमध्ये ध्यानचंदला, फूटबॉलमध्ये पेलेला व मुष्टियुद्धात महम्मद अलीला हे भाग्य लाभले. गावस्कर या पदापर्यंत पोहचू शकला नाही ही वस्तुस्थिती आहे.

परंतु ब्रॅडमनइतकेच समृद्ध व्यक्तिमत्त्व लाभलेला व क्रिकेटमधल्या ब्रॅडमन नावाच्या विभूतीशी साख्यिकी का होईना पण स्पर्धा करण्याचा पराक्रम गाजविणारा सुनील गावस्कर हा जगातील एकमेव क्रिकेटपटू आहे ही गोष्टच भारतीय क्रिकेटरसिकांना आनंद देणारी व गावस्करचे मोठेपण सिद्ध करणारी आहे यात शंका नाही!


□

# गावस्कर आणि ब्रॅडमन

गावस्करला दुसरा ब्रॅडमन म्हणता येईल का ?
आपल्या केवळ अभूतपूर्व अशा फलंदाजीमुळे ब्रॅडमन क्रिकेटच्या जगातील विभूतिपदाला पोचला. क्रीडाक्षेत्रात हे भाग्य काही मूठभर खेळाडूंनाच लाभले आहे:
हॉकीमध्ये ध्यानचंदला, फुटबॉलमध्ये पेलेला आणि मुष्टियुद्धात महंमद अलीला.
गावस्कर या पदापर्यंत पोचला आहे का ?

□

किरण गोखले



**सुनील गावस्कर**
**तिसऱ्या शतकाची प्रतीक्षा**

ऑस्ट्रेलियाचा डॉन ब्रॅडमन आणि भारताचा सुनील गावस्कर. क्रिकेटमधल्या निवृत्तीनंतर तब्बल ३५ वर्षांनंतरही एकजण 'आजपर्यंतचा सर्वांत महान फलंदाज' हे पद टिकवून धरणारा तर दुसरा, कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या सात राष्ट्रांतील वॉल्टर हॅमंड, गॅरी सोबर्स, जेफ बॉयकॉट व ग्रेग चॅपेल या प्रख्यात फलंदाजांसह सर्वांना मागे टाकून, २९ विक्रमी शतके झळकावून या महान फलंदाजाशी स्पर्धा करणारा आघाडीचा फलंदाज. जागतिक क्रिकेटच्या इतिहासात ब्रॅडमन व गावस्कर यांना कायमचे मानाचे पान दिले जाईल यात काहीही शंका नाही.

गावस्कर व ब्रॅडमन, दोघांच्याही व्यक्तिमत्त्वात व कारकीर्दीत साम्यस्थळे भरपूर. दोघांचीही उंची बेताचीच—५ फूट ५ इंचांच्या आसपास. गावस्कर आघाडीचा फलंदाज तर ब्रॅडमन तिसऱ्या क्रमांकावर खेळणारा म्हणजे बऱ्याच वेळा डावाच्या सुरुवातीनंतर लगेच फलंदाजीला येणारा. दोघेही उत्तम क्षेत्ररक्षक. दोघांचेही क्रिकेटतंत्र परिपूर्ण व दोघांच्याही नावांवर अनेक जागतिक विक्रमांची नोंद. दोघेही एके काळी आपल्या राष्ट्रीय संघाचे कर्णधार ! दोघांनाही धावांचा सोस व क्रिकेटबद्दल अपार प्रेम. दोघांनाही क्रिकेटने दिली ती भरपूर प्रसिद्धी, मानसन्मान व पैसा. दोघांचीही क्रिकेट—कारकीर्द वादग्रस्त व आपल्या देशाच्या क्रिकेट—व्यवस्थापनाशी अनेक झगडे. दोघेही चांगल्यापैकी लेखक व दोन—तीन पुस्तकांचे जनक. दोघांनाही एकमेकांबद्दल नितांत आदर, गावस्करसाठी ब्रॅडमन म्हणजे 'आदर्शांचा आदर्श' तर ब्रॅडमनच्या शब्दात गावस्कर हा 'क्रिकेटच्या खेळाचा अलंकार !'

## कसोटीत पदार्पण

ब्रॅडमनने वयाच्या २१ व्या वर्षी कसोटीत पदार्पण केले तर गावस्करने २३ व्या वर्षी; पण सुनीलचे कसोटीतील पदार्पण ब्रॅडमनपेक्षाही नेत्रदीपक होते.

१९७१ च्या वेस्ट इंडीज दौऱ्यात डाव्या हाताच्या बोटाला झालेल्या जखमेमुळे सुनील पहिली कसोटी खेळू शकला नाही; पण पोर्ट ऑफ स्पेन येथील दुसऱ्या कसोटीत त्याचा भारतीय संघात समावेश झाला. त्याचा हा पहिलाच कसोटी—सामना. या सामन्यात त्याच्या धावा होत्या ६५ व नाबाद ६७. विशेष म्हणजे ही कसोटी भारताने सात गडी राखून जिंकली. विंडीजबरोबरची ती संपूर्ण मालिकाच गावस्करसाठी यशदायी ठरली.

या मालिकेतील चार कसोटी सामन्यात त्याने ३ शतके व एका द्विशतकासह (एकूण ४ शतके) ७७४ धावा फटकाविल्या व कसोटी—पदार्पणातील मालिकेत सर्वोच्च धावसंख्या जमविण्याचा विश्वविक्रम नोंदवला ! या मालिकेतील पाचवा कसोटी सामना, जो पुन्हा पोर्ट ऑफ स्पेन येथेच खेळला गेला, तो तर गावस्करच्या क्रिकेट-कारकीर्दीतील सोनेरी पान ठरला. दातदुखीने बेजार झाला असतानाही त्याने पहिल्या डावात १२४ तर दुसऱ्या डावात २० चौकारांच्या सहाय्याने २२० धावा चोपून काढल्या. दुसऱ्या कसोटीशिवाय मालिकेतील इतर सर्व सामने अनिर्णित राहिले. त्यामुळे दुसऱ्या कसोटीतील विजयाच्या जोरावर ही मालिका भारताने जिंकली व उत्कृष्ट आघाडीवीर म्हणून गावस्करचे नाव सर्वत्र गाजले.

ब्रॅडमनचा कसोटी—क्रिकेटमधला प्रवेश काहीसा निराशाजनक ठरला. १९२८ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आलेल्या इंग्लिश संघाविरुद्धच्या पहिल्या कसोटीत ब्रॅडमनचा संघात समावेश झाला. पहिल्या डावात ४ चौकार ठोकून त्याने सुरुवात तर चांगली केली; पण केवळ १८ धावांवर असतानाच तो पायचीत झाला. दुसऱ्या डावात केवळ एक धाव काढल्यावर त्याचा झेल पकडला गेला व निराश मनाने ब्रॅडमन परत आला. ही कसोटी ऑस्ट्रेलियाने ६७५ धावांच्या विक्रमी फरकाने गमावली व पहिल्या कसोटीतील अपयशामुळे ब्रॅडमनला दुसऱ्या

कसोटीत बसविण्यात आले. पहिल्या कसोटी-नंतर त्याच्या संघातल्या एका ज्येष्ठ खेळाडूने तर 'ब्रॅडमन हा कसोटी दर्जाचा नाही' असे जाहीरपणे सांगून टाकले !

तिसऱ्या कसोटीत मात्र ब्रॅडमनला खेळ-ण्याची पुन्हा एकदा संधी मिळाली व त्या-नतर त्याने कधीही मागे वळून पाहिले नाही. मेलबोर्न येथील त्या कसोटीत त्याने पहिल्या डावात ७९ व दुसऱ्या डावात आपले पहिले कसोटी शतक झळकविले (११२ धावा). पाचव्या कसोटीतही त्याने उत्तम फलदाजी केली, १२३ व ३७ नाबाद अशा धावा केल्या व ऑस्ट्रेलियाला या मालिकेतला एकमेव विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उच-लला. या मालिकेतील ४ कसोटी सामन्यात मिळून दोन शतकाच्या सहाय्याने त्याने ४६८ धावा जमविल्या; पण ऑस्ट्रेलियाने मात्र इंग्लडकडून ४–१ असा झणझणीत मार खाल्ला.

गावस्करने आपल्या कसोटी-कारकीर्दीची सुरुवात मोठी झकास केली; पण त्याहूनही वरच्या दर्जाचा पराक्रम तो पुढे कधीही करू शकला नाही. एका मालिकेत द्विशतकासह ४ शतके झळकविण्याची कामगिरी मात्र त्याने पुन्हा एकदा १९७८–७९ साली विंडीज भारताच्या दौऱ्यावर आले असताना करून दाखविली. त्यामुळे तो हार्वे व सटक्लिफ यांच्या पंक्तीत जाऊन बसला.

ब्रॅडमनची पहिलीवहिली कसोटी-मालिका फारशी गाजली नाही; पण पुढे मात्र त्याच्या कर्तृत्वाचा आलेख चढताच राहिला. पुढील कसोटी सामन्यात त्याने शतकाचा झपाटाच लावला व त्याच वेळी दहा वेळा द्विशतके व दोनदा त्रिशतकेही झळकविली.

## यशदायी वर्ष

१९३० हे वर्ष क्रिकेटच्या इतिहासात 'ब्रॅडमन वर्ष' म्हणूनच गणले जाईल. त्या वर्षाच्या सुरुवातीलाच म्हणजे ३ जानेवारीला शेफील्ड शिल्ड सामन्यात न्यू साउथ वेल्सतर्फे क्वीन्सलंडविरुद्ध ब्रॅडमन मैदानात उतरला. पहिल्या डावात तो केवळ तीन धावावरच तंबूत परतला; पण दुसऱ्या डावात मात्र त्याने चौकाराचा असा तडाखा लावला की केवळ १९५ मिनिटात त्याच्या २०५ नाबाद धावा फलकावर लागल्या. दुसऱ्या दिवशीही त्याने त्याच गतीने ३७७ मिनिटात ४०० ची मजल मारली व शेवटी ४५२ नाबाद ही वैयक्तिक विक्रमी धावसंख्या उभारली. प्रथम श्रेणीच्या क्रिकेटमध्ये बरीच वर्षेपर्यंत हा जागतिक विक्रम गणला गेला. पुढे १९५८–५९ मध्ये पाकिस्तानच्या हनीफ महम्मदने कराचीविरुद्ध बहावलपूर या सामन्यात ४९९ धावा काढून हा विक्रम मोडला, पण या ४९९ धावा काढण्यासाठी हनीफने ९७० मिनिटे घेतली तर ब्रॅडमनने ४५२ धावा केवळ ४१५ मिनिटात फटकाविल्या होत्या.

## ऐतिहासिक खेळी

इंग्लडमधील पहिल्या दोन कसोटीतल्या ४ डावांमध्ये ब्रॅडमनच्या धावा होत्या ८, १३१, २५४ व १. लीडस् येथे हेडिंग्ले मैदानावर सुरू झालेली तिसरी कसोटी मात्र ब्रॅडमनच्या आयुष्यात ऐतिहासिक ठरली

ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून फलदाजी स्वीकारली. पहिल्याच षटकात आघाडीचा जॅक्सन बाद झाला व १ बाद २ धावा अशा स्थितीत ब्रॅडमन फलदाजोला आला टेट, लारवुड व गेअरी या जलद गोलंदाजाना तोंड देत त्याने केवळ ९९ मिनिटात उप-हारापूर्वीच आपले शतक झळकविले; पण ही तर केवळ सुरुवात होती चहापानाच्या ठोक्याला त्याची धावसंख्या होती २२० म्हणजे ११५ मिनिटांत दुसरे शतकही त्याने नोंदविले होते. निदान या द्विशतकानतर तरी ब्रॅडमनची एकाग्रता ढळून तो बाद होईल या आशेवर इंग्लिश गोलंदाज चेंडू टाकतच राहिले; पण या पठ्ठ्याने त्याची गोलंदाजी अक्षरशः पिटून काढली व त्या दिवशी खेळ संपण्यापूर्वी आपले तिसरे शतकही साजरे केले. त्या दिवशीचा खेळ अखेर संपल्यामुळे आनंदित झालेले इंग्लिश क्षेत्ररक्षक तबूत परतले तेव्हा ब्रॅडमनची धावसंख्या होती एका दिवसात नाबाद ३०९ ! दुसऱ्या दिवशी ३३४ धावावर तो बाद झाला.

या ३३४ धावात ४६ चौकार होते, सहा वेळा तिहेरी व २६ वेळा दुहेरी धावा होत्या. एकेरी धावा होत्या फक्त ८०. ४६ चौकार मार-ताना त्याने केवळ ६ वेळाच तिहेरी धावा घेतल्या. याचे दोनच अर्थ संभवतात. एक म्हणजे त्याच्या फटकेबाजीमुळे इंग्लिश क्षेत्र-रक्षक ढेपाळून गेले असतील किंवा ब्रॅडमनचे प्लेसिंग इतके सुरेख होते की, त्याचे बहुतेक सर्व फटके क्षेत्ररक्षकाना चुकवून सीमापार गेले

कसोटी–सामन्यात एका दिवसात ३०९ ही सबध संघाचीही बऱ्यापैकी धावसंख्या मानण्यात येते; पण ब्रॅडमनने एकट्याने, एका दिवसात म्हणजे जवळजवळ मिनिटाला एक धाव या वेगाने ही धावसंख्या उभारून आपण असामान्य दर्जाचे फलदाज आहोत हे साऱ्या जगाला दाखवून दिले.

ब्रॅडमननतर गेल्या काही वर्षात काही फलंदाजानी उपहारापूर्वी शतक झळक-विण्याची कामगिरी बजावली; पण पुढे ब्रॅडमनशी स्पर्धा करताना एक तर त्याच्या धावाचा वेग मंदावला किंवा एकाग्रता ढळून ते बाद झाले. ब्रॅडमनचा हा विक्रम अजून अबाधितच राहिला आहे व बहुधा कायम-चाच राहील !

हल्ली आपण पहातो की शतक गाठल्या-वर बहुतेक फलंदाजाची दमछाक होते. एका दिवसात द्विशतक मारणारा फलदाज तर शेवटी शेवटी जोरात धावणे सोडाच; पण अतिश्रमामुळे नीट चालूही शकत नाही; पण ब्रॅडमनने या ऐतिहासिक खेळीमुळे फल-दाजीतील कौशल्याइतकीच आपली शारी-रिक क्षमताही उच्च दर्जाची असल्याचे सिद्ध केले.

प्रख्यात क्रिकेटसमीक्षक नेव्हिल कार्डसने या डावाची आठवण सागताना १९४१ साली लिहिले, 'त्या दिवशी खेळ सपल्यावर ब्रॅडमन तंबूकडे पळतच निघाला. त्याच्या चेहऱ्यावर थकावटीचे काहीच चिन्ह नव्हते व नुकताच खेळायला आल्याप्रमाणे तो ताजा-तवाना दिसत होता.' ब्रॅडमन क्रिकेटक्षेत्रा-तील एक महान व्यक्तिमत्त्व बनल्यानंतर कार्डसने ही आठवण लिहिली आहे, हे जरी खरे असले तरी दिवसाच्या सुरुवातीपासून खेळ सपेपर्यंत ब्रॅडमनने त्या दिवशी मिनि-टाला जवळजवळ एक धाव ही गती कायम राखली ही गोष्टच त्याच्या ताकदीची कल्पना देण्यास पुरेशी आहे.

ब्रॅडमनच्या या महान खेळीने इंग्लिश क्रिकेटरसिकाना वेडच लावले व ब्रॅडमनचा हा डाव अजरामर ठरला.

पुढे ब्रॅडमनने पाठदुखीने बेजार असताना १९३४ साली याच हेडिंग्ले मैदानावर सुमारे

सात तासात पुन्हा एकदा ३०४ धावा नोंदविल्या तेव्हा मात्र त्याच्या सहकाऱ्यांना त्याला उचलूनच मसाजटेबलावर झोपवावे लागले.

### विविध फटक्यांची विपुलता

हूक आणि पुल हे ब्रॅडमनचे आवडते फटके होते. पुलच्या फटक्याने तर त्याला हजारो धावा मिळवून दिल्या. आपल्या पहिल्या कसोटीमालिकेत वेस्टइंडीजविरुद्ध खेळताना गावस्करनेही हूकच्या फटक्याचा मनमुराद वापर केला.

पण पुढे मात्र बाद होण्यास हा फटका कारणीभूत होऊ नये यासाठी हूकचा वापर गावस्करने एकदम कमी करून टाकला. त्यामुळे धावा मिळवून देणारा त्याचा एक चांगला फटका कमी झालाच; शिवाय आखूड टप्प्याच्या उसळत्या चेंडूवर त्याची पंचाईत होऊ लागली.

गावस्कर व ब्रॅडमन, दोघांचेही पदलालित्य किंवा फूटवर्क अप्रतिम होते. त्यामुळे खेळातील जवळजवळ सर्व प्रकारचे फटके त्यांनी यष्टीच्या दोन्ही बाजूस सहजतेने वापरले. ऑफ ड्राइव्हज व स्क्वेअरकट हे गावस्करचे आवडते व शैलीदार फटके. ब्रॅडमनचे हूक व पुल, विविध ड्राइव्हज प्रेक्षणीय.

ब्रॅडमन सुनीलपेक्षा आक्रमक फलंदाज व सुनीलच्याही बहुतेक शतकांमध्ये चौकारांची सख्या बरीच; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे दोघांनीही आपल्या खेळात षटकाराच्या फटक्याचा अभावानेच वापर केला. कदाचित दोघांचीही उंची बेताचीच असल्यामुळे चेंडू उंचावरून टोलवणे त्यांना अवघड जात असावे आजकालचे आक्रमक गणले जाणारे फलंदाज आपल्या शतकात एखाद–दुसरा तरी षटकार लगावतातच; पण ब्रॅडमन व गावस्कर यांना हा फटका फारसा पसंत नाही असे दिसते.

गावस्करच्या फलंदाजीची जगातल्या सर्वच संघांच्या कप्तानांनी व बहुतेक सर्व गोलदाजांनी मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे; पण साऱ्यांनीच त्याची तुलना ब्रॅडमनशी करण्याचे टाळून तो इंग्लंडच्या जेफ बॉयकॉटपेक्षा सरस फलंदाज आहे हे सांगितले आहे.

ब्रॅडमनने ५२ कसोटी सामन्यात ८० डावात २९ शतके नोंदविली तर गावस्करने या विक्रमाची बरोबरी करण्यासाठी ९५ सामने व १६६ म्हणजे ब्रॅडमनच्या दुप्पटीने डाव घेतले.

या २९ शतकाची नोंद करतानाही ब्रॅडमनने गावस्करच्या मानाने कमालीचे सातत्य दाखविले. ब्रॅडमनने आपले पहिले कसोटी-शतक चौथ्या कसोटी डावात लावले व पहिली दहा शतके केवळ २३ डावात झळकविली. गावस्करने आपले पहिले शतक तिसऱ्याच डावात काढले तरी १० शतकांसाठी मात्र त्याला ६१ डाव खेळावे लागले. योगायोगाची गोष्ट म्हणजे पुढची १० शतके झळकविण्यास ब्रॅडमन व गावस्कर दोघांनीही बरोब्बर ३२ डाव घेतले. पुढच्या ९ शतकांमध्ये मात्र गावस्कर पुन्हा ब्रॅडमनच्या मागे पडला. ब्रॅडमनने ही ९ शतके केवळ २४ कसोटी डावात पुरी केली तर गावस्करला ही शतके साजरी करण्यासाठी तब्बल ७३ डाव झगडावे लागले.

गावस्कर व ब्रॅडमन यांच्या शतकांची

### गावस्करच्या शतकांचा आलेख

| शतक क्रमांक | कितवी कसोटी | धावा (नाबाद*) | प्रतिस्पर्धी संघ | स्थळ व वर्ष | भारतीय धावसंख्या | कसोटीचा निकाल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ११६ | विंडीज | जॉर्जटाउन, ७१ | ३७६ | बरो. |
| २ | ३ | ११७* | विंडीज | ब्रिजटाउन, ७१ | ५/२२१ | बरो |
| ३ | ४ | १२४ | विंडीज | पोर्ट ऑफ स्पेन, ७१ | ३६० | बरो |
| ४ | ४ | २२० | विंडीज | ,, ७१ | ४२७ | बरो. |
| ५ | १३ | १०१ | इंग्लंड | मँचेस्टर, ७४ | २४६ | हार |
| ६ | १८ | ११६ | न्यूझीलंड | ऑकलंड, ७६ | ४१४ | जय |
| ७ | २२ | १५६ | विंडीज | पोर्ट ऑफ स्पेन, ७६ | ५/४०२ | बरो. |
| ८ | २३ | १०२ | विंडीज | ,, ७६ | ४/४०६ | जय |
| ९ | २५ | ११९ | न्यूझीलंड | मुंबई, ७६ | ३९९ | जय |
| १० | ३२ | १०८ | इंग्लंड | मुंबई, ७७ | ३३८ | बरो. |
| ११ | ३३ | ११३ | ऑस्ट्रेलिया | ब्रिस्बेन, ७७ | ३२४ | हार |
| १२ | ३४ | १२७ | ऑस्ट्रेलिया | पर्थ, ७७ | ९/३३० | हार |
| १३ | ३५ | ११८ | ऑस्ट्रेलिया | मेलबोर्न, ७७ | ३४३ | जय |
| १४ | ४० | १११ | पाकिस्तान | कराची, ७८ | ३४४ | हार |
| १५ | ४० | १३७ | पाकिस्तान | कराची, ७८ | ३०० | हार |
| १६ | ४१ | २०५ | विंडीज | मुंबई, ७८ | ४९४ | बरो. |
| १७ | ४३ | १०७ | विंडीज | कलकत्ता, ७८ | ३०० | बरो. |
| १८ | ४३ | १८२* | विंडीज | कलकत्ता, ७८ | १/३६१ | बरो. |
| १९ | ४५ | १२० | विंडीज | दिल्ली, ७९ | ८/५६६ | बरो |
| २० | ५० | २२१ | इंग्लंड | ओव्हल, ७९ | ८/४२९ | बरो |
| २१ | ५४ | ११५ | ऑस्ट्रेलिया | दिल्ली, ७९ | ७/५१० | बरो. |
| २२ | ५६ | १२३ | ऑस्ट्रेलिया | मुंबई, ७९ | ८/४५८ | जय |
| २३ | ६१ | १६६ | पाकिस्तान | मद्रास, ८० | ४३० | जय |
| २४ | ७१ | १७२ | इंग्लंड | बंगळूर, ८१ | ४२८ | बरो. |
| २५ | ७९ | ११५ | श्रीलंका | मद्रास, ८२ | ६/५६६ | बरो. |
| २६ | ८२ | १२७* | पाकिस्तान | फैसलाबाद, ८३ | २८६ | हार |
| २७ | ८८ | १४७* | विंडीज | जॉर्जटाउन, ८३ | ३/२८४ | बरो. |
| २८ | ९१ | १०३* | पाकिस्तान | बंगळूर, ८३ | ०/१७६ | बरो. |
| २९ | ९५ | १२१ | विंडीज | दिल्ली, ८३ | ४६४ | बरो. |

( संकलक · अशोक पानवलकर )

तुलना करताना एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की, ब्रॅडमनच्या क्रिकेटआयुष्यातील काही उमेदीची वर्षे दुसऱ्या महायुद्धामुळे वाया गेली. १९३९ ते १९४५ या सहा वर्षात महायुद्धामुळे एकही कसोटी सामना खेळला नाही. त्यामुळे शतके नोंदण्याची संधी ब्रॅडमनला मिळाली नाही. आपल्या क्रिकेटच्या कारकीर्दीत १९३२–३३ व १९३५ ही वर्षे वगळता प्रत्येक वर्षी ब्रॅडमनने निदान दोन शतके तरी लावली हे लक्षात घेतले तर या सहा वर्षांत त्याने आणखी निदान १० शतके तरी नोंदविली असती असे म्हणता येईल. अर्थात विक्रमाच्या नोंदीत अशा जर-तरला अर्थ नसतो.

ब्रॅडमनच्या २९ शतकांमध्ये १० द्विशतके व २ त्रिशतके यांचा समावेश आहे गावस्करने २९ शतकामध्ये ३ द्विशतके लावली आहेत. क्रिकेटमधल्या विक्रमात शतकाची मोजणी करताना द्विशतके व त्रिशतके यांना एकाच शतकात धरले जाते; पण ज्याप्रमाणे शालांत परीक्षेच्या निकालात पहिल्या तीस क्रमांकात, एकाच क्रमाकावर दोन-तीन विद्यार्थी असल्यामुळे ५० ते ६० विद्यार्थी असू शकतात, त्याच पद्धतीने गणना केल्यास गावस्करच्या २९ शतकात ३२ शतके सामाविली आहेत, तर ब्रॅडमनची ४३ ! प्रत्येक कसोटी डावात गावस्करची सरासरी ५२.४ पडते तर ब्रॅडमनची ९९.९४.

क्रिकेट हा सभ्य माणसाचा खेळ म्हणून ओळखला जातो. या सभ्य खेळातील एक 'जंटलमन' खेळाडू म्हणून गावस्करला मानले पाहिजे. आजही गावस्कर आपण बाद आहोत, विशेषत: यष्टीमागे झेलबाद आहोत हे लक्षात आल्यावर पंचाच्या निर्णयाची वाटही न बघता तंबूकडे चालू लागतो. यष्टीमागच्या झेलाबाबतचा पंचाचा निर्णय अनेकदा फलंदाजाच्या बाजूने लागू शकतो हे लक्षात घेतले तर गावस्करचे हे वर्तन स्तुत्य ठरते. ब्रॅडमन मात्र पंचाच्या निर्णयाची वाट पहात उभा रहात असे व पंचाचे बोट वर गेल्यावरच परत फिरत असे !

उजव्या यष्टीबाहेर (ऑफ स्टंप) जाणाऱ्या चेंडूचा पाठलाग करताना–यष्टिरक्षकाकडे किंवा स्लीपमध्ये झेल देत गावस्कर अनेक वेळा बाद झाला आहे. हा गावस्करचा कमकुवतपणा मानला जातो. ब्रॅडमनच्या फलंदाजीतील कमकुवत दुवा कोणता होता ?

१९३० सालचा ब्रॅडमनचा धडाकेबाज खेळ बघताना काही इंग्लिश गोलंदाजाना शोध लागला की, डाव्या यष्टीवरील (लेग स्टंप) माऱ्याला ब्रॅडमन नीट खेळू शकत नाही.

## शरीरवेधी गोलंदाजी

या सिद्धांतामुळेच पुढे 'लेग थिअरी'चा इंग्लिश गोलंदाजांनी पाठपुरावा केला व कुप्रसिद्ध 'बॉडीलाइन गोलंदाजी' म्हणजे 'शरीरवेधी गोलंदाजी' जन्माला आली.

ही लेगथिअरी हे काय प्रकरण होते ? १९३० साली ऑस्ट्रेलियाकडून २–१ असा मार खाल्लेला इंग्लिश संघ जेव्हा १९३२ साली ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर निघाला तेव्हा ब्रॅडमनला स्वस्तात बाद केल्याशिवाय आपल्याला विजय प्राप्त करता येणार नाही याबाबत इंग्लंडमध्ये कोणाचेच दुमत नव्हते !

ब्रॅडमनसारख्या उच्च दर्जाच्या फलंदाजाला कितीही चांगल्या वेगवान किंवा फिरकी गोलंदाजीने बाद करणे सोपे नव्हते. मग त्याला बाद करण्याचा एक विचित्र प्रकार बऱ्याच चर्चेअंती निश्चित करून इंग्लंडचा संघ जॉर्डिनच्या नेतृत्वाखाली लारवुड या सुप्रसिद्ध जलदगती गोलंदाजाला घेऊन ऑस्ट्रेलियाला निघाला. ऑस्ट्रेलियात आल्यावर त्यांनी लेगथिअरीचा वापर सुरू केला. फलंदाजाच्या डाव्या यष्टीवर जलद गोलंदाजाने सतत मारा करायचा व लेग-कडे यष्टीलगत स्लिपमध्ये व शॉर्ट लेग येथे ५ क्षेत्ररक्षकाचे कडे ठेवून फलंदाजाला त्यांच्याकडे झेल देण्यास भाग पाडावे ही होती लेगथिअरी.

पण ब्रॅडमनविरुद्ध कसोटी सामन्यात ही थिअरी वापरताना इंग्लिश गोलंदाजांनी, विशेषत: लारवुडने आपल्या आखूड टप्प्याच्या जलद उसळत्या चेंडूंनी ब्रॅडमन व इतर ऑस्ट्रेलियन फलंदाजाच्या डाव्या यष्टीवर नव्हे तर चक्क शरीराच्या रोखानेच मारा सुरू केला व ही कसोटीमालिका 'बॉडीलाइनमालिका' म्हणून कुविख्यात झाली. जॅक हॉब्स या जुन्या काळातील प्रख्यात इंग्लिश फलंदाजाने वर्तमानपत्रात लिहिले : जर या पद्धतीची गोलंदाजी चालू राहिली तर एखादा फलंदाज ठार होण्याचीच शक्यता आहे. मला जर अशी गोलंदाजी खेळावी लागली असती तर मी केव्हाच क्रिकेट सोडले असते !'

इंग्लंडच्या या क्रिकेटमधील शरीरवेधी नाट्याचे खलनायक होते जलदगती गोलंदाज लारवुड व कर्णधार जार्डिन तर नायक होता अर्थात ब्रॅडमन !

पहिल्या कसोटीत आजारपणामुळे खेळू न शकलेला ब्रॅडमन मेलबोर्नच्या दुसऱ्या कसोटीत फलंदाजीला उतरला; पण पहिल्याच चेंडूत त्याची दांडी उखडली गेली. यामुळे उत्तेजित होऊन दुसऱ्या डावात इंग्लिश गोलंदाजांनी ब्रॅडमनवर 'न भूतो' असा मारा सुरू केला. शरीरावर येणाऱ्या आखूड टप्प्याच्या उसळत्या चेंडूमुळे ब्रॅडमनला आपले आवडते पुल व हूकचे फटके झेल दिल्याशिवाय खेळणे शक्य नव्हते; पण ऑस्ट्रेलियाच्या दृष्टीने शरीरावर येणाऱ्या उसळत्या चेंडूपासून नुसता बचाव करणे पुरेसे नव्हते तर धावाही जमविणे आवश्यक होते.

## चोख प्रत्युत्तर

या ठिकाणी ब्रॅडमनच्या फलंदाजीवरील प्रभुत्वाची खरी कसोटी लागली. पण ब्रॅडमनने एका अभिनव तंत्राचा वापर केला. लेगला क्षेत्ररक्षकांचे कडे ठेवून इंग्लिश गोलंदाजानी ब्रॅडमनच्या रोखाने मारा केला की ब्रॅडमन चटकन डाव्या यष्टीच्या डाव्या बाजूस सरके व क्षेत्ररक्षकाच्या अभावी मोकळ्या पडलेल्या ऑफच्या बाजूला सणसणीत फटके मारी आपल्या शरीरवेधी गोलंदाजीने घाबरून जाण्याऐवजी ब्रॅडमन ऑफला फटकेबाजी करत आहे हे पाहून इंग्लिश गोलंदाज चक्रावूनच गेले. इतर ऑस्ट्रेलियन फलंदाजाची मात्र या गोलंदाजीपुढे दाणादाण उडाली व त्याचे ९ गडी बाद झाले; पण ब्रॅडमन मात्र खेळतच राहिला. शेवटी १०३ धावा काढून तो नाबाद राहिला व हा सामनाही ऑस्ट्रेलियानेच खिशात टाकला.

या माहसी डावामुळे ब्रॅडमनच्या लोकप्रियतेने ऑस्ट्रेलियात तर कळस गाठलाच; पण इंग्लंडमधील जनतेनेही ब्रॅडमन हा एक महान फलंदाज आहे हे मान्य केले. या

एकाच खेळीमुळे ब्रॅडमनची फलंदाजी डाव्या यष्टिवरील माऱ्याला तोंड देऊ शकत नाही या शोधाचा व 'लेगथिअरी'चा बोजवारा उडाला.

ब्रॅडमनच्या काळी फलंदाज शिरस्त्राण वापरत नसत. त्यामुळे या सर्व सामन्यात ब्रॅडमनने जलदगती गोलंदाजाच्या शरीरवेधी गोलंदाजीला शिरस्त्राणाशिवायच प्रत्युत्तर दिले आधुनिक क्रिकेटमध्ये शिरस्त्राण वापरण्याची सर्रास पद्धत असताना, आघाडीवर फलंदाजीला जाणाऱ्या गावस्करने लिली, स्नो, थॉमसन, इम्रान व रॉबर्टस् यांसारख्या प्रख्यात जलदगती गोलंदाजांना शिरस्त्राण न वापरता गेली ११ वर्षं समर्थपणे तोंड दिले ही गोष्टही त्याच्या फलंदाजीचा दर्जा सिद्ध करण्यास पुरेशी आहे. गेल्या काही महिन्यांपासूनच गावस्कर स्टीलची टोपी वापरू लागला आहे.

ब्रॅडमन आणि गावस्कर या दोघानीही आपल्या राष्ट्रीय संघास आपल्या फलंदाजीच्या जोरावर अनेकदा विजय प्राप्त करून दिले किंवा पराभवाच्या खाईतून वाचवले. जेव्हा गावस्करचे शतक लागले तेव्हा ६ वेळा भारत विजयी झाला व १७ सामने अनिर्णित अवस्थेत संपले; पण ६ सामन्यांमध्ये मात्र सुनीलचे शतक होऊनही भारताला हे सामने गमवावे लागले ब्रॅडमनचे शतक झळकलेल्या २९ सामन्यापैकी २३ वेळा ऑस्ट्रेलियाने विजय संपादन केला. ४ सामने अनिर्णित अवस्थेत संपले तर केवळ दोनच सामने ऑस्ट्रेलियाने गमावले. यावरून ब्रॅडमनच्या फलंदाजीने ऑस्ट्रेलियन संघ किती बलवान बनला याची कल्पना

## ब्रॅडमनच्या शतकांचा आलेख

| शतक क्र. | कितवी कसोटी | धावा (नाबाद*) | प्रतिस्पर्धी संघ | स्थळ व वर्षं | | ऑस्ट्रेलियाची धावसंख्या | कसोटीचा निकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ११२ | इंग्लंड | मेलबोर्न | १९२८–२९ | ३५१ | पराभूत |
| २ | ४ | १२३ | " | " | २८–२९ | ४९१ | विजयी |
| ३ | ५ | १३१ | " | नॉटिंगहॅम | ३० | ३३५ | पराभूत |
| ४ | ६ | २५४ | " | लॉर्डस् | ३० | ६/७२९ | विजयी |
| ५ | ७ | ३३४ | " | लीडस् | ३० | ५६६ | अनिर्णित |
| ६ | ९ | २३२ | " | ओव्हल | ३० | ६९५ | विजयी |
| ७ | १२ | २२३ | विंडीज | ब्रिस्बेन | ३०–३१ | ५५८ | " |
| ८ | १३ | १५२ | " | मेलबोर्न | ३०–३१ | ८/३२८ | " |
| ९ | १५ | २२६ | द. आफ्रिका | ब्रिस्बेन | ३१–३२ | ४५० | |
| १० | १६ | ११२ | " | सिडनी | ३१–३२ | ४६९ | " |
| ११ | १७ | १६७ | " | मेलबोर्न | ३१–३२ | ५५४ | " |
| १२ | १८ | २९९* | " | अॅडलेड | ३१–३२ | – | " |
| १३ | २० | १०३* | इंग्लंड | मेलबोर्न | ३२–३३ | १९१ | " |
| १४ | २७ | ३०४ | " | लीडस् | ३४ | ५८४ | अनिर्णित |
| १५ | २८ | २४४ | " | ओव्हल | ३४ | ७०१ | विजयी |
| १६ | ३१ | २७० | " | मेलबोर्न | ३६–३७ | ५६४ | " |
| १७ | ३२ | २१२ | " | अॅडलेड | ३६–३७ | ४३३ | " |
| १८ | ३३ | १६९ | " | मेलबोर्न | ३६–३७ | ६०४ | " |
| १९ | ३४ | १४४* | " | नॉटिंगहॅम | ३८ | ६/४२७ | अनिर्णित |
| २० | ३५ | १०२* | " | लॉर्डस् | ३८ | ६/२०४ | " |
| २१ | ३६ | १०३ | " | लीडस् | ३८ | २४२ | विजयी |
| २२ | ३८ | १८७ | " | ब्रिस्बेन | ४६–४७ | ६४५ | " |
| २३ | ३९ | २३४ | " | सिडनी | ४६–४७ | ८/६५९ | " |
| २४ | ४३ | १८५ | भारत | ब्रिस्बेन | ४७–४८ | ८/३८२ | " |
| २५ | ४५ | १३२ | " | मेलबोर्न | ४७–४८ | ३९४ | " |
| २६ | ४५ | १२७* | " | " | ४७–४८ | ४/२५५ | " |
| २७ | ४६ | २०१ | " | अॅडलेड | ४७–४८ | ६७४ | " |
| २८ | ४८ | १३८ | इंग्लंड | नॉटिंगहॅम | ४८ | ५०९ | " |
| २९ | ५१ | १७३* | " | लीडस् | ४८ | ३/४०४ | " |

( संकलक : अशोक पानवलकर )

येईल.

गावस्करचा बळी मिळणे ही प्रतिपक्षाला नेहमीच आनद देणारी घटना ठरली आहे; पण एक उच्च दर्जाचा फलंदाज असूनही गावस्करने हा आनद आपल्या प्रतिस्पर्ध्यांना भरपूर वेळा डावाच्या सुरुवातीलाच मिळवून दिला. ब्रॅडमनचा बळी मिळविणे, विशेषत. कमी धावात मिळविणे ही ऑस्ट्रेलियाच्या प्रतिस्पर्ध्यांना मात्र अशक्यप्रायच गोष्ट बनली होती. आपल्या जवळजवळ प्रत्येक डावात ब्रॅडमनने गोलदाजाना अक्षरशः रडविले व अनेकदा तासन् तास फलंदाजी केली, ब्रॅडमन बाद होणे ही क्रिकेट विश्वातली एक महत्त्वाची 'बातमी' ठरत असे यामुळे ब्रॅडमनला बारीकसारीक सामन्यामध्ये बाद करणारे सटरफटर गोलंदाजही कॉलर ताठ करून मिरवू लागले व त्याला शून्यावर बाद करणाऱ्या गोलदाजांना जगभर प्रसिद्धी मिळाली.

ब्रॅडमन कसोटी सामन्यात खेळत असो वा एखाद्या सामान्य सामन्यात त्याची फलंदाजी बघणे ही क्रिकेटशौकिनांना एक पर्वणीच वाटत असे व हजारोंच्या संख्येने क्रिकेटरसिक मैदानावर हजेरी लावत. एकदा इंग्लडमधल्या एका काउटी सामन्यात केंब्रिज विद्यापीठाच्या डेव्हिस नावाच्या गोलंदाजाने ब्रॅडमनला शून्यावर बाद केले. दुसऱ्या दिवशी 'डेली एक्स्प्रेस' या इग्लडमधील वृत्तपत्राने लिहिले 'आम्ही डेव्हिसचे अभिनदन करतो. पण काल लोक मोठ्या सख्येने ब्रॅडमनचा खेळ बघण्यासाठी जमले होते व त्याची निराशा झाली. यापुढे आपल्या गोलंदाजांनी ब्रॅडमनला शून्यावर बाद करण्याची कामगिरी फक्त कसोटी सामन्यांसाठी राखून ठेवावी!'

कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून ७ वर्षांनंतर ब्रॅडमन ऑस्ट्रेलियाचा कर्णधार झाला तर कसोटी क्रिकेटमध्ये प्रवेश केल्यापासून केवळ वर्षातच गावस्करला कर्णधारपद देण्यात आले. ब्रॅडमनने १९३६-३७ साली ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आलेल्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत कप्तानपदाची सूत्रे हाती घेतली व पुढच्या सर्व म्हणजे पाचही मालिकामध्ये ऑस्ट्रेलियाला विजयश्री मिळवून दिली. त्यापैकी ४ मालिका इंग्लडविरुद्ध तर एक भारताविरुद्ध होती. गावस्कर ८ वर्षे भारताचा कर्णधार होता व ४० कसोटी सामन्यात त्याने भारताचे नेतृत्व केले. त्यापैकी ८ सामन्यात भारत विजयी झाला, २६ सामने अनिर्णित राहिले व ६ सामने भारताला गमवावे लागले. कर्णधार म्हणून गावस्करला फारच मर्यादित यश मिळाले.

## लेखकद्वय

गावस्कर व ब्रॅडमन दोघानीही बॅटबरोबरच आपली लेखणीही चालवली व तीसुद्धा चागल्या शैलीत. गावस्करचे शालेय शिक्षण मुबईतील एका चागल्या इंग्लिश माध्यमाच्या शाळेत पार पडले व काळाला अनुसरून एकीकडे क्रिकेटचे मैदान गाजवत असताना त्याने दुसरीकडे पदवी प्राप्त केली.

ब्रॅडमनने मात्र वयाच्या १४ व्या वर्षीच शाळेला रामराम ठोकला, पण त्याच्या वडिलाच्या शिकवण्यामुळे म्हणा किंवा शाळेतील थोड्या काळातच त्याने इंग्लिश भाषा चांगल्या प्रकारे आत्मसात केल्यामुळे म्हणा, ब्रॅडमनने गावस्करसारखेच उत्तम प्रकारे इंग्लिश लेखन केले.

ब्रॅडमनने कसोटी सामन्यात प्रवेश केल्यावर दोन वर्षातच म्हणजे १९३० साली 'डॉन ब्रॅडमनस् बुक' हे आत्मकथनवजा पुस्तक प्रसिद्ध केले. १९३५ साली 'हाऊ टू प्ले क्रिकेट' व १९३८ मध्ये 'माय क्रिकेटिंग लाइफ' ही पुस्तकेही त्याने लिहिली. पुढे १९५० मध्ये त्याने 'फेअरवेल टू क्रिकेट' हे आत्मचरित्र व १९५८ मध्ये क्रिकेटची तात्रिक माहिती देणारे 'द आर्ट ऑफ क्रिकेट' ही पुस्तके लिहून प्रसिद्ध केली.

गावस्करने कसोटी-पदार्पणानंतर ब्रॅडमनच्या मानाने काहीसे उशीरा म्हणजे ५ वर्षांनंतर (१९७६ मध्ये) आपले 'सनी डेज' हे आत्मचरित्र प्रसिद्ध केले. गेल्याच महिन्यात त्याचे 'आयडॉल्स' हे समकालीन क्रिकेटपटूंची व्यक्तिचित्रे रेखाटणारे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे.

हल्ली कसोटीक्रिकेटपटूनी आपले आत्मचरित्र लिहिणे ही एक सामान्य बाब बनली आहे. आपले लिखाण चमकदार किंवा अलकारिक होण्यासाठी बहुतेक क्रिकेटपटू एखाद्या चांगल्या लेखकाची शब्दाकन करण्यासाठी नेमणूक करतात; पण गावस्कर व ब्रॅडमन आपले लेखन आपणच करणे पसत करतात. ब्रॅडमनबद्दल असे सागतात की, पहिल्या पुस्तकासाठी त्याच्या इग्लिश प्रकाशकानी लेखनासाठी बेनीसन या लेखकाची नेमणूक केली; पण त्याच्या अलकारिक वाक्यरचनेचा वापर करण्यास ब्रॅडमनने नकार दिला. ब्रॅडमनचे हस्तलिखित तर एवढे स्वच्छ असे कि, त्याची मुद्रणप्रत तयार करण्याची कधी गरजच पडली नाही.

'फेअरवेल टू क्रिकेट' व 'सनी डेज' ही दोन्ही आत्मचरित्रे साऱ्या जगभर लोकप्रिय ठरली. 'सनी डेज'च्या ६०,००० प्रतीच्या विक्रीने तर भारतीय पुस्तकाचा विक्रीचा विक्रम मोडला

## नियामकमंडळाशी झगडे

ब्रॅडमन व ऑस्ट्रेलियाचे क्रिकेट नियामक मडळ आणि गावस्कर व भारतीय क्रिकेट मडळ याच्यातील धुसफूस सदैव चालूच राहिली. क्रिकेटपटूच्या लेखनावर ऑस्ट्रेलियन मंडळाने बदी घातली असतानाही १९३० मध्ये 'डॉन ब्रॅडमनस् बुक' प्रसिद्ध झाले त्यामुळे दौऱ्याच्या कराराचा भंग केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला व त्याबद्दल क्रिकेट नियामक मंडळाने त्याला १५० पौंडाच्या विशेष भत्त्याऐवजी केवळ १०० पौड देऊन अप्रत्यक्षरीत्या ५० पौंडाचा दंड केला.

ब्रॅडमन व गावस्कर या दोघानीही काही वेळा नाटके करून मंडळाला खिजविले. १९३२ सालच्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत तिसऱ्या कसोटी सामन्याच्या वेळी ब्रॅडमनने जाहीर केले की, जर मंडळाने त्याला या सामन्याबद्दल वर्तमानपत्रात लिहिण्यास परवानगी दिली नाही तर तो या सामन्यात खेळणार नाही; पण मडळाने ही परवानगी नाकारली. ब्रॅडमन सामन्याच्या आदल्या दिवशी अचानक गायब झाला! सर्वत्र खळबळ उडाली व शोधाशोध सुरू झाली. दुसऱ्या दिवशी सामना सुरू व्हायची वेळ आली; पण ब्रॅडमनचा पत्ता नव्हता. तेवढ्यात अचानकपणे ब्रॅडमन मैदानावर अवतीर्ण झाला व साऱ्यानीच सुटकेचा निश्वास टाकला।


१९७५ साली पहिल्या प्रुडेंशिअल चषकाचा मर्यादित षटकाचा भारताचा पहिलाच

पृष्ठ १८ वर

भारत–वेस्टइंडीज क्रिकेटमालिका

# विश्वचषकाचं कौतुक नडलं !

बाळ ज. पंडित



कपिलदेव : विश्वचषक विजयानंतर नेतृत्व उणे पडले !

कानपूरची टेस्ट हरली तेव्हा विश्वनाथ-सारखे अनुभवी खेळाडू म्हणाले होते की, भारतीय खेळाडूंना तापायला वेळ लागतो. सुरुवातीला असाच पराभव होतो; पण नंतर खेळ सुधारतो. अहमदाबादला पानिपत झाल्यावर सगळं खापर खेळपट्टीवर फोडण्यात आलं. खेळाडूंचा दोष नव्हता, जो काय दोष होता तो खेळपट्टीचा होता असं वातावरण निर्माण करण्यात आलं.

पण आता ? कलकत्त्याला पराभव झाल्या-वर कोणती सबब सांगायची ? का अजूनही खेळाडू पुरेसे तापले नव्हते ? की खेळपट्टी खराब होती ?

कलकत्त्याच्या पराभवाचे समर्थन करण्या-साठी एकही सबब सांगण्यासारखी नाही. खेळपट्टी उत्तम होती. फलंदाजीला पोषक होती. तशीच गोलंदाजीलाही पूरक होती. अहमदाबादच्या पराभवानंतर खेळाडूंनी स्वतःला सावरलेले होते जणू काही अहमदाबादला पराभव झालाच नव्हता अशाच थाटात मुंबईला सगळेजण खेळले होते, त्यामुळं बरं वाटलं होतं. खेळाडूंना सूर सापडला, आत्मविश्वास परत मिळाला असंच वाटलं होतं; पण लगेच कलकत्त्याला फुगा फुटला !

वेस्टइंडीजच्या एकदा ५ बाद ८८ धावा झाल्या असतानाही आपणास त्यांना कमी धावात गुंडाळता आलं नाही. रॉबर्टस्‌सारखा दहाव्या नंबरचा 'फलदाज'ही साडेतीन तास मैदानावर ठिय्या मांडून बसला, हलला नाही, तिथंच आपल्या गोलदाजांनी सपशेल शरणागती पत्करली आणि फलंदाजांनी ? पहिल्या डावात ६ बाद ६३ व दुसऱ्या डावात ५ बाद ३६ धावा करणाऱ्या फलं-दाजांविषयी काय बोलायचं ? त्यांनीही वेस्टइंडीज संघापुढे साफ लोटांगण घातलं. अशा रीतीनं फलंदाजांनी व गोलंदाजांनी कलकत्त्याला पूर्णपणे निराशा केली.

गेल्या सहा महिन्यांपूर्वी याच भारतीय संघाने वेस्टइंडीज संघाला वर्ल्डकप साम-न्यात झोडपून काढलं होतं. तेव्हा देशातील जनता केव्हढी आनंदली होती ! वर्ल्डकप घेऊन येणाऱ्या कपिलचा आणि त्याच्या संघाचा मुंबई आणि दिल्लीला केव्हढा प्रचंड सत्कार झाला होता ! मग ते सत्काराचं लोण सगळीकडे पसरलं होतं. जिथं खेळाडू जातील

तिथं त्यांच्यावर बक्षिसाचा वर्षाव होत होता. खेळाडूंना मेजवान्या मिळाल्या. लाखो रुपये मिळाले काहींना फ्लॅटही मिळाले!

पण आता ?

त्याच मेजवान्या अंगाशी आल्या. सत्कार-समारंभानंतर डोळ्यांवर झापड आली...

कलकत्त्याच्या टेस्टमध्ये भारतीय खेळाडू शर्थीने लढतील म्हणून ईडन गार्डन्सवर जमलेल्या ७५००० प्रेक्षकांचा पार अपेक्षा-भंग झाला. ते चिडले. टी. व्ही. वर मुलाखत चालू असताना त्यांनी भारताच्या सर्वांत लोकप्रिय खेळाडूवर दगडांचा व फळांच्या सालींचा वर्षाव केला. खेळाडूंना घेऊन जाणाऱ्या गाडीच्या काचा फोडल्या. हॉटेल-जवळ धिक्काराच्या घोषणा दिल्या.

सहा महिन्यात केव्हढं चित्र पालटलं.

त्या वेळचे 'आयडॉल्स' आता 'डॉल्स' पेक्षाही कमी किंमतीचे भासू लागले.

आतापर्यंत सहापैकी पाच टेस्ट्सचा निकाल लागला आहे. त्यात तीन टेस्ट्स् जिंकून वेस्टइंडीजने स्वत:कडेच रबर टिकव-लेलं आहे. भारताचे एकापेक्षा एक असे दारुण पराभव झाले आहेत. 'वन डे' सामने चार झाले असून ते चारही वेस्ट इंडीजनेच जिंकले आहेत. कपिलदेव व गावस्कर खेळत नसल्याने पाचवा सामनाही वेस्टइंडीज सघच जिंकण्याची शक्यता आहे. मुंबईच्या एका समारंभात लॉइडने 'वन डे'ची मालिका आम्ही फाइव्ह–निल जिंकू असे आत्मविश्वा-साचे उद्गार काढले होते ते शब्द त्याने खरे करत आणलेत. वर्ल्डकप सामन्यात आपण त्याचा पराभव केल्याने एखाद्या जखमी वाघिणीप्रमाणे त्यांनी भारताचा वचपा घेण्याची जिद्द बाळगली होती. त्या पराभवामुळे नाउमेद न होता त्यांनी जोर लावला! आपण मात्र विजयी होऊनही त्याचा फायदा घेऊ शकलो नाही!

हे असं का झालं ? एकदम कोलांटी उडी आपण का घेतली ?

याला कुठलं तरी एकच कारण आहे असं मला वाटत नाही. अनेक कारणातून हे घडलेलं आहे.

एक गोष्ट मात्र लक्षात ठेवावी. सध्याचे पराभव पाहिल्यावर सगळ्यांच्या मनात एकच विचार चमकून जातो 'अरे, मग तो विश्वविजय तर फ्ल्यूक नव्हता ?' तो विजय फ्ल्यूक होता असं मानायला मी तयार नाही. एका गाफील क्षणी आपण त्या वेळी विंडी-जला कोंडीत पकडलं आणि ती कोंडी फोडा-यला विंडीज संघ असमर्थ ठरला ही गोष्ट सत्य आहे. जुन्या विजयाच्या तोऱ्यात थोड्या फाजील आत्मविश्वासाने ते खेळायला गेले. आपल्याला मात्र काही गमवायचं नव्हतं. त्यामुळे काहीही मानसिक दडपण न ठेवता बिनधास्तपणे आपण लढत देऊ शकलो आणि या लढतीतूनच आपण तो विजय मिळवला. त्यामुळे त्या विजयाबद्दल शंका घेण्याचं काहीही कारण नाही असं मला वाटतं.

पण कदाचित त्या विजयी पार्श्वभूमी-मुळेच आजचे पराभव आपणास अतिशय खेदजनक वाटत असावेत.

माझ्या दृष्टीने आजची परिस्थिती आपण स्वत: होऊनच ओढवून आणली आहे. आपणच या पराभवांना जबाबदार आहोत.

सध्या सतत टेस्ट सामने झडत असतात. एक झाल्याबरोबर दुसरी टेस्टमालिका सुरू होते. अशा सततच्या खेळामुळे खेळाडूंच्या मनावर व शरीरावर परिणाम होणे अपरि-हार्य असते. नाही म्हटलं तरी टेस्टमॅच खेळायची झाल्यास मनावर दडपण येतंच. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग!' अशी सध्या भारतीय खेळाडूंची परिस्थिती आहे. खेळाडू म्हणजे काय यंत्र आहे ? त्यांच्या मनाचा कोणी विचार करायला नको का ? एकदा इंग्लंडनं आपल्याकडे यायचं मग लगेच आपण इंग्लंडमध्ये जायचं. परतल्यावर लगेच श्रीलंकेशी लढत, नंतर मग पाकचा दौरा, तिथून परतल्यावर लगेच श्रीलंकेशी लढत, नंतर मग पाकचा दौरा, तिथून परतल्यावर घरी पाऊल टाकून बायका-मुलांच्या भेटी घेतो न घेतो तोच वेस्ट-इंडीजचा दौरा, त्यानंतर लगेच एक महि-न्याच्या आत इंग्लंडकडे प्रस्थान, तिथे वर्ल्ड-कपचे सामने, परततो न परततो तोच पुन्हा पाकिस्तानशी मुकाबला आणि पाकिस्तानचा संघ शेवटची टेस्ट खेळत असतानाच देशाच्या दुसऱ्या भागात वेस्टइंडीजचे आगमन झालेलं देखील. अशा या जीवघेण्या कार्यक्रमाने कुठल्याही खेळाडूचं शरीर आंबून जाणार आणि मन विटून जाणार हे उघड आहे. क्रिकेट हा खेळ शरीर व मन सशक्त असेल तरच चांगल्या प्रकारे खेळता येतो हे ज्यांना ठाऊक आहे त्यांना भारतीय संघाचा पराभव का झाला हे निराळं सांगायला नको. म्हणूनच...

यापुढं क्रिकेट-मालिकांचे कार्यक्रम आख-ताना खेळाडूंना श्वास घ्यायला तरी उसंत द्या असंच सांगण्याची वेळ आलीय.

परंतु ही गोष्ट स्वत: खेळाडूच का नाही बोलून दाखवत ? आपल्या मानधनाच्या वाढीबद्दल ते बोर्डाशी बोलणी करतात, आग्रह धरतात. मग आम्हाला सतत टेस्ट्स् खेळायला लावू नका असं तेच का नाही सांगत ?

## धंदेवाईकपणाचे तोटे

ते सांगत नाहीत यावरून संशय येतो की, मिळतायत ना पैसे, मग कशाला सांगा उगीच....असंच त्यांना वाटत नसेल ना ? टेस्ट–कारकीर्दीचा काळ अल्प असल्याने त्याच काळात जेव्हढे जास्तीत जास्त पैसे मिळतील तेव्हढे काढायचे असा हल्लीच्या खेळाडूंचा दृष्टिकोन असतो. खेळाडूंना जास्त पैसे मिळू नयेत असं कुणीही म्हणणार नाही. त्यांना टेस्ट खेळण्यासाठी जरूर पैसे द्यावेत; पण खेळाडूंनी फक्त पैशासाठीच खेळू नये. पैशाशिवाय इतरही काही गोष्टी महत्त्वाच्या आहेत हे लक्षात ठेवावे. देश, संघ वगैरेसाठी-सुद्धा खेळता येतं हे विसरू नये. पैशावर नजर ठेवून खेळणारा खेळाडू पुढल्या टेस्ट-मधील आपली निवड पक्की करून घेण्या-पुरताच चांगला खेळतो आणि मग कसाही खेळून बाद होतो. संघाचे काहीही झाले तरी त्याला पर्वा नसते! एखादा अष्टपैलू खेळाडू फक्त विकेटस् घेण्यातच सार्थकता मानतो आणि फलंदाजी चांगली येत असूनही निष्काळजीपणे खेळून लौकर बाद होतो व आराम करतो. फलंदाजीत अयशस्वी झाला तरी त्याला संघातून काढण्याची कोणाचीही हिंमत नसते. दुसरा खेळाडू एखाद्या सामन्यात शतक वगैरे करून ठेवतो आणि मग पुढल्या सामन्यात बेफिकिरीने खेळत लौकर बाद होतो. एकदा नाणं वाजवलेलं असल्यामुळं त्या जोरावर त्याला दोन–चार टेस्टस् सहज मिळतात आणि एखादा खेळाडू सरावच करत नाही. जुन्या पराक्रमावर आपल्याला संघात घेतील याची त्याला खात्री असते. असा हा नवीन 'प्रोफेशनल' अॅप्रोच संघात

येऊ लागला आहे.

क्रिकेटच मानधन तर सोडाच पण हल्ली क्रिकेटचा सामना जाहिरातीचं प्रभावी माध्यम बनल्यामुळं खेळाडूंना अमाप पैसा मिळतो. प्राईझ मनी. प्रेझेंटस्, टी.व्ही. अॅड-फिल्म्स, सिनेमा-फिल्म्स इत्यादि मार्गानं खेळाडूकडे पैसा जातो. आज मात्र या पैशालाच जास्त महत्त्व येत चाललंय आणि प्रत्यक्ष खेळाला दुय्यम स्थान प्राप्त झालय, असंच काही खेळाडूंच्या वागण्यावरून वाटतं. नाही तर प्राईझमनीवरून उडणारी भांडणं, पाच-पाच दिवस तेच तेच कपडे घालून लॉंड्री-अलाउन्स वाचवण्यासाठी धडपड, सकाळचा नाश्ता हॉटेलमध्ये न उरकता ग्राउंडवर जाऊन तिथं घेण्याची युक्ती... वगैरे गोष्टी कानावर पडल्या नसत्या. सरावाच्या वेळी काही खेळाडूंना शूटिंगला जावं लागतं, तर काही खेळाडूंना 'इतर' कामं असतात. या 'इतर' कामांमुळं त्यांची प्रकृती चागली राहू शकत नाही त्यातूनच त्याचा फॉर्म उतरणीला लागतो. मग संघातून काढले की ते जागे होतात आणि नंतर कुठ तरी धावा काढून सघातलं स्थान परत मिळवतात.

क्रिकेटखेळाडून पैसा जरूर मिळवावा; पण तो क्रिकेटखेळात मिळवावा. अन्य मार्गानेही पैसा मिळवायला हरकत नाही; पण मग ते 'अन्य' मार्ग क्रिकेटच्या आड येता कामा नयेत. आज नेमक होऊ नये तं झालंय म्हणूनच खेळाचा दर्जा खालावत चाललाय. त्याचमुळं ही पराभवाची मालिका वगैरे दिसते.

कपिलदेव, गावस्कर व मोहिंदर अमरनाथ हे तिघे आमचे प्रमुख आधारस्तंभ; पण त्याचीच आज काय स्थिती झालीय ते बघा! -

कपिलदेव हा भारतीय संघाचा डायरेक्टर, प्रोडयूसर व प्रमुख नट होऊन बसलाय! तो जितका गोलंदाजीत निष्णात आहे, तितकाच फलंदाजीत तयार आहे त्याचे नेतृत्वही तडफदार असतें; पण आज त्याचे लक्ष केंद्रित झाल्यासारखे दिसतंय फक्त गोलंदाजीवर. त्यामळ त्याचे फलंदाजीकडे बऱ्याच प्रमाणात दुर्लक्ष होते आहे. कप्तानाकडून आपण जबाबदारीची अपेक्षा करतो; परतु कपिलदेव कित्येक वेळा भलत्याच चेंडूवर भलताच फटका मारायला जातो आणि अकाली बाद होतो. त्यामुळं फलदाज म्हणून त्याच्याकडून ज्या अपेक्षा बाळगलेल्या असतात त्या फलद्रूप होत नाहीत. कप्तानाचे कर्तव्यही तो पार पाडत नाही. मग अशा खेळाडूकडें कप्तानपद कशाला ठेवायच हा प्रश्न उपस्थित झाल्यास त्यात काय चूक?

कपिलची ही तऱ्हा तर गावस्करची वेगळीच तऱ्हा! तो हल्ली 'प्लेझर' आणि 'एन्जॉयमेंट'साठी क्रिकेट खेळू लागलाय; पण याचा अर्थ असा नव्हे की, पहिल्याच चेंडूपासून त्याने तडाखे देत सुटावे. गावस्कर कित्येक वेळा काही काही गोष्टीत अतिरेक करतो सथ खेळायचं ठरवल्यावर तो कटाळा येईल इतका संथ खेळू शकतो आणि तडफदार तडाख्यानी भरलेला खेळ खेळायचा ठरवलं तर तो तसाही खेळू शकतो. सध्या तो दुसऱ्या प्रकाराचे बाबतीत अतिरेक करतोय अस वाटत. त्यानं 'प्लेझर' जरूर मिळवावं; पण 'प्लेझर' द्यावंही! आणि लौकर विकेट फेकून त्याला काय प्लेझर मिळतं कुणास ठाऊक? कलकत्याच्या टेस्टमध्ये तो पहिल्याच चेडूवर तडाखा मारण्याच्या प्रयत्नात बाद झाला. दुसऱ्या डावात तरी काही बोध घ्यावा? त्या वेळी त्यानं कहरच केला. होल्डिंगचा तीन स्टंप्सचा बाहेर पडलेला चेंडू तो जोरात मारायला गेला आणि बाद झाला! जो चेंडू खुद्द गावस्करनं शंभरपैकी ९९ वेळा सोडून दिला असता त्याच चेडूवर तो बाद व्हावा याचा अर्थ काय? प्लेझर मिळवणं याचा अर्थ निष्काळजीपणे खेळणं किंवा बेजबाबदारीनं खेळणं असा होतो काय? शंभरीच्या जवळपास टेस्ट खेळलेल्या गावस्करकडून आपण मॅच्युरिटीची अपेक्षा करायची नाही तर कोणाकडून?

मोहिंदर अमरनाथच्या खेळाची दोन टोकं एकाच मोसमात आपल्याला पहायला सापडली. या वर्षीच्या सुरुवातीला तो ऐन

## भारताच्या नावावरील काही अनोखे जागतिक विक्रम

१. प्रथम श्रेणीतील क्रिकेटमध्ये चौथ्या विकेटसाठी सर्वाधिक धावा. (५७७) विजय हजारे व गुल मोहमद. बडोदे वि. होळकर-१९४६-४७.

२. कसोटी : पहिल्या विकेटसाठी सर्वाधिक भागीदारी : ४१३ धावा. विनू मंकड आणि पंकज रॉय. वि. न्यूझीलंड मद्रास १९५५-५६

३. कसोटीतील दोन्ही डावांत शतके (तीन वेळा) : सुनील गावस्कर. १२४ व २२० वि. विंडीज (१९७१), १११ व १३७ वि. पाकिस्तान (१९७८), १०७ व १८२ वि. विंडीज (१९७८).

४. कसोटी क्रिकेटमधील सर्वाधिक धावा : सुनील गावस्कर. (८१३८)

५. एका सामन्यात सर्वाधिक षटके : सी. एस. नायडू. होळकर वि. मुंबई. १९४४-४५. सहा चेंडूची १५२.५ षटके म्हणजे ९१७ चेंडू.

६. सतत 'मेडन ओव्हर्स' : बापू नाडकर्णी २१ षटके किंवा १२६ चेंडू. वि. इंग्लंड, मद्रास-जाने ६४. एकूण पृथ करण ३२ षटके २७ निर्धाव ५ धावा बळी मात्र नाही.

७. यष्टिरक्षकाचे डावातील सर्वाधिक बळी : ६ (५ झेल १ स्टंप्ड)- सय्यद किरमाणी वि. न्यूझीलंड ख्राइस्टचर्च (कसोटी) १९७६.

८. सर्वांत तरुण कसोटी-कप्तान : मन्सूरअलीखान पतौडी २१ वर्षे ७७ दिवस.

९. कसोटीपदार्पणातील मालिकेत सर्वोच्च धावा : सुनील गावस्कर ७७४ धावा वि. वेस्टइंडीज १९७०-७१ (४कसोटी).

१०. कसोटीसामन्यातील सर्वांत जास्त अर्धशतके : सुनील गावस्कर (२९ शतके व ३६ अर्धशतके=६५ अर्धशतके).

**संकलन : अशोक पानवलकर**

भरात होता आणि आता पार निष्पर्णवृक्षासारखा दिसू लागला आहे. सहा डावात पाच शून्यं ! हा अतिक्रिकेटचा परिणाम, सरावाच्या अभावाचा परिणाम, की द्रव्यापुढं क्रिकेट कःपदार्थ लेखण्याचा परिणाम ? कित्येक वेळा क्रिकेट डोक्यात गेलं की असा मेंटल ब्लॉक येतो. खरं म्हटलं तर ज्याचा खेळ इतका मुळापासून हादरलाय अशा खेळाडूला निवडसमिती पुन्हा पुन्हा का घेते हेच समजत नाही ! मोहिंदरला तूर्त विश्रांतीची गरज आहे, तेव्हा त्याला संघात घेऊन एक जागा अडवण्यात अर्थ नाही. तो जेव्हा रणजी ट्रॉफी सामन्यात खेळून आपला आत्मविश्वास परत मिळवील तेव्हा त्याचा विचार करता येईल

अशा रीतीने संघातले तीन प्रमुख खेळाडू वेगवेगळ्या कारणानी फलंदाजीत अपयशी होऊ लागल्यावर भारताचा विजय कसा व्हावा ?

किरमाणीच्या यष्टिरक्षणातही पूर्वीसारखी सफाई राहिलेली नाही असे दिसून येते. हे केवळ अतिक्रिकेटमुळे झालेले आहे. कलकत्त्याला त्याने लॉइडला दोनदा जीवदान दिल्यामुळच डावाला कलाटणी मिळाली हे कोण विसरेल ?

वरील तीन–चार मुख्य फलंदाज अल्प धावात गुंडाळले गेल्यावर इतरांकडून जास्त धावांची अपेक्षा कशी करावी ? वेगवान गोलंदाजी हा आपल्या क्रिकेटला झालेला एक जुना रोग आहे. या रोगापुढे इतर खेळाडूंची मात्रा चालत नाही. त्यामुळंच कधी ६ बाद ६३ तर कधी ५ बाद ३६ अशा धावा फळयावर चढतात ! अजूनही पहिली जोडी धावांची पायाभरणी करू शकली नाही व त्यातल्या त्यात गावस्कर शतक वगैरे गाठू शकला नाही की, इतरानी लौकर बाद व्हायचे हा नियम आपण कसोशीने पाळतो !

फक्त फलदाजधार्जिणी खेळपट्टी मिळाली की, भरघोस धावा करायच्या आणि खेळपट्टीवर चेंडू उडचा मारू लागले की, तंबूत परतायचं ही जुनी सवयही आपणास नडते ! फलंदाजांच्या मते खेळपट्टी 'खराब' असली की, मार्शलचा 'मार्शल लॉ' होतो आणि मायकेल होल्डिंग लांब स्टार्ट घेत नसला तरी 'टेरर' ठरतो. दौऱ्यात केव्हा तरी ३ विकेटस् घेऊन २०० च्या भोज्याला शिवायच या हेतूनं इथं आलेल्या अँडी रॉबर्टस्ला पाचव्या टेस्टमध्ये घेताच एका डावात आपण ३ विकेटस् खोलून देतो आणि त्याचं स्वप्न पुरं करायला मदत करतो ! बेन डॅनियलला घेताक्षणीच तो यशस्वी ठरतो विन्स्टन डेव्हिस हा नवा असूनही प्रभावी ठरतो ! पूर्वी ट्रुमन, बेडसरसारखे फास्ट बोलर्स विकेटस् मिळणार नाहीत म्हणून इथ येत नसत; परंतु हल्ली आमची फलंदाजीच अशी काही 'परिपक्व' झाली आहे की, कोणत्याही फास्ट बोलरनं इथ यावं आणि विकेटस् घेऊन जावं !

अर्थात केवळ फलदाजीच्याच मर्यादा या खेपेला उघडया झाल्यात असं नाही तर गोलंदाजीच्या आणि क्षेत्ररक्षणाच्याही झाल्या आहेत गोलंदाजीचा एकांगीपणा नजरेत आला आहे, तसाच क्षेत्ररक्षणातला गलथानपणाही; पण देशात चांगले गोलंदाजच नाहीत तर आमची गोलंदाजी सुधारणार कशी ? आणि क्षेत्ररक्षण सुधारायला इथं वेळ कोणाला आहे ?

खरं म्हटलं तर वर्ल्डकप जिंकल्यावर आपला सघ पाच दिवसांच्या टेस्टमध्ये महापराक्रम गाजवील अशी अपेक्षा करणं प्रथम चुकीचं होतं आणि दुसरं म्हणजे ज्या १९८३ सालात पाक व वेस्टइंडीजनं आपल्याला ठोकून काढलं त्याच सालात पुन्हा त्याच दोन संघांशी खेळण्याचा निर्णयही चुकीचा होता. या वेळी विश्रांती घेण्यात जेवढा फायदा झाला असता तेवढा खेळण्यानं खासच झालेला नाही; पण पैसा.. त्याचा मोह कुणाला सुटलाय ? □

## भारतीय कसोटीधावा लाखाच्या घरात

भारताने विंडीजविरुद्धच्या चालू मालिकेतील पहिल्या कसोटीतच कसोटीतील एक लाख धावा पूर्ण करण्याचा मान मिळवला आहे. भारताविरुद्ध मात्र याआधीच एक लाख धावा पूर्ण झाल्या आहेत. विंडीजविरुद्धच्या मुंबई कसोटीपर्यंतचा तपशील एकत्र करून सोबतच्या तक्त्यात दिला आहे.

| प्रतिस्पर्धी | कसोटी | एकूण धावा | प्रत्येक कसोटीमागे धावा |
|---|---|---|---|
| इंग्लंड | ६७ | २९,९८७ | ४४७.५६ |
| ऑस्ट्रेलिया | ३९ | १८,१३१ | ४६४.८९ |
| विंडीज | ५२ | २६,९४१ | ५१८.०९ |
| पाकिस्तान | ३३ | १४,०७७ | ४२६.५७ |
| न्यूझीलंड | २५ | १२,०४३ | ४८१.७२ |
| श्रीलंका | १ | ७०१ | ७०१ ०० |
| एकूण | २१७ | १,०१,८८० | ४६९.४९ |

सकलन : अशोक पानवलकर

# ' विद्यार्थ्यांसमोर आदर्श नाहीत....'

**–दि. ब. देवधर**

भारतातील सर्वांत वयोवृद्ध क्रिकेटपटू प्रोफेसर दि ब देवधर याच्याशी नुकत्याच मनमोकळ्या गप्पा मारल्या. पुण्यातील पी. वाय सी. जिमखान्याजवळील त्यांच्या बंगल्यात क्रिकेटमहर्षीची भेट घेतली असता, त्यांच्या वाक्या-वाक्यातून क्रिकेटवरची त्यांची निष्ठा, त्याचे प्रेम व्यक्त होत होते या प्रेमापोटीच त्यांनी ' महाराष्ट्रातील खेळाडू मागे का ?' या प्रश्नाची जी अनेक कारणे सांगितली, त्याच्या मुलाखतीत त्यानी जे विचार व्यक्त केले त्यातून हेच स्पष्ट होत होते की खेळाडूने आत्मपरीक्षण करावयास हवे. खेळात राजकारण येता कामा नये. त्यानी उत्तम खेळाडूचे गुण सांगितले. खेळाडूचे आरोग्य हे उत्तमच असले पाहिजे. क्रिकेटमध्ये तीक्ष्ण व उत्तम नजर हेच सर्वात महत्त्वाचे. यासाठी प्रत्येक खेळाडूची नजर तीक्ष्ण असणे आवश्यक आहे. उत्तम शरीरयष्टीही क्रिकेटसाठी अत्यावश्यक असते. मनगटात जोर असला पाहिजे, खाद्यात जोर असला पाहिजे, तरच तो कसदार व जोरदार बोलिंग करू शकतो या सर्वांपेक्षा महत्त्वाचा गुण म्हणजे मानसिक तोल. कठीण प्रसगी, अडीअडचणीच्या प्रसगीसुद्धा आपला मानसिक तोल ढळू न देणे हे अत्यत महत्त्वाचे आहे क्रिकेटमध्ये मानसिक तोल ढळला किंवा मानसिक दबाव निर्माण झाला तर काय होते हे आपण सध्या बघतच आहोत. शारीरिक व मानसिक गुणाचा समतोल साधणारा खेळाडूच पुढे येऊ शकतो. हे सर्व गुण ज्याच्या अगी असतात तोच उत्तम खेळाडू होऊ शकतो. त्यानी पुढे असेही म्हटले की, आज हे सर्व गुण कुठे आढळतात ?

चागल्या दर्जाचे खेळाडू निर्माण होण्यासाठी रोज मेहनत आवश्यक आहे वर्तनात, खाण्यापिण्यात नियमितपणा आवश्यक आहे. खेळाडूने नजर चागली राहण्यासाठी जागरणे टाळली पाहिजेत. व्यसनापासून दूर राहिले पाहिजे. हल्ली तरुणाच्या पुढे निरनिराळी प्रलोभने निर्माण झाली आहेत. उदा. सिनेमा, टी. व्ही हॉटेल इ आज सर्वसाधारण विद्यार्थी आठवड्याला निदान २–३ चित्रपट तरी बघतो. त्याप्रमाणे साधारणपणे दररोज निदान २–३ तास टी व्ही सुद्धा बघतो या सर्वांतील झगझगीतपणा हा डोळ्याना हानिकारक असतो यामुळे डोळ्याच्या क्षमतेवर निश्चितच परिणाम होतो हा परिणाम क्रिकेटला हानिकारक आहे. याशिवाय निरनिराळ्या प्रकारची व्यसने, वेळीअवेळी हॉटेलात खाणे, यामुळे प्रकृतीचे नुकसान होते. पोटाचे आरोग्य बिघडते, असा आरोग्यावर परिणाम झालेला खेळाडू खेळात टिकाव कसा धरू शकणार ?

स्कूल क्रिकेटबाबत बोलताना दि. ब देवधर म्हणाले की, क्रिकेटला शाळातून उत्तेजन मिळत नाही. क्रिकेट विषयाबाबत मुख्याध्यापक, क्रीडाशिक्षक याच्यात उदासीनता आहे, क्रिकेटबाबत अत्यंत बेफिकीर वृत्ती आहे. यातील कित्येक मुख्याध्यापकाच्या मनात क्रिकेटबद्दल अढी आहे ही अढी निर्माण होण्याची काही कारणे अशी को, क्रिकेट परदेशी खेळ आहे. हा अत्यत महागडा खेळ आहे, त्याची साधने महाग आहेत. क्रिकेट हा जरी महागडा खेळ असला तरीही या प्रश्नावर क्रिकेट असोसिएशनने एक तोडगा सुचविला होता की, एकूण टीमच्या खर्चापैकी १–३ भाग असोसिएशन देईल, एक भाग पालकाकडून गोळा केला जावा व उरलेला भाग शाळेने खर्च करावा; पण या योजनेलादेखील प्रतिसाद मिळाला नाही

शाळेतील विद्यार्थ्यांपैकी निवडक खेळाडू निवडून त्याना उत्तेजन देणे आवश्यक आहे त्याच्यावर परिश्रम घेतले पाहिजेत. त्याना चागले कोचेस दिले पाहिजेत व या कोचेसनी त्याच्याकडून चागल्यापैकी सराव करून घेतला पाहिजे. पुण्यात कित्येक शाळाना स्वत ची मोठी क्रीडागणे आहेत; पण यापैकी फारच कमी शाळा याबाबत उत्साह दर्शवतात. नाही म्हणायला नू म. वि चे अपवादात्मक उदाहरण आहे नू म.वि कडून याबाबत चागल्या तऱ्हेचे प्रयत्न केले जातात. साधारणपणे ४–५ वर्षांपूर्वी क्रीडा-संचालकानी पुण्यातील प्रमुख १४–१५ शाळेतील मुख्याध्यपकाना निमंत्रण दिले. त्याची बैठक घेण्याचे ठरवले; पण कोणीही प्रतिसाद दिला नाही काही जणानी नाही म्हणायला आपले प्रतिनिधी पाठवले; पण त्याना क्रिकेटबाबत कितपत आस्था होती कोण जाणे.

पालकाकडून आजतागायत अपेक्षीत असे सहकार्य मिळालेले नाही. उदा द्यायचे झाले तर पी. वाय सी. वर अनेक मुले क्रिकेट खेळण्यासाठी येतात. त्यापैकी फारच थोड्याचे पालक आपल्या पाल्याविषयी आस्थेने चौकशी करताना दिसतात. आपला पाल्य रोज क्रीडांगणावर नियमित वेळेवर येतो का ? त्याचे वर्तन कसे असते ? त्याची प्रगती काय ? याची कोणीही चौकशीसुद्धा करत नाही. पालक सपूर्णपणे बेफिकीरपणे वागतात. याशिवाय मुलाचे स्वत वर नियत्रण नाही

याहून वाईट परिस्थिती कॉलेजमधील क्रिकेट व क्लबचे क्रिकेट यामध्ये आढळते. हल्ली कॉलेजमध्ये सरावासाठी नियमितपणे येणारी मुले फारच अपवादात्मक परिस्थितीत दिसतात नेटप्रॅक्टिस तर जवळजवळ कोणीच करत नाही. हेच विद्यार्थी फक्त मॅच आली की मैदानावर दिसतात इतर वेळी, सरावाच्या वेळी ते

तेथे कधीही फिरकतसुद्धा नाहीत. मॅच आली की ते तासनतास प्रॅक्टिस करताना दिसतात. पण त्याचा काय उपयोग ? हल्ली फक्त रविवारी क्रिकेटच्या मॅचचे फॅड आहे. यावर बोलताना प्रोफेसर देवधर अत्यत खेदाने म्हणाले की, आज क्रिकेटला 'पिकनीक क्रिकेटचे' स्वरूप आलेले आहे आज आपणास कोठेही प्रथम दर्जाचे क्रिकेट नजरेस पडत नाही. कोणत्याही खेळाडूची अविश्रात परिश्रम घ्यायची तयारी नाही. पुण्यात मैदाने, सर्व प्रकारच्या सोई, सर्व साधने उपलब्ध असताना ही तऱ्हा तर बाकीच्या ठिकाणी काय परिस्थिती असेल याचा आपण विचार केलेलाच बरा !

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे धोरण असे आहे की, सामने सगळया जिल्ह्यांत मिळावे अशी अपेक्षा. जे विभागीय सामने होतात ते कोणत्या एका ठिकाणी न होता निरनिराळया ठिकाणी व्हावेत, असा प्रयत्न असतो. या झोनल मॅचमध्ये चमकणारे खेळाडू रणजीमध्ये घेतले जातात. पण आज मागणी अशी केली जात आहे की, खेळाडूच्या जागा जिल्हावार वाटून घ्याव्या. ही मागणी सर्वथा अशक्य व चूक आहे. रणजीमध्ये चागले होतकरू खेळाडू खेळवायचे का केवळ जागा भरायच्या म्हणून खेळाडू खेळवायचे ? सघात स्थान मिळवण्यासाठी खेळाडूने स्वतःच्या पराक्रमाने स्वत चे कर्तृत्व सिद्ध केले पाहिजे. यासाठी जिल्हावार खेळाडूच्या जागा वाटून घेणे हे सर्वथा अयोग्य आहे. हे अयोग्य तर आहेच; पण क्रिकेटच्या प्रगतीच्या दृष्टीनेसुद्धा हानिकारक आहे. ज्या वेळी त्याना पुण्याच्या–कोल्हापूरच्या क्रिकेटबद्दल विचारले त्या वेळी ते म्हणाले, विकेटवर काहं ही नाही. विकेटला दोष देणे ही अयोग्य प्रथा आहे आज आपण काय बघत आहोत ? वेस्टइडीजचे बोलर त्यांना साथ न देणाऱ्या खेळपट्टयांवरही भारतीय सघाची दाणादाण उडवत आहेत. खेळपट्टीवर काहीही अवलबून नसते· फास्ट बोलिंगसाठी दडात जोर लागतो, मनगटात जोर लागतो व मजबूत ताकद लागते. विकेट बोलरला अनुकूल रहावी म्हणून खेळपट्टीवर गवत असणे आवश्यक आहे. नेमके हेच गवत आज वरील दोन्ही विकेटवर नाही. कारण उत्पन्नासाठी निरनिराळ्या कपन्या, संस्था, क्लब्ज् यांना या विकेटस् दिल्या जातात. सतत वापराने त्यावरील गवत नष्ट होते व कालातराने ती विकेट निर्जीव बनते. या निर्जीव विकेटची बोलरला जरासुद्धा मदत मिळत नाही. आठवडयातून एखादा दिवस या विकेटवर मॅच घेऊन उरलेल्या दिवशी ती तशीच ठेवली पाहिजे. या विकेट निर्जीव बनवण्यात ग्राउंडमनचा तितकाच हातभार असतो. ते ग्राउडबाबत फार बेफिकिरीने वागतात.

श्री. देवधर यांना ज्या वेळी येथील कोचेस-बाबत प्रश्न विचारला या वेळी ते म्हणाले–पतियाळाहून शिक्षण घेऊन आलेले कोचेस हे अत्यत निरुपयोगी ठरलेले दिसतात. त्याच्याकडून कोणत्याही प्रकारची अपेक्षित कामगिरी पार पडलेली दिसत नाही. कारण त्याच्यामध्ये क्रिकेटबद्दल निष्ठाच नाही. त्यांच्यात आपण काही तरी नवीन निर्माण करून दाखवू अशी महत्त्वाकांक्षाच नाही. विद्यार्थ्यांपुढे आदर्श निर्माण करून, विद्यार्थ्यांमधून चांगले खेळाडू निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा नाही. विद्यार्थ्याला आदर्श खेळाडू करावयाचा असेल तर त्याच्या समोर स्वत.चा निर्व्यसनी आदर्श निर्माण करावा लागतो, याची आज कोणाचीही तयारी नाही.

—राजेंद्र सखदेव

## देवधरांनी राजीनामा का दिला ?

क्रिकेट कट्रोल बोर्डाने महाराष्ट्रातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला वेस्टइडीजविरुद्ध पश्चिम विभाग अशी तीन दिवसाची मॅच दिली. ही मॅच आपल्या येथे व्हावी म्हणून सोलापूर व कोल्हापूर या जिल्हाकेंद्रांनी मागणी केली. महाराष्ट्र क्रिकेट असो. च्या कार्यकारिणीला असे वाटले की, ही मागणी मान्य न करून बाईटपणा घेण्यापेक्षा त्यानी क्रिकेट कंट्रोल बोर्डाचे सेक्रेटरी श्री. अनत कनमाडीकर याना पत्र लिहिले. त्यात त्यांनी लिहिले की, श्री. कनमाडीकर यांनी स्वतः येऊन दोन्ही ठिकाणी पहाणी करावी. त्याप्रमाणे श्री. कनमाडीकर आले. त्यांच्याबरोबर महाराष्ट्र असो. चे दोन सभासद होते· त्यांनी दोन्ही ठिकाणची पहाणी केली. त्यात त्याना असे आढळून आले की, कोल्हापूरला विमानतळ नाही. खेळाडूंच्या निवासासाठी पंचतारांकित हॉटेल नाही. रहाण्यासाठी Aircondition खोल्या नाहीत· सोलापूरला हॉटेल आहे, पण विमानतळ नाही. म्हणून श्री कनमाडीकर यांनी दोन्ही ठिकाणे अमान्य केली. ही मॅच सर्व सोई उपलब्ध असलेल्या पुण्यात घ्यावी असा लेखी रिपोर्ट दिला त्यानंतर पुण्यात १७ ऑगस्टला पत्रकारपरिषद घेण्यात आली. त्यानतर कोल्हापूर व सोलापूरच्या लोकाना कळले की मॅच पुण्यात आहे. त्यानंतर कोल्हापूरमधून लोकसभेवर निवडून गेलेले श्री खानविलकर यांनी प्रयत्न चालू केले की मॅच कोल्हापूरला व्हावी. त्यासाठी ते मुबईला गेले. वसंतदादा पाटलाना भेटले. त्याना गळ घातली की त्यानी या प्रकरणात हस्तक्षेप करावा. त्यानंतर २१ ऑगस्टला कट्रोल बोर्डाची मुबई येथे बैठक होती. त्या वेळी श्री. साळवे यांना वसंतदादांनी फोनवर विनंती केली की, मॅच कोल्हापूरला द्यावी. त्याचप्रमाणे महाराष्ट्र असो. चे सेक्रेटरी श्री. ज्ञानेश्वर आगाशे यानाही फोन केला. श्री आगाशे यानी कोणताच विरोध दर्शवला नाही. नंतर मीटिंगमध्ये कोणत्याही प्रकारचा officialy ठराव न करता साळवे यानी आगाशेंना (तोंडी) सांगितले की, मॅच कोल्हापूरला द्यावी त्याप्रमाणे श्री. आगाशे यानी असो.च्या कार्यकारणीचा विचार न घेता मॅच कोल्हापूरला दिली. त्यानतर २३, २४ ला वसतदादा पुण्यात आले असता पुण्यातील 'तरुण भारत'च्या प्रतिनिधीने त्याना विचारले की, त्यानी एन. के. पी. साळव्याना व ज्ञानेश्वर आगाशेंना फोन केला होता का ? वसतदादांनी आपण फोन केल्याचे मान्य केले. त्यामुळे क्रिकेटक्षेत्रात राजकारण आणल्याचे उघड झाले राजकीय दबाव स्पष्ट झाला.

क्रिकेटक्षेत्रात जो राजकीय दबाव निर्माण केला गेला ही अत्यंत अनिष्ट प्रथा निर्माण झाली. यामुळेच क्रीडाक्षेत्रात राजकारण आले.दबाव निर्माण केल्याच्या निषेधार्थ श्री. दि ब. देवधर यांनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदाचा राजिनामा· दिला. ◻

# प्रिय सुनील,

इतिहासाच्या एका अवघड वळणावर तुला हे पत्र लिहीत आहे. हे वळण अवघड आहे तितकच धोक्याचही. समूहाच्या अस्वस्थतेच आहे तेवढंच व्यक्तींच्या अगतिकतेचही. ते विचाराच्या वाटमारीचं आहे तसच श्रद्धाच्या लूटमारीचंही. ते खुनाखुनींचं आहे, तेवढंच खादेपालटाचही यांत्रिक गुतागुतीचं आहे, तितकच बौद्धिक गफलतीचही. ते कागदी निष्ठाचं आहे, तसच कृतिहीन कनिष्ठाचही. आधुनिक आयुधाचं आहे तेवढच सामर्थ्यशाली साधनाचही. ते सत्तेच्या साधकाच आहे मालमत्तेच्या मक्तेदाराचही. इतिहासाच्या ह्या वळणावर साधनच सामर्थ्यशाली झालीयत आणि साध्याची फेरमाडणी झालीय' मूल्याची मिरासदारी सपुष्टात आलीय !

समाजजीवनाचं प्रत्येक क्षेत्रच अस्वस्थ आहे. खेळाच्या क्षेत्रात तर निराशंच सावटच पडलय. अस्मिता हरवूनं गेलीय. एखादा अमृतराजच जगाच्या कुठल्या तरी कानाकोपऱ्यात किल्ला लढवतोय; पण विम्बल्डनच्या समरागणात पहिल्या दुसऱ्या फेरीतच गारद होतोय. एखादा 'मास्टर' पदुकोण मुबई–कलकत्त्याच्या कोर्टसवर सरळसोट पराभूत होतोय. एके काळी यशाची मक्तेदारी मिरवणारा हॉकीसघ अॅस्ट्रोटर्फच्या जमान्यात पोत्यांनी गोल गोळा करत जगभर हिंडतोय. क्रिकेटच्या क्षेत्रात तर पराभवाची पोतडी आता भरत आलीय आणि 'अती झालं नि हसू आल' ही अवस्था आमच्या वाट्याला आलीय !

सनी, प्रत्येक खेळ हा शेवटी खेळच असतो. प्रत्येकाचे यम-नियम वेगळे असतील; पण त्याला जात नसते, पात नसते, प्रात नसतो–परगणा, धर्म नसतो ! पण आपण माणसच करटी ! आपण त्यात द्वेष–मत्सराच तेल ओततो. राजकारणाचा रग देतो, धर्माची परिमाणं प्राप्त करून देतो. प्राताच्या प्रदेशात बदिस्त करू पहातो. नाही तर व्यक्तीच्या सोयीनुसार वाकवतो, राबवतो. सुनील, आमच्या खेळाला इतिहासाच्या अशाच एका अधेऱ्या कोपऱ्यावर तू आम्हाला मिळालास आणि आपल्या बॅटीच्या तेजानं आमच्यातला काळोख काही काळ का होईना उजळून सोडलास आपल्या शैलीदार चौकारानी तू आमच्या अगतिकतेच्या परिसीमा चौफेर पार केल्यास आणि धावांच्या शतका-शतकानी स्वतःच्या आणि समूहाच्याही सचितात भर टाकत गेलास. *आपल्या पराक्रमान* तू आमची मनं बांधून ठेवलीस आणि आपल्या नैपुण्यावर आमच्या नजरा खिळवून ठेवल्यास तू आमच्यातली एक 'दंतकथाच' वाटायला लागलास.

सुनील, म्हणून तर तुझी स्वप्नंही आमचीच स्वप्न ठरली. तुझी यशंही जणू आमचीच यश होती. आम्ही तुला शैलीदार म्हणालो. 'लिटल मास्टर' म्हणून तुझा गौरव केला. 'सर गावस्कर' म्हणून तुझी रंगीन चित्रं छापून शब्दाचा विक्रमही साधला. आम्ही तुला वर्षानुवर्षं, दिवसचे दिवस पहात आलो कॅमेऱ्याच्या क्लोजअप्स मधून. तिष्ठत राहिलो तुझ्या मैदानावरच्या आगमनाची वाट पहात. तुला आम्ही 'सनी डेज' मध्ये भेटलो. थम्स् अपच्या बाटल्या झेलत असताना दूरदर्शनच्या पडद्यावर पाहिलं. दाद देत राहिलो निरलॉन एक्झि-*क्यूटिव्ह मीटिंगमधल्या तुझ्या जाहिरातलेल्या* दिमाखदार कपड्यांवर !

पण काळ पुढे सरकत होता. स्वच्छ सूर्यप्रकाश संपून सावल्यांचा खेळ सुरू झाला होता. असली गोलंदाजीच्या वादळवाऱ्यात तुझाच खाब डळमळल्यावर, त्यापाठोपाठ आज आमचाही तंबू भुईसपाट होताना पहातोय आम्ही. तुझी यशंच आमची यशं होती. खरय ते. म्हणून तर आज तुझी अपयशं ही आमची अपयशं ठरतायत.


**स्वातंत्र्यवीर सावरकर जन्मशताब्दीनिमित्त प्रकाशित**

# सावरकर दैनंदिनी– १९८४

**या दैनंदिनीची वैशिष्ट्ये**

– निवडक सावरकर-वाङ्मयाचे उत्कृष्ट संकलन
– अत्यंत दुर्मिळ छायाचित्र-पुरवणी.
– नामवंत साहित्यिकाचे लेख व कविता
– १९८४ ची तारीख, वार, तिथी.

**सहभाग**

कुसुमाग्रज, ग. दि. माडगूळकर
कवी मनमोहन, शंकर वैद्य
स. गं. मालशे, बाळासाहेब ठाकरे
वि. स. वाळिंबे, डॉ. विद्याधर पुडलिक
पां. कृ. सावळापूरकर आणि डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर.

**पृष्ठसंख्या – सुमारे २५०**
**चार रंगी आकर्षक मुखपृष्ठ**
**किंमत तीस रुपये**

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे–४११०३०**

काळ काही नेहमीच क्रूर असत नाही. म्हणून तर आजही आमचा विश्वास टिकून आहे. आम्हाला खात्री आहे त्याच मैदानात तू समर्थपणे पुन्हा एकदा उतरशील, त्याच मातीच्या तुकड्यावर पहिल्यासारखाच टिच्चून उभा रहाशील. आपली बॅट परजत चौकाराच्या संयमी फैरी झाडशील. आमच्या डोळ्यांचं पारणं फेडत आपल्या विश्वविक्रमाचा धनी होशील आणि मग आमच्या अपेक्षांचे उत्सव करून टाकशील! आमची आळसटलेली मनं धुंद करून टाकशील आणि मग दूरदर्शनच्या मुलाखतीत म्हणालास तसा जग जिंकल्याच्या अभिमानात, आपली समर्थ बॅट उचावत, मैदानाला पाठ करत तू पॅव्हेलियनकडे परतशील! तेव्हा आम्ही उच्चरवान तुझा जयजयकार करू! डोक्यावरच्या कागदी टोप्या हवेत भिरकावू. आमच्या मळकट रुमलाचे झेंडे हवेत फडफडवू. हात बधिर होईस्तो टाळ्याचा कडकडाट करीत राहू तुझी काल-परवाची अपयशं तुला माफ करून टाकू एके काळी विभागवादाची बिरुद भले आम्ही तुझ्या ब्लेझरवर लटकावली असतील. एका शहरप्रेमाबद्दल तुझ्यावर ताशेरेही ओढले असतील. गटबाजीबद्दल तुला दूषणं दिली असतील! पण तूही अखेर एक माणूसच आहेस [तोही ह्याच काळ्याकरड्या मातीतला. तेव्हा मात्र आमच्या मातीच्या मर्यादा म्हणून आम्ही ते सारं खुशाल दुर्लक्षून टाकू! तुझ्या अंतिम विजयाच्या क्षणी बेहोष होऊन आमच्या आनंदाच्या झुली तुझ्या आयुष्यावर पांघरू!

सनी, पण हे सार करताना आम्ही सातत्यान तुझ्यासाठी एक बाजू लावून धरणारे व्यावसायिक पत्रकार असणार नाही. तुझ्या अपयशाचीही भलावण करणारे भगतगणही असणार नाही. तुझ्या गणाना 'दैवी' म्हणून गुणगान करणारे आंधळे भक्त असणार नाही की तू आउट होताना तुझ्या सामोरा आलेला प्रत्येक बॉलच जणू असामान्य होता अस समजणारे भोळसट भाट असणार नाही. आम्ही असू ते फक्त तुझ्या गुणाचे गौरवक. वानखेडेच्या, ग्रीनपार्कच्या नाही तर ईडन-गार्डनच्या स्टॅंडसच्या, उतरत्या पायऱ्यावर चढत्या-उतरत्या उन्हात तुझ्या निर्दोष फटक्यांच्या आतषबाजीला दाद देणारे, त्यातली सहजता, डौल डोळ्यात प्राण आणून दिवसेनदिवस पहात राहणारे रसिक प्रेक्षक किंवा दूरदर्शनच्या वीसेक इंची निळ्या किंवा करड्या काचातून तुझ्या यशा-अपयशाचा न्याय करू पहाणारे दर्शक! नाही तर जिवाचा कान करून कॉमेंटरीचा शब्दनशब्द टिपणारे आकाशवाणीचे नागर-ग्रामीण श्रोते!

तुझे चित्रपट चालोत, न चालोत. तू अभिनेता होवोस न होवोस, आपल्या आठवणीची पुढची पर्वं तू प्रसिद्ध करोस न करोस राजकीय नेता म्हणून तू राज्यसभेत जावोस न जावोस. जाहिरातदार तुझ्या व्यक्तिमत्त्वाच भांडवल करोत न करोत, आम्ही अखेरपर्यंत तुझ्या मैदानी कर्तृत्वाचा जयजयकार करत राहू, तुझ्या खेळाच्या आठवणींची च्युइंगमस चघळत राहू! इतिहासाचं हे वळण निश्चितच अवघड आहे, धोक्याच आहे. मूळचे संकुचित आम्ही अधिकच संकुचित होत आहोत. द्वेष-दंभानं आंधळे होत आहोत विकृत स्पर्धेच्या नादात असली खिलाडूपण गमावत आहोत. आमच्याच अस्मिता अधारून टाकत आहोत. विजयाच्या पताका पायदळी तुडवून अपयशाचे पेले पतकरत आहोत! म्हणूनच तर सुनील, तुझ्या विश्वविक्रमाची, आम्ही सामान्य प्रेक्षक उत्कंठेने वाट पहात आहोत. इतिहासाच्या ह्या काळोख्या कोपऱ्यात तुझ्या विजयाची, त्यातल्या विजिगीषुतेची, बेहोशीची आणि त्यातून कदाचित सापडणाऱ्या अस्मितेची आम्हाला नितांत आवश्यकता आहे. तुझ्या कर्तृत्वाबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत!

आपला,

**अशोक प्रभाकर**

---

## १५ वर्षांपूर्वी अशी मॅच झाली असती तर...

१८८३ ची विश्वचषकस्पर्धा इंग्लंडमध्ये सुरू असताना पत्रकारकक्षात अनेक माजी थोर क्रिकेटपटू येत असत. सर गॅरफील्ड सोबर्स, रोहन कन्हाय, रिची बेनॉ, फ्रेडी ट्रुमन, ब्रायन क्लोज या साऱ्या प्रख्यात माजी क्रिकेटवीरांना बघितल्यावर माझ्या मनात राहून राहून विचार येत होता की, अशा मर्यादित षटकाच्या सामन्यांना आज जेवढी लोकप्रियता मिळत आहे, आज जस या सामन्याच भव्य प्रमाणावर आयोजन केलं जात आहे, तसं यापूर्वीच म्हणजे १५-२० वर्षांपूर्वीच केल गेल असतं तर त्या वेळी ही स्पर्धा किती रंगतदार झाली असती!

आणि त्या वेळी जर जागतिक संघ निवडला गेला असता तर?

रिची बेनॉसारखा कुशल, धूर्त कर्णधार, गॅरी सोबर्ससारखा महान अष्टपैलू खेळाडू, हॉल-डेव्हिडसनसारखे वेगवान पण अतिशय अचूक मारा करणारे गोलंदाज, वॉली ग्राउटसारखा यष्टिरक्षक, सुभाष गुप्ते-रामाधीन-व्हॅलेंटाइन-गिब्स, ज्याच्या गोलंदाजीवर धाव घेणे अतिशय कठीण अशी अचूक टप्प्यावर सतत गोलंदाजी करणारा बापू नाडकर्णी— याच्यापैकी एखादा फिरकी गोलंदाज व रोहन कन्हाय-नॉर्मन ओनील-नील हार्वे-टेड डेक्स्टर यासारखे आक्रमक शैलीदार फलंदाज असे रथी-महारथी एकत्र आलेला जागतिक संघ किती बलवान ठरला असता आणि त्या काळच्या क्रिकेटरसिकासाठी अशी नुसती कल्पना करणे हा अनुभवही किती सुखद, रोमांचकारक आहे!

आणि सी. के. नायडूंच्या जमान्यात अशी स्पर्धा असती तर......

□

# मिरज

एके काळी तिथल्या नैसर्गिक चांगल्या हवेमुळे ' मेडिकल सेंटर ' म्हणून हे गाव माहीत होतं. आज ' अरब सेंटर ' म्हणून ते बदनाम झालं आहे. मिरजेतल्या अरबांच्या चाळ्यांमुळं तिथलं सारं जनजीवनच भ्रष्ट झालं आहे.

**दुबई ते मिरज असं एक फार मोठं दुष्टचक्र तयार झालं आहे आणि त्यात बळी दिल्या जाताहेत अल्पवयीन मुली. हे थांबवण्याचं धाडस कोणाच्यातच नाही.**

कारण प्रत्येकाचेच हात त्यात अडकले आहेत.

मिरजेच्या आसपासच्या सांगली–कोल्हापूर यासारख्या गावांनी या अरबी रोगाचा धोका वेळीच ओळखला आहे. अरबांचा शिरकाव होऊ नये म्हणून ' अरब हटाव 'च्या पाट्या तिथे लागल्या आहेत.

इचलकरंजीतही गुंडगिरी–असंतोष वाढतो आहे.

या भ्रष्टाचाराविरुद्ध, या गुंडगिरीविरुद्ध आता धडाडीने आवाज उठवला आहे ' हिंदू एकता 'ने.

हिंदू एकताच्या जोडीला काही इतर संघटनांचे कार्यकर्ते उभे राहिले आहेत.

चळवळ सुरूच आहे. या कार्यकर्त्यांना सर्व थरातील सर्वसामान्य लोकांची सहानुभूती वाढत्या प्रमाणात मिळत आहे.

**या भ्रष्टाचार–गुंडगिरीचा आणि त्याविरुद्धच्या आंदोलनाचा सविस्तर वृत्तांत देणारी वार्तापत्रे ३१ डिसेंबर ' माणूस ' अंकापासून प्रसिद्ध होणार....**

## मिरज–इचलकरंजी वार्तापत्रे